# हकारा

वर्ष : दहावे । अंक : पहिला व दुसरा ।



जानेवारी / जून १९८९

## Books By Verrier Elwin

### Monographs

1. The Baiga (Murray, 1939)
2. The Agaria (OUP, 1942)
3. Maria Murder and Suicide (OUP, 1943, second edition, 1950)
4. Folk-Tales of Mahakoshal (OUP, 1944)
5. Folk-Songs of Chhattisgarh (OUP, 1946)
6. Myths of Middle India (OUP, 1949)
7. The Muria and their Ghotul (OUP, 1947)
8. Bondo Highlander (OUP, 1950)
9. The Tribal Art of Middle India (OUP, 1951)
10. Tribal Myths of Orissa (OUP, 1954)
11. The Religion Of an Indian Tribe (OUP, 1955)
12. Myths of the North-East Frontier of India (NEFA Administration (1958)
13. The Art of the North-East Frontier of India (NEFA Admn. 1959)
14. Nagaland (Adviser's Secretariat, Shillong, 1961)

### General

15. Leaves from the Jungle (Murray, 1936, second Ed. OUP, 1958)
16. The Aboriginals (OUP, 1943, second editioin,1944)
17. Hotley (orient Congmans, 1954)
18. A Philosophy for NEFA (NEFA Admn., 1957, third edition 1961)
19. When the World was Young (National Book Trust, 1961)
20. India's North-East Frontier in the Nineteenth century (OUP, 1959, reprinted 1962)
21. A Philosophy of Love (Publications Division,1962)

### Novels

22. Phulmat of the Hills (Murray, 1937)
23. A Cloud that's Dragonish (MUrray, 1938)

### With Shamrao Hivale

24. Songs of the Forest (Allen and Unwin, 1935)
25. Flok-Songs of the Maikal Hills (PImm. 1944)

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

# हाकारा

## डॉ.वेरिअर एल्विन विशेषांक

अनुक्रमणिका

**संपादकीय रिपोर्ट**

१) आदिवासी विश्वाचे महान उद्गाते- डॉ.वेरिअर एल्विन: सुधीर जोग ३

२) डॉ.एल्विन यांच्या आदिवासी विकास विषयक तात्त्विक धोरण प्रणालीची उत्क्रांती: जॉन गायकवाड १३

३) बैगा: शौनक कुलकर्णी २७

४) सीमावर्ती भागातील ललित वाङमय: व्ही.एस.कुलकर्णी ३२

५) आदिवासी कलेचे स्वरूप-एल्विन यांच्या दृष्टिकोनातून: सुचित्रा साठे ४४

६) डॉ.वेरिअर एल्विन यांची आदिवासींच्या प्रगतीसाठी दिलेली रूपरेखा: सविता देशपांडे ४९

७) मौखिक संपदा:श्री. बी.एम.पवार ५९

८) पुस्तक परिचय:ग.शा.पंडित

९) संवाद:श्री. चौकीदार

१०) संवाद:श्री. पदमाकर वळवी

११) कविता:कु. उषाकिरण आत्राम

वर्ष दहावे: अंक पहिला
जानेवारी-जून १९८९

पत्र व्यवहाराचा पत्ता:
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे-४११००७

संपादक
रामचंद्र मुटाटकर

प्रकाशक- रा.के.मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद यांच्यासाठी
संजीव मुद्रणालय
४६९,सदाशिव पेठ
पुणे=४११०३० फोन-४४५०८२
येथे छापून प्रसिध्द केले.

'हाकारा' महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ व भारतीय सामाजिक शास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र यांजकडून अनुदान प्राप्त झाले आहे.

# संपादकीय

हाकाराचे दहाव्या वर्षात पदार्पण होत आहे. त्या निमित्त भारतातील आदिवासींबाबत दर्जेदार संशोधन करणारे वेरियर एल्वीन यांच्या स्मृतीस हा अंक समर्पित करीत आहोत. वेरियर एल्वीन ब्रिटीश नागरिक. इंग्रजी वाङ्मयाचे अभ्यासक. भारतात त्यांचा संबंध गांधी-नेहरुंशी आला. गांधी त्यांना ''पुत्र'' म्हणावयाचे. ब्रिटीश नागरिक एल्वीनला काँग्रेसचे अध्यक्ष मनोनीत करून ब्रिटीश सरकारला खजील करावयाचा घाट घालण्यात आला; त्यामुळे सरकारने त्यांना भारताबाहेर घालवून दिले आणि राजकारणात भाग न घेण्याच्या हमीवर परत भारतात येऊ दिले.

सरदार पटेल यांच्या सूचनेवरुन व जमनालाल बजाज यांच्या आमंत्रणावरुन श्री. एल्वीन यांनी मध्यप्रदेशातील आदिवासी भागात राहून संशोधन केले व त्यांना जागतिक मानवशास्त्र साहित्यात मानाचे स्थान मिळवून दिले. भारत स्वतंत्र झाल्यावर, त्यांनी भारतीय नागरिकत्व स्वीकारले व नेहरूंच्या आग्रहाखातर उत्तर-पूर्व भागातील आदिवासीत आसामचे राज्यपाल यांचे सल्लागार म्हणून कार्य केले. बस्तरमधील 'मुडिया आदिवासी व त्यांचे घोटुल' या ग्रंथाने त्यांना जगात सर्वात जास्त प्रसिध्दी मिळवून दिली.

त्यांनी भारत सरकारच्या अनेक समित्यांवर कार्य केले व त्याचे अहवाल लिहिले. आदिवासी विकास करताना त्यांच्या संस्कृतीला भावेल अशा पध्दतीने कसा विकास करावयाचा याचा आलेख म्हणजेच त्यांचा ग्रंथ 'फिलोसॉफी फॉर नेफा', ढेबर समिती अहवाल व बहुउद्देशीय आदिवासी विकास गट समितीचा अहवाल यांचा प्रामुख्याने उल्लेख करावयास हवा.

एल्वीन अठरा वर्षे आदिवासी भागात राहिले व आदिवासींप्रमाणे अनवाणी राहिले. त्यांचे दोन्ही विवाह मध्यप्रदेशातील आदिवासी स्त्रीयांशी झाले. मानवशास्त्रात आदर्श निर्माण करणारे त्यांचे आदिवासी संस्कृतीचे वर्णनविषयक ग्रंथ वाङमयीन अभिरुचीचे द्योतक आहेत. धोरणात्मक ग्रंथ आदिवासी समस्यांबद्दलचे प्रगल्भ ज्ञान व प्रेम दर्शवितात.

एल्वीनपासून स्फूर्ति घेऊन आदिवासी भागात राहणाऱ्या समाजकार्यकर्त्यांनी विपुल लेखन करावे ही आग्रहाची विनंती. हाकारात अशा लेखनास मानाचे स्थान मिळेल.

# आदिवासी विश्वाचे महान उद्‌गाते- डॉ. वेरिअर एल्विन

## - सुधीर जोग

ख्यातनाम मानवशास्त्रज्ञ व भारतातील आदिवासींचे अभ्यासक- डॉ वेरिअर एल्विन यांच्या जीवनचरित्रासंबधी मानवशास्त्राचे विद्यार्थी, आदिवासींमध्ये काम करणारे कार्यकर्ते व अभ्यासकांना बरेच कुतूहल आहे. डॉ.एल्विन यांच्या ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने १९६४ मध्ये प्रकाशित केलेल्या The Tribal World of Verrier Elwin या संस्मरणीय आत्मचरित्राआधारे डॉ.एल्विन यांच्या जीवनचरित्राचा संक्षिप्त आढावा घेण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

### जन्म, बालपण व शालेय जीवन

इंग्लडमधील सेंट परगण्यातील डोव्हर येथे २९ ऑगस्ट १९०२ रोजी वेरिअरचा जन्म झाला. तीन भावंडामध्ये वेरिअर मोठा. बहिण एल्डिथ वेरिअरपेक्षा दोन वर्षांनी लहान व भाऊ बेसिल ५ वर्षांनी लहान. वडिल एडमंड हेन्री एल्विन हे चर्च ऑफ इंग्लंडचे बिशप. मिशनरी कार्यासाठी ते सतत पश्चिम आफ्रिकेच्या दौऱ्यावर असत, ते वयाच्या केवळ ३८व्या वर्षी अकाली मरण पावले. त्यामुळे वेरिअरला वडिंलाच्या आठवणी फारशा नाहीत मात्र एकदा वेरिअरची आई बाहेरगावी चालली असताना वडिलांची आज्ञा मोडून तिला निरोप देण्यासाठी रेल्वे स्टेशनवर गेल्यामुळे वडिलांनी मार दिल्याची गंमतीदार आठवण त्यांनी नमूद केली आहे. आई अंत्यत बुध्दिमान, कल्पक व देखणी होती. ती खूप वाचत असे. ती संभाषणचतुर व हजरजबाबी होती. तिला उच्च अभिरूचीचे काव्य, संगीत, कला यांची आवड होती व हाच वारसा वेरिअरकडे आला होता. मात्र ती आंत्यत्यिक धार्मिक प्रवृत्तीची होती. पतीच्या अकाली निधनामुळे धर्मपरायणता व स्वत:ची मुले इतकेच तिचे जीवन सीमित झाले होते. पैशाची चणचण कायम असे त्याममुळे तिला व मुलांना स्थिर जीवन लाभले नाही. सतत जागा बदलाव्या लागत, कारण खाष्ट घरमालकीणीशी तिला जमवून घेता येत नसे. जीवनातील या अस्थिरतेमुळे तिचा ओढा धार्मिकतेकडे अधिक असे. येशू ख्रिस्तावर तिची आंत्यतिक श्रध्दा होती. पैशाची चणचण असल्याने मुलांना वाचायला फार पुस्तके मिळत नसत. मात्र लहान मुलांसाठीचे एक मासिक घेऊन वेरिअर ते पुरवून पुरवून वाचत असे. अधून मधून आजोळी व इतर नातेवाईकांकडे सुट्टीत जायला मिळे. वेरिअर लहानपणी खूप व्रात्य असल्याने आईने त्याला लंडनमधील एका वसतिगृहात ठेवले होते. वेस्ट कंट्री स्कूल, डीन क्लोज, चेल्टनहॅम या वेरिअरच्या शाळेतील वातावरण धार्मिक असे. वेरिअर १२ वर्षाचा असताना व डीन क्लोज येथील शाळेत शिकत असताना पहिले महायुध्द सुरू झाले. युध्दकाळात महागाईमुळे वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे खाण्यापिण्याचे फार हाल होत. त्यातच वसतिगृहात फ्लूची साथ आली. युध्दकाळात ऑफिसर्स ट्रेनिंग कॉर्पसमध्ये प्रवेश घेतला. वेरिअरला खेळाची व शारीरिकश्रमाची फारशी आवड नव्हती पण सार्जंट मेजरच्या हुद्यापर्यंत बढती मिळाली. वेरिअरचे इंग्रजी साहित्याचे शिक्षक काही कारणाने शाळा सोडून गेल्याने ग्रंथालयातच बसून स्वत:चा अभ्यास करावा लागे. मुळातच अभ्यासूवृत्ती असल्याने वेरिअरने या संधीचा उत्तम उपयोग करुन घेतला. १६ वर्षाचा असतानाच वेरिअरला

इंग्रजी काव्याची गोडी लागली, शब्दांचे सौंदर्य जाणवू लागले.प्रथम टेनिसन, स्विनबर्न,यिटस् यांचे आकर्षण वाटे, मात्र वर्डस्वर्थ हा सर्वात आवडता कवी. शाळेत असताना वर्डस्वर्थच्या कवितांची पुस्तके घेऊन शेतात जंगलात भटकून निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेण्याची आवड वेरिअरला निर्माण झाली.

## ऑक्सफर्ड विद्यापीठात प्रवेश

तरुण वेरिअरने १९२१ च्या हिवाळ्यात ऑक्सफर्ड विद्यापीठात पहिल्या वर्षात प्रवेश घेतला. तिसऱ्या सहामाहीत 'इंग्रजी साहित्य' हा विषय घेतला. हा विषय घेऊ नकोस असा सल्ला अनेकांनी दिला होता कारण त्यात प्रथम श्रेणी मिळवणे कठीण असे व १९२१ पर्यंत 'इंग्रजी साहित्य' या विषयाला विद्यापीठात फारसे मानाचे स्थान नव्हते. पुढील वर्षी शेक्सपिअरच्या अभ्यासासाठी देण्यात येणारी विद्यापीठाची चार्लस् ओल्डहॅम शिष्यवृति वेरिअरला मिळाली. यात ३००० रु. व अनेक मौलिक ग्रंथांचा समावेश होता. पदवी मिळाल्यानंतर 'क्रांतीचे काव्य' या विषयावरील उत्कृष्ट निबंधाबद्दल आणखी एक प्रतिष्ठित असे मॅथ्यू अरनॉल्ड पारितोषिक मिळाले. शिष्यवृतीसाठी केलेल्या शेक्सपिअरच्या अभ्यासाबरोबरच १७ व्या व १८ व्या शतकातील काव्याचाही अभ्यास केला. वेरिअरचे एक शिक्षक निकोल स्मिथ यांचे घर पुस्तकांने भरलेले असे. स्मिथ यांनी वेरिअरला The Oxford Book of 18th Century Verse या पुस्तकाच्या संपादनकार्यात मदत करण्यास सांगितले. या निमित्ताने जुन्या काव्याचे बरेच परिशालन झाले जे एरवी वाचलेही गेले नसते. आठवड्यातून दोन तास स्मिथ यांच्या घरी होणाऱ्या चर्चेमधे काव्यातील सुवर्ण व हिणकस वेगळे काढले जाई.वेरिअरने म्हटले आहे की आतापर्यंत झालेल्या अभ्यासापेक्षाही याच चर्चेतून उच्च अभिरुची व काव्यासाठी आवश्यक गुणांचे संस्कार झाले. ब्लेक, कोलरिज, वर्डस्वर्थ, वाईल्ड, बॉस्वेल, पोप, जोन्सन हे १८व्या शतकातील प्रमुख कवी होते. वेरिअरने इंग्रजी साहित्याची पदवी प्रथम श्रेणीत मिळवली.

यानंतर वेरिअरने धर्मशास्त्राच्या अभ्यासक्रमात प्रवेश घेतला. या अभ्यासक्रमाच्या चवथ्या वर्षात झालेल्या वार्षिक चर्च कॉंग्रेसमध्ये 'युवकांच्या चर्चकडून अपेक्षा' या विषयावरील परिसंवादात ऑक्स्फर्ड विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी वेरिअरची निवड झाली. या परिसंवादातील त्याचे भाषण एवढे गाजले की वृतपत्रातून त्यास ठळक प्रसिध्दी मिळाली.

धर्मशास्त्राची पदवी प्रथम वर्गात मिळविल्यानंतर बायक्लिफ हॉल महाविद्यालयाचा उपप्राचार्य म्हणून वेरिअरची नियुक्ती झाली. उपप्राचार्य म्हणून मोठ्या खोल्या मिळाल्या होत्या. नियमित व्याख्याने देणे व विद्यार्थ्यांची टयुटोरिअल्स घेणे एवढेच काम असे. प्राचार्यांबरोबर मतभेद झाल्यामुळे हे काम सोडावे लागले.

## जीवन प्रवाहास वेगळे वळण

उपप्राचार्यपद सोडल्यानंतर पुढे काय करायचे यासंबंधी वेरिअर पुढे २-३ पर्याय होते. मात्र या उन्हाळ्यातील घटनांनी आतापर्यंतच्या जीवनप्रवाहास वेगळेच वळण मिळाले. आतापर्यंतचे जीवन तसे साधे, सरळ होते. शालेय व महाविद्यालयीन जीवनातही चांगले यश संपादन केले होते. दोन चॅपेल्समध्ये परीक्षक म्हणून नियुक्ती मिळत होती. तीन महाविद्यालयांमध्ये फेलोशिपविषयी बोलणी चालू होती. उत्तर ऑक्स्फर्डमध्ये घरही विकत घेतले होते. ऑक्स्फर्ड विद्यापीठ वेरिअरला अगदी मनापासून आवडत असे. त्याच्या आवडीच्या सर्व गोष्टी तेथे उपलब्ध होत्या. जेथे अभ्यासूवृत्ती सन्मानपूर्वक जपता येई तसेच स्फूर्ती देणारा मित्रांचा सहवासही

मिळत असे. मनास आल्हाद देणाऱ्या निसर्गसौंदर्याने ऑक्स्फर्डचा आसमंत नटलेला होता. परंतु यातही पूर्ण समाधान नव्हते. काही तरी अपूर्णत्त्व जाणवत होते, सत्याचा शोध घेण्याची ओढ लागली होती. एल्विन व हॉल्मन कुटुंबाचा भारताशी बराच संपर्क आला होता. त्यावेळी प्रचलित असलेल्या एका विचारसरणीचा प्रभाव वेरिअरच्या मनावर होताच. मानवाने पापाचे प्रायश्चित्त घेणे हा कॅथॉलिक पंथाचा अध्यात्मिक आदर्श होता. येशू ख्रिस्ताने सर्व जगाच्या पापाचे प्रायश्चित्त घेतले. संतमंडळी स्वत:च्या व इतरांच्याही पापाचे प्रायश्चित्त प्रार्थना करून व क्लेश सहन करून घेतात. ऑक्स्फर्डच्या अखेरच्या वर्षात वेरिअरला असे वाटू लागले की श्रीमंत माणसे गरीबांशी ज्या पद्धतीने वागतात त्याचे प्रायश्चित्त त्यांनी घ्यायला हवे. माझे पूर्वज/कुटुंबिय भारतात पैसा मिळविण्यासाठी गेले. त्यामुळे मला असे वाटू लागले की मी काही घेण्यासाठी नाही तर देण्यासाठी भारतात जावे, भारतातील गरीबांवर सत्ता गाजविण्याऐवजी त्यांची सेवा करण्यासाठी जावे. आम्ही ब्रिटीशांनी ज्या भारतीय जनतेवर वर्चस्व गाजविले त्यांचेशी समरस होण्यास, त्यांच्यातील एक होण्यासाठी जावे' वेरिअरची ऑक्स्फर्डमधील कारकीर्द संपुष्टात आणण्यास हीच प्रेरणा महत्त्वाची ठरली त्याचप्रमाणे पुढेही भारतातील अनेक वर्षांच्या वास्तव्यात अनेक अडचणींमधून याच प्रेरणेने तारून नेले.

वेरिअर एल्विनने यासंदर्भात लिहीले आहे- 'मी जेव्हा हा निर्णय घेतला तेव्हा मला वाटले की विद्वत्तेची कारकीर्द/अभ्यासू वृत्ती मी सोडत आहे व एका अपरिचित जगात प्रवेश करीत आहे. मात्र नंतर मला उमजले की वास्तविक पाहता मी संशोधनाच्या नवनवीन संधी उपलब्ध करून देणाऱ्या वाटेवर पाऊल ठेवले होते. मी स्वखुषीने पत्करलेल्या या ऑक्स्फर्ड ग्रंथालयातील ग्रंथांनीही दिल्या नसत्या एवढ्या वनवासाने मला हलाखीचे जीवन जगणाऱ्या उपेक्षितांच्या जीवनाचा जवळून अभ्यास करण्याची संधी मिळाली. १४ वर्षानंतर ऑक्स्फर्ड विद्यापीठाने मला या संशोधनाबद्दल D.Sc. ही प्रतिष्ठेची सर्वोच्च पदवी दिली.

मी जेव्हा प्रथम ऑक्स्फर्डमध्ये गेलो तेव्हा मला भारताविषयी फारसे काहीही माहिती नव्हते. जे काही माहिती होते ते पूर्वग्रहदूषित होते. 'भारतीय जनतेत स्वयंशासनाची कुवत नाही, त्यांना त्यांची योग्य जागा दाखवली पाहिजे- मात्र सुदैवाने ऑक्स्फर्डमधील तिसऱ्यावर्षी सिलोनमधील बर्नार्ड अलूविहारे यांचेशी माझी भेट झाली. ते भारतातील स्वातंत्र्य चळवळीचें खंदे समर्थक होते. त्यांनी मला भारताविषयी एक वेगळाच दृष्टीकोन दिला, ज्याविषयी मी आतापर्यंत अपरिचित होतो. त्यांनी रविंद्रनाथ टागोर व म. गांधीच्या विचारसरणीशी/लिखाणाशी माझी ओळख करून दिली. त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानावरचे ग्रंथ मला वाचण्यास दिले व भारताविषयी मला एक नवा दृष्टीकोण दिला. भारतीय राष्ट्रीयत्त्वाच्या आदर्शाने मी भारावून गेलो. विशेषत: म. गांधीच्या व्यक्तिमत्त्वाने माझे विशेष लक्ष वेधले.'

फादर जॅक विन्स्लो हे ख्रिस्त सेवा संघाचे संस्थापक होते. त्यांनी प. भारतात अनेक वर्षे मिशनरी म्हणून काम केले मात्र काही काळानंतर पंथाची परंपरा झुगारून देऊन भारतातील गरीबांशी, भारतीय संस्कृती व राष्ट्रीयत्त्वाशी अधिक जवळून समरस होण्याचे त्यांनी ठरविले. भारतीय गूढवादाच्या काही पैलूंचा त्यांनी बराच अभ्यास केला होता. सैद्धान्तिक व व्यावहारिक योगशास्त्राचे बरेच अध्ययन त्यांनी केले होते. तरूण वेरिअरवर त्यांचा खूपच प्रभाव पडला. भारतात येण्यापूर्वी वेरिअरने हिंदूधर्म व तत्त्वज्ञानाचा थोडाफार अभ्यास केला होता. त्याचे दोन जवळचे मित्र ऑक्स्फर्डमधील ऑलिव्हर क्लार्क व केंब्रिज मधील रॉबर्टसन यांनी ख्रिस्त सेवा संघाच्या

कार्यात फादर विन्स्लोंना मदत करण्याचे ठरविले होते. वेरिअरनेही त्यांचेसमवेत पुण्यास जाण्याचे ठरविले. या दोन्ही मित्रांसमवेत वेरिअरचा बोटीच्या तिसऱ्या वर्गाने भारताचा प्रवास सुरु झाला.

## भारतात आगमन व पुण्यात वास्तव्य

३० नोव्हेंबर १९२७ ला ते कोलंबोला बोटीतून उतरले व तेथून मलबारला आले. तेथे कांहीं दिवस राहून रेल्वेने पुण्यास आले. पुण्यातील शेतकी महाविद्यालयाजवळील फादर विन्स्लो यांच्या ख्रिस्त सेवा संघात ते आले. तेथील राहणी अगदी साधी होती. भारतीय पद्धतीचे जेवण मिळे व सर्वजण जमिनीवर झोपत. फादर विन्स्लोंनी वेरिअरला मराठी शिकण्याचा सल्ला दिला. श्री. हर्षे हे वयस्कर ब्राह्मण गृहस्थ ख्रिस्त सेवा संघात मराठी शिकविण्यास येत. वेरिअर व हर्षे यांचा अधिक वेळ भाषेच्या शिक्षणापेक्षाही हिंदू तत्त्वज्ञानावर चर्चा करण्यात जाई.

## साबरमती आश्रमात

जानेवारी १९२८ मध्ये म. गांधीजींच्या साबरमती आश्रमात एका परिषदेच्या निमित्ताने जाण्याचा योग आला. आश्रमातील जीवनाचा व शिस्तीचा वेरिअरवर खूपच प्रभाव पडला- 'साबरमती आश्रमातील काही दिवसाच्या वास्तव्याचा माझेवर खूपच प्रभाव पडला. भारतीय भूमीवर जणू काही भारतीय म्हणून माझा पुनर्जन्म झाला.' असे त्यांनी आत्मचरित्रात नमूद केले आहे.

स्वातंत्र्य हा वेरिअर एल्विनच्या आवडीचा व जिव्हाळ्याचा विषय होता. ऑक्स्फर्डमध्ये असताना क्रांतीकाऱ्यावर पारितोषिक प्राप्त निबंध लिहीला तेव्हा इंग्रज कवी स्वातंत्र्याला किती महत्त्व देत हे शिकण्यास मिळाले होते. भारताच्या राष्ट्रीय चळवळीच्या प्रेरणाही म. गांधींना टॉलस्टॉय व रस्किनच्या साहित्याच्या परिशीलनातूनच मिळाल्या होत्या. यामुळेच म. गांधी व वेरिअर एल्विन यांच्या विचारसरणीचा धागा जुळला. एल्विनला भारताविषयीचा एक पुरोगामी दृष्टीकोण मिळाला व महात्माजींच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीशी एल्विनचे नाते जुळले.

पुण्यातील वास्तव्यात प्रकृती बिघडल्याने एल्विन इंग्लंडला गेले व काही काळ विश्रांती घेऊन पुण्यातील ख्रिस्त सेवा संघात परतले. ख्रिस्त सेवा संघात गांधी तत्त्वज्ञानावर रिनोल्ड यांची व्याख्याने आयोजित केली याबद्दल चर्च ऑफ इंग्लंडकडून जाब विचारण्यात आला मात्र ख्रिस्त सेवा संघातील सहकाऱ्यांनी चांगली साथ दिली. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचेही एकदा ख्रिस्त सेवा संघात स्वागत केले. तसेच सरदार वल्लभभाई पटेल यांनी गुजराथला भेट देऊन शेतकऱ्यांवरील पोलिसी दडपशाहीची चौकशी करण्याची एल्विनना विनंती केली व त्यासही ख्रिस्त सेवा संघाने परवानगी दिली. गुजराथमधील आणंद, नडियाद, बार्डोली, जलालपूर इ. ६० गावांना भेटी देऊन एल्विन यांनी सारावंदी आंदोलनात भाग घेणाऱ्या शेतकऱ्यांविरुद्धच्या पोलिसी दडपशाहीची चौकशी करून अहवाल तयार केला व तो 'बॉम्बे क्रॉनिकल' मध्ये प्रसिद्ध झाला. नंतर तो पुस्तक रुपानेही प्रकाशित झाला.

## सरदार पटेल व जमनालाल बजाज यांचा आदिवासींमध्ये काम करण्याचा सल्ला.

काही काळ साबरमती आश्रमात राहिल्यानंतर एल्विन यांनी ख्रिस्त सेवा संघ सोडण्याचा निर्णय घेतला. एखाद्या खेड्यात राहून गरीबांच्या सान्निध्यात राहावे असे त्यांना वाटू लागले. 'असतो मा सत् गमय।' असत्याकडून

सत्याकडे वाटचाल करण्याच्या प्रार्थनेनुसार स्वत:च्या जीवनाला नवा अर्थ प्राप्त करून द्यावा असे वाटू लागले. प्रथम असे वाटले की गुजराथमधील अस्पृश्यांमध्ये राहून काम करावे. सरदार वल्लभभाई पटेल यांनी यापासून परावृत्त केले. सरदारांनी एल्विनना सांगितले- 'अस्पृश्यता हा तुमचा प्रश्न नव्हे. अस्पृश्यता हे हिंदूंचे पाप आहे, त्याचे प्रायश्चित्त हिंदूंनीच घ्यावे.' गुजराथेत अगोदरपासून बरेच समाजसेवक काम करीत असल्याने एल्विन यांनी आदिवासींमध्ये काम करावे असा सल्ला सरदारांनी दिला. अहमदाबादमध्ये एकदा सरदार व जमनालाल बजाज यांचेसमवेत गाडीतून जात असताना जमनालाल एल्विन यांना म्हणाले, ''आपण मध्यप्रांतात या, राष्ट्रवादी कार्यकर्ते व मिशनरी यांनीही दुर्लक्ष केलेल्या गोंड या आदिवासी जमातीत काही काम करा'' एल्विन यांनाही ही सूचना आवडली व गोंडांच्या प्रदेशाला भेट देण्याचे त्यांनी ठरविले. त्यांचे सहकारी शामराव हिवाळे यांनीही त्यांचे समवेत आदिवासींमध्ये राहण्याचे ठरविले.

### 'अनमोल खजिन्यांचे पहिले दर्शन'

आदिवासींमध्ये राहण्याचे तर ठरविले पण कोणत्या भागात व गावात राहावे याचा शोध घेत असताना एल्विन यांनी नागपूरचे बिशप वूड यांचा सल्ला घेतला. वूड यांना आदिवासींसंबंधी जिव्हाळा होता. त्यांनी मंडला जिल्ह्यात करंजिया या गोंडांच्या गावात राहण्याचा सल्ला दिला. २८ जानेवारी १९३२ रोजी शामरावांसह मैकल डोंगराच्या रांगातून बैलगाडीने प्रवास सुरु झाला. दोन दिवसांच्या प्रवासानंतर ते करंजियाला पोहोचले, पण सामान मागेच राहिले होते. ती रात्र कशीबशी जंगलखात्याच्या बंगल्यात काढली. दुसऱ्या दिवशी करंजिया गावाला भेट दिली. गावात दहा पाडे होते. गावातील एक मुसलमान आपल्या घरातील काही जागा महिना ३ रु. भाड्याने देण्यास तयार झाला. एल्विन लिहितात- 'कोणीतरी सरपण व पाणी आणले व त्या संध्याकाळी आम्ही आमच्या नवीन घरात होतो.'

'शामराव मागे राहिलेल्या आमच्या सामानाची व्यवस्था पाहण्यासाठी गेला असताना मी रस्त्याच्या कडेला थांबलो होतो तेव्हा अचानक एक नैराश्याची लहर मनाला स्पर्शून गेली. मी चूक तर केली नाही ? माझे मन पुन्हा ऑक्स्फर्डकडे गेले, मित्रांची आठवण आली. मला खूप एकाकी वाटू लागले. क्षणभर मला वाटले की मी ऑक्स्फर्ड व लंडनमधील ग्रंथालये व पुस्तके सोडून येथे का आलो ?' 'मात्र दुसऱ्या दिवशी करंजियातील आमच्या नवीन घरात जमिनीवर पहुडलो असताना आदल्या दिवशीचे नैराश्य कोठल्याकोठे पळाले. शेळ्यांच्या त्या गोठ्यात मला जाणवले की कधीही सुटू शकणार नाही अशा आदिवासी विश्वात मी अडकलो आहे. त्याक्षणी सुंदर, रोमहर्षक, रोमांचक असे काहीच जाणवले नाही. टिकेरा तोला (छोटी टेकडी) चे गोंड मलूल वाटले. ते अगदी गरीब, अस्वच्छ व रोगांनी जर्जर होते. मात्र मला 'अनमोल खजिन्या'चे प्रथम दर्शन झाले होते. व संपूर्ण जीवन खर्ची घालावे लागले तरी या अनवट आदिवासी विश्वाचा शोध घेण्याचा निश्चय मी केला.'

### गोंड व परधानांच्या प्रेमळ सान्निध्यांत

करंजिया हे गाव सातपुड्याच्या रांगांमध्ये नर्मदा नदीचे पवित्र उगमस्थान अमरकंटक पासून अगदी जवळ आहे. करंजिया गावातून अमरकंटककडे जाण्याच्या मार्गावर गावाबाहेरील एक टेकडीवर एल्विन व शामराव यांनी मातीने सारवलेल्या बांबूच्या भिंती असलेल्या व गवताने

शाकारलेल्या काही झोपड्या उभारल्या व हाच त्यांचा पहिला आश्रम. आजुबाजुला घनदाट अरण्य होते ज्याची निरव शांतता रात्री वाघाच्या डरकाळीने अथवा हरणाच्या टीपेच्या सूरातील किंकाळीमुळे भंग पावत असे. आजुबाजूच्या जंगलात गोंड या आदिवासी जमातीची वस्ती होती. त्यांच्या मदतीसाठी तेथे एक वसाहत/आश्रम उभारण्याचा एल्विनचा विचार होता. गोंड सेवा मंडळ या संस्थेची स्थापना केली काहीं कार्यकर्त्यांची नियुक्ती केली. त्यात काही आदिवासीही होते. ही संस्था पुढे १९४९ पासून Tribal Welfare and Research Unit (TWARU) या नावाने ओळखली जाऊ लागली. शामरावांनी गोंडांशी त्यांच्या सुखदु:खाशी समरस होऊन चांगलीच मैत्री व विश्वास संपादन केला. गोंडामध्ये शामराव 'छोटा भाई' म्हणून लोकप्रिय झाला. लोक त्याला अनेक प्रकारचे सल्ले विचारत. त्यांचा आश्रम हा गोंड गावाचाच एक भाग वाटे; कारण प्रत्येक गोष्ट गोंडी शैलीत झाली पाहिजे हे आश्रमाची उभारणी करताना कटाक्षाने पाहिले होते. आश्रमातील सर्व भिंती मातीच्या होत्या व झोपड्या गवताने शाकारलेल्या होत्या. आदिवासींचे गाव कसे असावे याचा हा आश्रम म्हणजे एक आदर्श होता. सर्व झोपड्या स्वच्छ राखल्या जात व हवा खेळती राही. आसमंतात रंगीबेरंगी फुलझाडे व फळझाडे होती. गोंडांना हे अगदी आपलेच घर वाटे. आपल्या गावात आपल्याला याचा कसा उपयोग करता येईल याचेही शिक्षण कळत नकळत- आश्रम परिसराच्या निरीक्षणाने त्यांना मिळे. आश्रमामध्ये प्रार्थना मंदिरे, दवाखाना, छोटे वस्तुसंग्रहालय, शाळा व वसतिगृहे यांचा समावेश होता. शाळेत १५० मुलेमुली सहशिक्षण घेत. मुलींचे प्रमाण चांगले होते. आश्रमाच्या एक भागात कुष्ठधाम होते. या प्रमुख आश्रमाभोवती आठ मैलाच्या परिसरात आश्रमाच्या आठ शाखा होत्या. तेथे एक स्थानिक कार्यकर्ता, शाळा, छोटा दवाखाना व वाचनालय अशा सोयी होत्या. आठवड्यातून एकदा सर्व कार्यकर्ते करंजियाला मुख्य आश्रमात जमत व त्यांना प्रशिक्षण दिले जाई; कारण या कार्यकर्त्यांचेही फारसे शिक्षण झालेले नव्हते. या शाळांमधून ४०० मुलेमुली शिकत होती त्यापैकी बहुसंख्य गोंड वा अन्य आदिवासी जमातीतली होती. शिकलेला गोंड बाजारात फसवला जाण्याची शक्यता कमी असते. 'देवानेच आपल्याला गरीब बनवले आहे' अशी समजूत असलेल्या गोंडामध्ये काही प्रमाणात जागृती दिसू लागली. स्वातंत्र्यानंतर एक गोंड बाई पोलिस स्टेशनमध्ये गेली. सबइन्स्पेक्टरने तिला चौकीबाहेर जाण्यास सांगितले तेव्हा ती म्हणाली- 'ही तर आमची चौकी आहे, तुझी नाही. ती लोकांच्या मालकीची आहे.' एका ब्राह्मण महसूल अधिकाऱ्याने एका गोंडाला सांगितले की मुलांना शाळेत पाठवणे व्यर्थ आहे तेव्हा गोंडाने त्याला उत्तर दिले- 'तुला असे वाटणे स्वाभाविक आहे, कारण तुला माहित आहे की तुझी नोकरी त्याला मिळेल.'

जंगलाच्या सान्निध्यातील व गोंडाच्या सहवासातील एल्विन व शामराव यांच्या प्रारंभीच्या काही वर्षातील आनंदी व रोमांचक जीवनाचे चित्रण एल्विन यांच्या जॉन मरे यानी प्रकाशित केलेल्या 'Leaves from Jungle' या पुस्तकांत आहे. त्या काळांत हे पुस्तक अतिशय वाचकप्रिय झाले व नंतरही ऑक्स्फर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने त्याची आवृत्ती प्रसिद्ध केली आहे.

१९४० मध्ये एल्विन व शामराव मैकल टेकड्यामध्ये नर्मदेपासून जवळील पठाणगढ मध्ये राहू लागले. तेथेही दवाखाना, शाळा, कार्यालय, कुष्ठधाम, अतिथीगृह सुरु केले. येथे आजुबाजूच्या प्रदेशात परधान या आदिवासी जमातीची वस्ती होती. पठाणगढमध्ये राहू लागल्यानंतर एल्विनने करंजियाजवळील एका गावातील कोसी या सुंदर

गोंड मुलीशी लग्न केले. तिच्यापासून झालेल्या मुलाचे नाव शरणगढचा गोंड राजा जवाहरसिंग व जवाहरलाल नेहरू यांच्या नावावरून जवाहरलाल ठेवले. दुर्दैवाने हे लग्न फार काळ टिकले नाही. काही वर्षांनी घटस्फोट घेतला. त्यानंतर लिला या परधान जमातीतील मुलीशी एल्विनने लग्न केले व ते चांगले यशस्वी झाले.

## मानवशास्त्राचा सखोल व्यासंग

वेरिअर एल्विन यांचा मूळ पिंड संशोधकाचाच होता. बरीचवर्षे ते आदिवासींमध्ये राहिले तरी त्यांचे दोन जुने मित्र- कलकत्त्याच्या राष्ट्रीय संग्राहलयातील बी.एस. केशवन् व राष्ट्रीय अभिलेखागारातील सरीन रॉय यांच्यामुळे त्यांचा ग्रंथांशी सतत संपर्क राहिला व दुर्मिळ पुस्तकेही उपलब्ध झाली.

अन्य व्यावसायिक मानवशास्त्रज्ञाप्रमाणे सुरुवातीपासूनची कारकीर्द मानवशास्त्रज्ञाची नसली तरी एल्विन यांनी अनेक वर्षे मानवशास्त्राचा सखोल व्यासंग केला. एल्विन यांना मानवाविषयीची जिज्ञासा साहित्यामुळें निर्माण झाली. जेन ऑस्टिन व स्विफ्ट हे पहिले दोन शिक्षक म्हणता येतील Pride and Prejudice, ullirer's Travel या दोन ग्रंथात समाजशास्त्रीय माहिती व विश्लेषण विपुल आहे. नंतर त्यांनी केलेल्या धर्मशास्त्रांच्या अभ्यासामुळे मानवाविषयीची रुची आणखी वाढली. ईश्वरविषयक शास्त्राच्या अभ्यासाने मानवविज्ञानाच्या अभ्यासाकडे नेले. अगोदर वाचलेल्या इतिहास, तत्त्वज्ञान, मानसशास्त्रविषयक ग्रंथांमुळे पार्श्वभूमी तयार झाली होती. एल्विन यांचे मते मानवशास्त्र हा फार मोठा विषय आहे. मानवाचा सर्वांगीण/साकल्याने अभ्यास करणारे शास्त्र अशी सर्वसमावेशक व्याख्या असल्यामुळे विविध विषयांची पार्श्वभूमी असणारे अभ्यासक हवेत. त्यात प्राक् इतिहासज्ञ, पुरातत्त्वशास्त्रज्ञ, शारिरीक मोजमापे घेणारे तज्ञ, जीवशास्त्रज्ञ, संख्याशास्त्रज्ञ यांचप्रमाणे मानवतावादी/मानवविद्या शिकलेलेही अभ्यासक हवेत.

अगदी सुरुवातीपासून एल्विनचा कल मानवशास्त्राच्या उपयोजित बाजूकडे होता. केंब्रिज विद्यापीठामध्ये ए.सी. हाल्डेन यांच्याकडून मानवशास्त्राच्या अभ्यासाची प्रेरणा मिळाल्याचे एल्विन यांनी नमूद केले आहे. ज्यांचा अभ्यास करावयाचा त्यांचे विषयी प्रेम व जिव्हाळा असावा व त्यांच्या विकासाविषयी सदिच्छा असावी. त्यांना केवळ प्रयोगशाळेतील नमुने समजू नये. एल्विनच्या मते मानवशास्त्राचा आत्मा प्रेम हाच आहे. ते लिहितात- ''माझ्यासाठी मानवविज्ञान म्हणजे केवळ ''क्षेत्रकार्य'' नव्हे तर माझे पूर्ण जीवन असा माझ्यापुरता अर्थ आहे, माझी पद्धत अशी- लोकांमध्ये राहावयाचे, बाहेरच्या व्यक्तीला जास्तीत जास्त शक्य तेवढे त्यांच्या जीवनात सहभागी व्हावयाचे आणि एकाचवेळी अनेक पुस्तकांवर काम करायचे. बैगावरच्या पुस्तकाला सात वर्षे, अगारियांवरच्या पुस्तकाला दहा वर्षे लागली. लोककलांच्या पहिल्या संग्रहाला दहा वर्षे लागली. तर 'छत्तीसगडमधील लोकगीते' या पुस्तकाला चौदा वर्षे लागली. याचा अर्थ असा की, लोकांना केवळ प्रश्न विचारण्याने माझे समाधान होत नसे तर लोकांचे ज्ञान माझ्यामध्ये एवढे मुरत असे की ते माझा एक भागच बनून जाई.''

या ज्ञानाबरोबरच लोकांना मदत करण्याचीही प्रेरणा मिळे. बैगांचा मानसिक व आर्थिक शोषणाकडे जेव्हा त्यांचे लक्ष गेले; तेव्हा त्यांनी फिरत्या शेती संदर्भात संपूर्ण वनविषयक धोरणालाच आव्हान द्यावे असे वाटू लागले. भारताच्या आदिवासी भागातील अनेक प्रदेशांमध्ये त्यांनी वनविषयक धोरण तपासून पाहिले. अगारियांच्या अभ्यासावरून त्यांना पूर्णत: नष्ट होण्याचा धोका

असलेल्या कुटिरोद्योगांना प्रोत्साहन देण्याची निकड जाणवली. संभाळ व उराँव जमातींच्या अभ्यासाने अजुनही अस्तित्वात असलेल्या लोककलांना. प्रोत्साहन देण्याचे महत्व जाणवले. बाहेरच्या व्यक्तीकडे संशयाने पाहण्याच्या बोंडो व सावरांच्या वृत्तीमुळे काही अधिकारी/प्रशासक विचलित झाले होते. या जमातींचा पूर्ण अभ्यास केल्यानंतर एल्विन यांच्या असे लक्षात आले की, ही वृत्ती कोणत्याही वाईट हेतूने नव्हती तर त्यामागे त्यांच्या संस्कृतीत खोलवर रुजलेल्या धार्मिक व जादूटोण्याच्या कल्पना होत्या. लोककथा, मिथ्यके, यांच्या अभ्यासातून आदिवासींना वाटणारी भीती व अधीरता यांचे महत्व ध्यानात आले. (ज्याकडे अभ्यासक पुरेशा गांभीर्याने लक्ष देत नाहींत)

पंचवार्षिक योजनांच्या परिणामामुळे भारतातील आदिवासींमध्ये झपाट्याने बदल होत असून सर्वसाधारण समाजामध्ये ते सामावून जात आहे. यामुळे या विकासप्रक्रियेस मार्गदर्शन करण्यासाठी तसेच विकास कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी अधिकाअधिक मानसशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ घेतला जाण्याची निकड आहे. कारण मानवी जीवनातील अंध:कार दूर करण्यासाठी त्याकडे सत्याचा प्रकाशझोत वळविणे हेच तर विज्ञानाचे खरे वैभव आहे.' असे ठाम प्रतिपादन एल्विन यांनी केले आहे.

एल्विन, काव्याच्या माध्यमातून मानव विज्ञानाकडे वळले हे कांही विद्वानांना चमत्कारिक वाटते. एल्विन यांना मात्र हा बौध्दिक प्रवास अगदी स्वाभाविक वाटतो. त्यांचे मते मानव विज्ञानाच्या अभ्यासकापुढे मुख्य समस्या असते ती पृष्ठभागाखालील सत्य शोधण्याची. ते त्याला लोकांकडून खुषीने व कौशल्यानें काढून घ्यावे लागते; या कौशल्यामध्यें काव्य पूरक ठरते. कारण काव्यामुळे संवेदनशीलता वाढते; कल्पनाशक्तीचा तर खजिनाच हाती लागतो, अभ्यासकाची सहानुभूति व समज अधिक सखोल होते. आणि त्याचा अभ्यास विषय जर प्रत्यक्ष काव्य जगणारे आदिवासी असतील तर उत्तमच ! एलूविनचे बाबतीत हेच झाले. इंग्रजी साहित्याचा व्यासंगी या नात्याने ते प्रथम इंग्रजी काव्यांचे अभ्यासक होते. आदिवासींच्या सहवासात आल्यानंतर त्यांचे जीवनातील काव्य उमजू लागले. ते लिहितात, 'काव्य त्यांचेकडे सर्वत्र आहे. त्यांचे डोळ्यांत, ओठावर एवढेंच काय त्यांच्या हालचालींतही काव्य आहे.'

यामुळे साहाजिकच आदिवासींच्या सहवासात एलूविन यांची मूळची काव्यवृत्ति उचंबळून आली. आदिवासींच्या साध्या बोलण्यातही त्यांना काव्य आढळलें. एक वृध्द आदिवासी स्त्री शेकोटीला शुष्क झाडावर उमललेल्या फुलांची सुंदर उपमा देते. छत्रीला एका पायाचा मोर म्हणते. रात्री शेकोटीभोवती आनंदानें नाचणारी आदिवासी मुले एकमेकांना जी कोडी घालतात ते तर अस्सल काव्य असते. तांबड्या आणि हिरव्या मिरच्या हे झुडुपावर बसणारे पक्षी, दिवा म्हणजे घरांत आपली पिसे पसरणारी चिमणी, शेतात काम करता करता तरूण प्रेमिक काव्यमय प्रतिमा वापरून आपल्या प्रेमाचे रसिले वर्णन करतात. सुंदर युवती ज्यावर पहुडली असेल त्या साध्या खाटेचे पाय सोन्याचे भासतात व खाटेची चौकट हिऱ्यामाणकांनी सजवलेली वाटते.

## भारतातील आदिवासींवर संशोधन व ग्रंथलेखन

एलूविन यांनी शामराव हिवाळे यांच्या सहाय्यानें आदिवासींवरचे पहिले पुस्तक लिहिले ते म्हणजे 'Songs of the Forest' त्याला सर फ्रान्सिस यंगहसबंड यांनी प्रस्तावना लिहिली. यातील अनेक गाणी लोकगीतांचें उत्कृष्ट नमुने

आहेत, मंडला टेकडयांमध्ये बोलली जाणारी ''छत्तीसगढी'' शिकल्यामुळे एल्‌विन व शामराव यांना आदिवासींशी थेट संपर्क साधता आला. त्यानंतर १९४४-४६ चें दरम्यान मैकल खेडयामधील लोकगीते व 'छत्तीसगडमधील लोकगीते' हे संग्रह त्यांनी प्रसिध्द केले. हे संग्रह त्यांनी ज्यांना अर्पण केले त्या डब्ल्यू. जी. आर्चर यांनी 'छत्तीसगडमधील लोकगीते' या पुस्तकाला लिहिलेली प्रस्तावना ही एल्‌विन यांचे मते आदिवासी काव्यावरील सर्वोत्कृष्ट विवेचन आहे.

'बैगा' या आदिवासी जमातीवर त्यांनी अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिला. या जमातीचा अभ्यास करतांना एल्‌विन त्यांचेशी किती समरस झाले होते याची जणू पावतीच एकदा एका बैगाने दिली. एल्‌विन यांनी बैगांच्या एका गावाला भेट दिली तेंव्हा त्यांनी त्यांचे स्नेहपूर्ण स्वागत केले. मात्र त्यांत अधिकाऱ्याचे स्वागत करताना होणारा गाजावाजा अजिबात नव्हता. एल्‌विन बरोबर आलेला एक सहकारी यामुळे नाराज झाला. तो म्हणाला, ''साहेब आले आहेत, त्यांच्या स्वागताची तयारी त्यांना साजेशी कां करत नाही.'' त्यावर तो बैगा हंसून म्हणाला, ''अरे, हा तर आमचा मोठा भाऊ. तो एवढा साधा माणूस आहे कीं, त्याला येतांना आम्ही पाहिले तर आम्ही म्हणतो अरे, हा तर आपला बडा भाअी, विशेष काळजी करण्याचे कारण नाही.''

मध्य प्रदेशातील मंडला व बिलासपूर जिल्ह्यात विखुरलेल्या व लोहारकाम करणाऱ्या अगारिया या आदिवासी जमातीचा अभ्यास करून त्यांनी एक ग्रंथ लिहिला. यानंतर 'महाकोशामधील लोककथा' व मध्यभारतातील ''मित्थ्यके'' हे दोन अभ्यासपूर्ण ग्रंथ प्रसिध्द केले. या ग्रंथातील एक प्रमुख विभाग- मानवी शरीराच्या प्रत्येक अवयवाचे मूळ व त्याची नैसर्गिक कार्ये यांचे वर्णन 'American Anthropologist' या प्रतिष्ठित नियतकालिकाने 'मानवाच्या बौध्दिक विकासाच्या अभ्यासातील 'मैलाचा दगड' असे केले. याचा एल्‌विन यांना सार्थ आनंद व अभिमान वाटला. यानंतर 'मध्यभारतातील आदिवासी कला' हा आणखी एक ग्रंथ प्रसिध्द केला.

त्या काळच्या मध्यप्रांतांच्या दक्षिणेस असणाऱ्या बस्तर संस्थानची ओळख एल्‌विनना सर्वप्रथम सर ग्रिगसन यांनी करून दिली. ग्रिगसनना भारतातील आदिवासींच्या प्रश्नांविषयी जिव्हाळा होता. ते १९२७-१९३१ चे दरम्यान बस्तरचे प्रशासक होते. आपल्या अनुभवावर आधारित ''बस्तरचे माडिया गोंड'' हा ग्रंथ त्यांनी लिहिला. एल्‌विन शिल्पकार मागरिट मिल्वर्ड यांच्याबरोबर बस्तरमध्ये गेले. मागरिट यांनी भारतातील आदिवासी कलाकारांवर एक पुस्तक लिहिले. त्यानंतर मे १९४० मध्ये एल्‌विननी बस्तरमध्ये आदिवासींचा अभ्यास करण्याचे ठरविले. त्यांच्या नेहमीच्या पध्दतीप्रमाणे ते आदिवासींमध्येच राहिले. चित्रकूट धबधब्याच्या आल्हाददायक सान्निध्यांत त्यांनी घर बांधले. व मुडियांच्या गावामध्यें दोन झोपडया बांधल्या. बस्तरमधील आदिवासी गरीब होते पण मुक्त व आनंदी होते. त्यांच्या जीवनांत उत्साह सळसळत होता. त्यांची नृत्येही भारतांत सर्वोत्तम होती. एल्विन यांनी संपूर्ण बस्तर संस्थानांत संचार करून अबूजमाडचे डोंगरीमाडिया, कोया, भत्रा, डोरला, माडिया व मुडिया यांची बरीच माहिती मिळविली. तसेंच असंख्य छायाचित्रेही घेतली. एल्‌विन लिहितात, ''मी अभ्यासलेल्या सर्व आदिवासींमध्ये माडिया हे विशेष लक्ष वेधून घेणारे होते. व त्यांची माहिती मिळविणे आनंददायी होते. त्यांनी खूप सहकार्य दिले. त्यामुळें माडियांमधील माझी वर्षे सुखांत गेली'' मुडियांचा विश्वास संपादन करून 'The Muria and

their Ghotul' हा ७५० पानी ग्रंथ त्यांनी लिहिला. यांत मुडिया जमातीच्या संपूर्ण जीवनाचे चित्रण करून त्यांच्या युवागृहातील आनंदी व मुक्त जीवनाचे तपशीलवार वर्णन केले आहे. मुडियांची युवागृहे या युवक युवतींना मुडिया संस्कृतीचे जीवनशिक्षण देणाऱ्या शाळाच होत. युवागृहातील स्वातंत्र्य, आनंद, स्नेहभाव, आतिथ्यशीलता आणि युवक-युवतींमधील मत्सर व संशयमुक्त निरामय लैंगिक जीवन ही मुडिया संस्कृतीची वैशिष्ठ्ये होती. या ग्रंथाचे फ्रेंच व इटालियन भाषांमध्ये हि अनुवाद प्रसिध्द झाले. ओरिसातील बोंडो, सावरा या जमातींचा अभ्यास करून एल्विननी त्यावर पुस्तके लिहिली. तसेच जूआंगजमातीवर 'Man In India' या नियतकालिकाचा विशेषांकही प्रसिध्द केला. शासनासाठीहि त्यांनी अनेक अभ्यासपूर्ण अहवाल लिहून आदिवासींच्या कल्याणासाठी अनेक शिफारशी केल्या.

## संशोधनकार्यास राजमान्यता

पंतप्रधान पंडित नेहरूंनी १९५३ मध्ये इच्छा व्यक्त केली की एल्विन यांनी नेफा प्रशासनामध्ये आदिवासीविषयक सल्लागार म्हणून काम करावे. एल्विन यांनी पत्नी लीला व सहकारी शामराव यांच्याशी विचार विनिमय करून हे पद स्वीकारले. यामुळे त्यांच्या संशोधनाचे स्वरूप बदलले. पूर्वी संशोधनासाठी भरपूर वेळ उपलब्ध असे. आदिवासींमध्यें बराच काळ राहता येईल मात्र आतां नेफामध्यें सुमारे ३३ मैल चौरस क्षेत्रांत विखुरलेल्या सुमारे ४० आदिवासी जमातींचे सर्वेक्षण करावयाचे होते. यामुळे ते नेफाच्या अंतर्गत भागांत ३ ते ६-७ आठवड्यांच्या दौऱ्यावर जात. माहिती गोळा करून आदिवासी जमातींच्या सर्वसाधारण परिस्थितीबाबत अहवाल लिहित व त्यांच्या प्रशासनासंबंधी सूचना करीत. सल्लागार म्हणून संशोधन मंडळास मार्गदर्शन करण्याची त्यांची जबाबदारी होती. तसेच आसाम राज्यासाठी आदिवासी संशोधन संस्था स्थापन करण्याची जबाबदारीहि त्यांच्यावर सोपविण्यात आली. याचबरोबर मणिपूर व त्रिपुरा साठीहि आदिवासीविषयक सल्लागार म्हणून काम करावे लागले. नेफामधील आदिवासी भागाचा दौरा करून आदिवासींच्या विकासासंबंधी एक अहवाल तयार करून तो त्यांनी राज्यपालांना सादर केला. तो राज्यपालांनी पुढे पंतप्रधानांकडे पाठविला. त्यात व्यक्त झालेल्या आदिवासी विकास विषयक दृष्टिकोनाला पंडित नेहरूंनी संमती दिली. हा अहवाल एल्विननी अधिक विस्तृत करून 'A Philosophy For NEFA' हा ग्रंथ सरकारमार्फत प्रसिध्द केला. या ग्रंथाला पंडित नेहरूंनी अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिली व यांतच पंडीतजींच्या आदिवासी विकास विषयक सुप्रसिद्ध पंचशीलांचा समावेश आहे.

१९५९ मध्ये तत्कालीन गृहमंत्री पंडित गोविंद वल्लभ पंत यांनी देशांतील काहीं निवडक आदिवासी भागांतील विकास कार्यांचा अभ्यास करण्यासाठीं नियुक्त केलेल्या समितीचे अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती एलविनना केली. या कामासाठीं सुमारे एक वर्षभर आसाम, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, ओरिसा या राज्यांतील आदिवासी भागाचा दौरा करावा. एल्विन यांनीं समितीच्या अहवाल मुख्यमत्र्यांना सादर केला. या अहवालाचे सर्व स्तरांवर चांगले स्वागत झाले. व अनेक परिषदा व बैठकांमध्यें त्यावर चर्चा झाली. एलविनांच्या आदिवासी विकास विषयक मूलभूत संकल्पनांना व्यापक स्तरावर मान्यता मिळाली. १९६० मध्ये श्री. ठेसर यांच्या अध्येक्षतेखालील अनुसूचित जाती जमाती आयोगांवर सदस्य म्हणून काम करण्याची एल्विनना संधि मिळाली. एल्विन यांनी ब्रिटीश नागरिकत्व सोडून भारतीय नागरिकत्व स्वीकारले होतेच. २६जानेवारी १९६१ च्या प्रजासत्ताक दिनी 'पद्मभूषण' सन्मान देऊन एल्विन यांच्या मौलिक कार्याचा भारत सरकारने उचित गौरव केला.

# डॉ. व्हेरियर एल्वीन यांच्या आदिवासी विकास विषयक तात्विक धोरण प्रणालीची उत्क्रांती.

-जॉन गायकवाड

आदिवासींमध्ये प्रत्यक्ष समाज कार्य व सखोल अभ्यास करून झालेल्या अनुभव-सिध्दीवर चिंतन-मनन करून-डॉ. व्हेरियर एल्वीन या महान कर्मयोगीने-आदिवासी विकासाबाबत जी तत्वाधिष्ठींत धोरण प्रणाली देशास प्रदान केली, त्या धोरण-प्रणालीच्या उत्क्रांतीचा संक्षिप्त आलेख -

**एका तत्त्वाचा उगम-** डॉ. व्हेरियर एल्वीन ऑक्सफर्ड विद्यापीठात विद्यार्थीदशेत असतानाच्या त्यांच्या विचारसरणीत - त्यांच्या तत्त्वांचा मुलभूत पाया असल्याचे त्यांचे स्वतःचे प्रतिपादन आहे. लोकांवर कोणतीही गोष्ट ''लादणे'' त्यांना त्या-काळीही मान्य नव्हते.

डॉ. व्हेरियर एल्वीन - परिवर्तन/बदल या प्रक्रियांच्या विरूध्द नव्हते. अगदी १९६२ साली त्यांना आदिवासींमध्ये परिवर्तन/बदल या प्रक्रियांची आवश्यकता मान्य होती. परंतु त्यांना कोणत्या प्रकाराचे परिवर्तन अभिप्रत होते? त्यांना जे परिवर्तन अभिप्रेत होते, ते अधोगतीकडे नेणारे असे परिवर्तन नको होते, तर चांगल्यासाठी परिवर्तन आवश्यक होते.

('Change for the better & not degradation and decay') १९३४ मध्ये ''मॉडर्न रिव्ह्यु'' या नियतकालिकेतून डॉ. एल्वीन यांनी अगदी पहिल्या प्रथम आदिवासी जमातींच्या समस्यावर लेख लिहीला. या लेखाद्वारे डॉ. एल्वीन यांनी बैगा आदिवासींची बिकट आर्थिक परिस्थिती, त्यांचे अज्ञान व त्याचबरोबर मंत्रमुग्ध करणारी त्यांची जीवन पध्दती या बाबीचें यथार्थ चित्रण केले होते.

आदिवासी जीवन पध्दती मंत्रमुग्ध करणारी आहे, परंतु त्यांच्या गरिबी व कष्टांचा नुसता विचार जरी मनात आला तरी निश्चितच झोप उडाल्याशिवाय राहणार नाही, अशा परिस्थितीत ज्या समाजाने पिढयान्-पिढया आदिवासींकडे जाणून- बुजून दुर्लक्ष करून त्यांची अशी अवस्था केली, त्या समाजास काय शिक्षा द्यावी असा प्रश्न मनात आल्याखेरीज राहणार नाही असे डॉ. एल्वीन यांनी या लेखात नमूद केले आहे.

आर्थिक परिस्थिती व आरोग्य विषयक प्रश्न जरी त्या काळात आदिवासींच्या मूलभूत समस्या असल्या तरीही आदिवासींचे सर्व प्रकारच्या शोषणापासून संरक्षण करण्याच्या नितांत आवश्यकतेची जाणीव डॉ. एल्वीन व त्यांच्या सहकाऱ्यांना सातत्याने होती.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील चित्रः**

स्वातंत्र्यपूर्व काळात विकास विषयक योजना तयार करण्यात तसा फारसा वाव नव्हता. किंबहुना आदिवासींच्या भवितव्याबाबत बरीचशी निष्फळ व अवास्तव चर्चा होत असे. आदिवासी विकासाबाबत ज्या योजना होत्या त्या देशाच्या विकासाबरोबर सुसंगत असणे आवश्यक होते. अर्थात त्या काळात या बाबतीत पूर्णपणे अनास्था होती. ग्रामीण भागातील बहुतांशी लोक निरक्षर होते. आरोग्य विषयक व शिक्षण विषयक सुविधा अत्यंत कमी होत्या. दळणवळण विषयक सुविधांची

परिस्थिती अत्यंत बिकट अशी होती. आदिवासीं प्रमाणेच ग्रामीण भागातील लोकांचेही शोषण होत असे. परंतु ग्रामीण भागातील लोकांपेक्षा आदिवासींची परिस्थिती अधिक बिकट होती. कारण आदिवासी जनता पूर्णपणे दुर्लक्षित होती. आदिवासींबाबतचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा होण्याचे आणखी एक कारण म्हणजे स्वराज्याची चळवळ आदिवासी भागात पसरू नये असा ध्यास इंग्रज सरकारला लागला होता व ते या दृष्टीने सर्वतो परीने प्रयत्नशील होते. डॉ. व्हेरियर एल्वीन वनग्रामांना ज्या भेटी देत त्या भेटींवर इंग्रज शासनाची काटेकोरपणे देखरेख असे. आदिवासींसाठी शाळा सुरू करण्यास त्यांना परवानगी नाकारण्यात आली. त्या काळात आदिवासी भागामध्ये रस्ते व दवाखाने जवळ जवळ अस्तित्वात नव्हतेच. शेतीमधील सुधारणांबाबतची संकल्पनाही नव्हती. इतकेच केवळ नव्हे तर, आदिवासींना त्यांच्यावर जुलूम करणाऱ्यांपासून संरक्षणही नव्हते. अर्थात याचा अर्थ असा नव्हता की, काहीही करणे शक्य नव्हते. जे काही शक्य होते ते अत्यंत सिमीत असे होते व त्यावरही अनेक बंधने होती. अशा परिस्थितीत डॉ. व्हेरियर एल्वीन यांनी आपले कार्य चालू ठेवले. आदिवासींवरील जुलूम व अत्याचारांबाबत ते संबंधित वरिष्ठांना तत्परतेने कळवीत. अनुषंगिक सुधारणांबाबत सूचना देत.

आदिवासींबाबत लोकांना अधिकाधिक माहिती व्हावी असा डॉ. एल्वीन यांचा प्रयत्न होता; कारण त्या-काळी आदिवासींबाबत जे काही मानवशास्त्रीय लिखाण होत असे ते लिखाण काही सर्वसामान्यांसाठी नव्हते. आदिवासींबाबत योग्य माहिती नसल्यामुळे सर्वसाधारण समाजामध्ये आदिवासींबाबत अनंत गैरसमज पसरलेले होते. आदिवासी म्हणजे '' वेगळ्या प्रकारचे मानव '' असा सर्वसाधारण समज होता. त्यांच्यातील योग्यतेची/कर्तृत्वाची जाणीव करून न घेता त्यांना केवळ दयेची आवश्यकता आहे असा बऱ्याच लोकांचा समज होता.

डॉ. एल्वीन यांनी असे नमूद केले आहे की- '' जे काही सुंदर होते, जे काही स्वतंत्र होते त्याचे मला संरक्षण करावयाचे होते ''. साध्या सरळ आदिवासींच्या निर्भेळ प्रेमास व आनंदास अपराधीत्वाच्या भावनेची जोड देणाऱ्यांना डॉ. एल्वीन यांनी सदैव विरोध केला.

आदिवासींना विविध विवंचनापासून ( उदा. त्यांच्या जमिनी बाबतच्या, वनातील हक्कांबाबतच्या, उदर- निर्वाहाबाबतच्या ) दूर ठेवण्याचा डॉ. एल्वीन यांनी प्रयत्न केला परंतु या संदर्भात त्यांच्याबाबत केवळ गैरसमज पसरले.

आदिवासींच्या '' संरक्षणाबाबत '' डॉ. व्हेरियर एल्वीन यांनी जे विचार मांडले, त्यावरून बरेच वादंग माजले. '' आदिवासी जसे आहेत, तसेच रहावेत, त्यांचा विकास न होता आदिवासींनी केवळ मानवशास्त्रज्ञांना उपयुक्त असे मानवी संग्रहालयातील नमुने रहावेत '' या व अशा प्रकारची निरर्थक वक्तव्ये डॉ. एल्वीन यांच्या नावांवर खपविण्यात येऊ लागली.

या संदर्भात डॉ. एल्वीन यांनी स्पष्टपणे असे नमूद केले आहे की, '' माझ्यावर टीका करणाऱ्यांनी मी नेमके काय लिहीले आहे हे वाचून पाहण्याची तसदीसुध्दा घेतली नाही ''.

**आदिवासी संस्कृतीचे संरक्षण- '' नियोजित व नियंत्रित संपर्क '':**

आदिवासींचा विकास अत्यंत काळजीपूर्वक विचारांती करणे नितांत आवश्यक असल्याचे डॉ. एल्वीन यांनी नमूद केले आहे. आदिवासींच्या विकासाबाबत संभाव्य टप्पे त्यांनी ढोबळपणे दिले आहेत.

१ ) काळजीपूर्वक नागरीकरण.

२ ) त्यांच्या स्वत:च्या जीवनाबद्दल त्यांना अभिमान असला पाहिजे.

३) आर्थिकदृष्ट्या त्यांनी स्वत:च्या पायावर उभे राहणे ही नितांत आवश्यक अशी बाब आहे.

४) त्यांच्या भूतकाळाचा रास्त अभिमान बाळगून अशा पध्दतीने पुढे जायचे आहे की- त्यांच्या नैसर्गिक उत्क्रांतीचा एक भाग म्हणून ''विकास'' साधला गेला पाहिजे.

या क्रमाने आदिवासी विकास साधला गेल्यास बाहेरील जगाबरोबर त्यांचा संपर्क आल्यावर बाहेरील जगाचा (विकसित भागाचा) झगमगाट पाहून ते भारावून जाणार नाहीत.

१९३५-१९४० या कालावधीत डॉ. एल्वीन यांना आदिवासींच्या संरक्षणाबाबतच्या नितांत आवश्यकतेबाबतचे महत्त्व पटले होते. १९३९ मध्ये प्रकाशित झालेल्या त्यांच्या ''द बैगा'' या पुस्तकात त्यांनी देशातील दुर्गम आदिवासी भागास राष्ट्रीय उद्यानासम (National Park) योजना राबविण्याबाबत लिहीले आहे. अर्थात या योजनेंतर्गत आदिवासी विकासासाठी कांहीही करावयाचे नाही असे अभिप्रेत नव्हते. (राष्ट्रीय उद्यान या संकल्पनेचा शब्दश: अर्थ जरी डॉ. एल्वीन यांना अभिप्रेत नव्हता तरीही त्यांच्या टीकाकारांनी त्यांचे एकंदरीत लिखाण विस्तृतपणी न वाचता केवळ ''राष्ट्रीय उद्यान'' या संकल्पनेचा शब्दश: अर्थ घेतला.)

मात्र ''राष्ट्रीय उद्यान'' या शिर्षकांतर्गत विकासासाठी एक उत्तम प्रकारची सर्वकष अशी योजना प्रस्तावित केली होती.

या योजने अंतर्गत:

- आदिवासी भागातील विकासासाठी आदिवासी आयुक्तांची नियुक्ती प्रस्तावित करण्यात आली होती.

- या प्रस्तावित क्षेत्रांतर्गत आदिवासींना आनंदाने व मुक्तपणे जगण्यास प्रशासनाने मुभा द्यावयाची होती.

पारंपरिक जमात पंचायतींना त्यांचे अधिकार पूर्णपणे देऊन त्यांचे पुनरूज्जीवन करावयाचे होते.

- आदिवासी भागात स्थायिक होण्यासाठी बिगर आदिवासींना परवाना घेणे आवश्यक करावयाचे होते.

- कोणत्याही धर्माच्या प्रसारकांना आदिवासी भागातील जीवनात ढवळाढवळ करण्यास परवानगी द्यावयाची नव्हती.

- आदिवासी जीवनाचा, संस्कृतीचा विध्वंस न करता आदिवासींचे स्वातंत्र्य अबाधित राखून आदिवासी भागातील आदिवासींच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावयाचे होते.

- आर्थिक विकासास सर्वाधिक प्राधान्य द्यावयाचे होते.

- स्थानिक परिस्थितीनुरूप मूलभूत शिक्षण अगदी सुलभपणे द्यावयाचे होते.

- शिकार करण्यास व उपलब्ध वनोत्पादनांचा उपयोग करण्याची आदिवासींना मुभा द्यावयाची होती.

- दुय्यम दर्जाच्या कर्मचाऱ्यांचा/अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार व हुकूमशाही संपुष्टात येणे अपेक्षित होते.

थोड्या कालावधीनंतर डॉ. एल्वीन यांनी लिहीले की, अगदी दुर्गम प्रदेशातील आदिवासींना तीन बाबतीत स्वातंत्र्य मिळण्यासाठी लढा देण्याची नितांत आवश्यकता आहे-

१) भयापासून स्वातंत्र्य,

२) गरजांपासून स्वातंत्र्य, व

३) हस्तक्षेपापासून स्वातंत्र्य.

- त्याचप्रमाणे आदिवासींवर सावकार, जमीनदार, भ्रष्ट कर्मचारी/ अधिकारी यांनी कसल्याही प्रकारे जुलूम व अन्याय करू नये. त्याचप्रमाणे आदिवासींची कोणीही फसवणूकही करू नये.

- आदिवासींच्या आरोग्य विषयक प्रश्नांकडे लक्ष देण्याच्या दृष्टीने त्यांना आरोग्य सेवा विषयक सोयी सुविधा उपलब्ध होण्याची नितांत आवश्यकता आहे.

- आदिवासींचे संगीत, नृत्य, सण-उत्सव, स्वातंत्र्य व हास्य लुप्त होईल असे कांहीही न करण्याची खबरदारी घेतली गेली पाहिजे.

ही जी धोरणप्रणाली होती त्यात कोठेही, कोणत्याही प्रकारे आदिवासींना ''पूर्णपणे अलिप्त'' ठेवण्याची योजना नव्हती; तर या धोरण प्रणालीत केवळ ''नियोजित व नियंत्रित संपर्क'' (Planned and controlled contact)अभिप्रेत होता.

आदिवासी जमातींच्या संस्कृतीचे जतन करण्याचा प्रश्न नव्हता; तर प्रश्न होता आदिवासींचा शोषणापासून, पिळवणुकीपासून संरक्षण करण्याचा, त्यांना जीवदान देऊन त्यांचा विकास करण्याचा.

(प्रत्यक्षात आज भारत सरकारने आदिवासी आयुक्त नेमले आहेत, विविध राज्यांमध्ये आदिवासी विकास/कल्याण विभाग सुरू करण्यात आले आहेत. डॉ. एल्वीन यांनी अगदी पूर्वी जे काही प्रस्तावित केले होते त्याच धर्तीवर या गोष्टींची अंमलबजावणी होत आहे.- आदिवासींच्या पारंपरिक जमात पंचायतींचे पुनरूज्जीवन करण्याबाबतची शक्यता केंद्र शासनाने काही महिन्यांपूर्वीच अजमावून पाहण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु डॉ. एल्वीन यांनी नेमके काय प्रस्तावित केले आहे हे लक्षपूर्वक न वाचता केवळ '' राष्ट्रीय उद्यान'' या शब्द समूहाचा/ संकल्पनेचा शब्दश: अर्थ करून घेतला गेला हे केवळ दुदैव. )

## <u>समाजकार्यातून अनुभवसिध्दी</u> :

ज्या कठोरपणाने आदिवासींकडे वर्षानुवर्षे दुर्लक्ष झाले याची भरपाई म्हणून डॉ. व्हेरियर एल्वीन यांनी आदिवासीं समवेत राहून, अगदी ते जगतात तसे जीवन व्यतीत करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. आदिवासी ज्या प्रकारच्या घरांमध्ये राहतात, त्या प्रकारच्या घरात ते राहिले. त्याचप्रमाणे आदिवासींना ज्या मानसिक दडपणांचा सामना करावा लागतो त्याचाही अनुभव डॉ. एल्वीन यांनी घेतला. आदिवासींना शासकीय अधिकाऱ्यांकडून ज्या छळवणुकींचा सामना करावा लागत होता त्याचाही त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला. इतकेच नव्हे तर आदिवासी भागातील आदिवासींना मलेरिया सारखे जे आजार होत (त्याकाळी) त्या आजारांचाही डॉ. एल्वीन यांना सामना करावा लागला. (डॉ. व्हेरियर एल्वीन यांच्याबरोबर डॉ. शामराव हिवाळे होते.) हे सर्व प्रत्यक्ष पाहिल्यावर हजारो आदिवासींचे मन हेलावून गेले व डॉ. एल्वीन व त्यांच्या सहकाऱ्यांच्या मनात, त्यांच्याविषयी सहानुभूति, करूणा व स्नेह आहे याची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली.

अर्थात केवळ इतक्या कार्यावर ते थांबणार नव्हते. त्यांनी शाळा व दवाखाना सुरू केला. या दवाखान्यामुळे डॉ. शामराव हिवाळे यांना अगदी थोडया कालावधीत जवळ जवळ १०० मैल परिसरात प्रसिध्दी मिळाली. अगदी दूर-दूरचे लोक डॉ. हिवाळेंकडे औषधोपचारासाठी येऊ लागले. या व्यतिरिक्त-

अ) जेव्हा जेव्हा त्या भागातील आदिवासींमध्ये काही वाद/भांडणे होत त्यावेळी डॉ. एल्वीन व डॉ. हिवाळे त्यांच्यात यशस्वीपणे समेट घडवून आणीत.

ब) त्या भागातील आदिवासींची शासकीय अधिकाऱ्यांबरोबर कांही कुरबुर झाल्यास डॉ. एल्वीन व डॉ. हिवाळे आदिवासींच्या मदतीस धावून जात .

क) आदिवासींवर शासकीय अधिकाऱ्यांनी खटले भरल्यावर डॉ. एल्वीन व डॉ. हिवाळे आदिवासींना सल्ला देत.

डॉ. व्हेरियर एल्वीन या संदर्भात असे नमूद करतात की आदिवासीं-करिता त्यांना जे कांही शक्य होते ते सर्व कांही ते करीत

होते, व यातूनच त्यांना आदिवासींच्या जीवनातील नेमक्या गरजांची कल्पना येण्यास मदत झाली.

या व्यतिरिक्त एक अत्यंत महत्वाची गोष्ट म्हणजे डॉ. एल्वीन व डॉ. हिवाळे यांनी कुष्ठ रोग्यांसाठी आश्रम सुरू केला. या आश्रमामुळे अनेक दुःखी, निराश्रीत जीवांना दिलासा व आश्रय मिळाला. इतकेच केवळ नव्हे, तर या आश्रमामुळे ''रोग प्रसारास '' अटकाव करणे निश्चितच शक्य होऊ शकले.

आदिवासींचा / विकास त्यांच्याच हातात आहे हे जाणून डॉ. एल्वीन व त्यांच्या सहकाऱ्यांनी आदिवासींमध्ये समाज कार्य करताना सातत्याने त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली. डॉ. एल्वीन व त्यांच्या सहकाऱ्यांना आदिवासींची बाजू घेऊन पोलीस अधिकारी, वन विभागातील अधिकारी, व्यापारी इत्यादींबरोबर अनेक लढे लढावे लागले. याचा परिणाम असा झाला की डॉ. एल्वीन व त्यांचे सहकाऱ्यांची बदनामी करण्यासाठी त्यांच्या विरूध्द बिगर आदिवासी. वाटेल तशा अफवा पसरवू लागले. गावकऱ्यांना असे सांगण्यात येऊ लागले की,- अस्पृश्यांनी काढलेले पाणी यांच्या औषधांत असते,

- लोकांचे धर्मांतर ( ख्रिस्ती धर्मात ) करण्याची यांची योजना आहे,
- ते तुमच्या मुला-मुलींना दूरवर शहरातील संस्थांमध्ये पाठवून देतील,

योगायोगाने एका सब-इन्स्पेक्टरला गुप्तरोग झाला व त्यास डॉ. शामराव हिवाळे यांनी बरे केले. याचा परिणाम असा झाला की, शासकीय अधिकारी व कर्मचारी वर्गातील लोकांचा डॉ. एल्वीन व त्यांच्या सहकाऱ्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला, वागणूक बदलली.

## स्वातंत्र्योत्तर काळातील चित्र :

स्वातंत्र्योत्तर काळात डॉ. व्हेरियर एल्वीन यांची अशी भूमिका होती की, अति दुर्गम भागातील काही जमातींना काही काळासाठी मुख्य प्रवाहापासून दूर रहावे लागेल; अर्थात ही भूमिका केवळ तात्विक नव्हती तर त्यावेळच्या परिस्थितीनुरूप आवश्यक होती; हे विसरून चालणार नाही.

स्वातंत्र्यानंतर मात्र अगदी नेफा सारख्या दुर्गम आदिवासी प्रदेशासाठीसुद्धा डॉ. व्हेरियर एल्वीन यांच्या भूमिकेत परिस्थितीनुरूप असा महत्वपूर्ण बदल झालेला आढळून येतो.
( ''ए फिलॉसफी फॉर नेफा- या त्यांच्या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीत ही भूमिका विशद करण्यात आली आहे. )

देशास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशभर एक महान जागृती झाली. आदिवासींना नकाशावर स्थान मिळाले. देशातील वृत्तपत्रे त्यांची दखल घेऊ लागले. विकासासाठी महान योजना आखण्यात आल्या. इंग्रजांनी राबविलेल्या योजना स्वतंत्र भारतासाठी निश्चितच कुचकामी होत्या हे स्पष्ट झाले. आदिवासींना राष्ट्रीय प्रवाहात सामावून घेण्याबाबतची एक नवीन उर्मी निर्माण झाली.

स्वातंत्र्यानंतरची काही वर्षे पंचवार्षिक योजना नव्हत्या. भारताच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वंकष मोठ्या योजना नव्हत्या. आदिवासी भागात शाळा व दवाखाने उघडणे इतकेच सिमित धोरण त्याकाळी आदिवासी भागात काम करणाऱ्या समाज सेवकांमध्ये होते.

## विकासासाठी पंचवार्षिक योजनाः

पंचवार्षिक योजनांमध्ये पूर्ण देशातील आदिवासींच्या विकासावर कोट्यावधी रूपये खर्च करण्याचे ठरविल्यानंतर डॉ. व्हेरियर एल्वीन यांनी या रकमेत भरघोस वाढ करण्याची शिफारस केली हे लक्षात घेणे निश्चितच आवश्यक आहे.

व्यापक प्रमाणावर विकास योजना हाती घेऊन, व अगदी दुर्गम प्रदेशात रस्ते बांधल्यानंतर आदिवासी जसे आहेत तसे राहणार नव्हते.

आदिवासींना मुख्य प्रवाहापासून अलिप्त ठेवायचे की मुख्य प्रवाहात आणायचे हा मुलभूत धोरणात्मक प्रश्न स्वातंत्र्य प्राप्तीबरोबरच संपुष्टात आला आहे. म्हणूनच त्याच त्याच मुद्यांवर सतत होणारी चर्चा ही निश्चितच कालबाह्य व निष्फळ अशीच होती. आदिवासी विकासाबाबत चर्चा करावयाची असल्यास विकास योजनांच्या तपशीलाबाबत ठोस चर्चा होणे आवश्यक आहे, अशी डॉ. व्हेरियर एल्वीन यांची कल्पना होती. (ही संकल्पना सद्य: परिस्थितीतही कालबाह्य झालेली नाही.)

डॉ. व्हेरियर एल्वीन यांच्या मते आधुनिक भारतात आदिवासी भागातील विकास योजनांचा वेग इतर भागातील विकास योजनांपेक्षा अधिक असला पाहिजे. म्हणजे आदिवासी समाजास पुढारलेल्या समाजाबरोबर येणे शक्य होईल. याबरोबरच आर्थिक विकासाचे कार्यक्रम, आरोग्य विषयक कार्यक्रम व दळणवळण सुसह्य होण्यासाठी अधिकाधिक रस्ते यावर विशेष भर देणे आवश्यक होते.

आदिवासींचा विकास होण्यासाठी पूर्ण देशाने प्रेमाने व सन्मानाने वागविणे आवश्यक आहे असे डॉ. एल्वीन यांना ठामपणे वाटत होते.

डॉ. व्हेरियर एल्वीन यांची दृढ संकल्पना होती की, आदिवासींना जसे इतरांकडून घेण्यासारखे बरेच काही आहे तसेच आदिवासींकडूनही इतरांनी घेण्यासारखे बरेच कांही आहे. " राष्ट्रहिताचे फलद्रुप सहकार्य" शक्य होण्यासाठी सुसह्य दळणवळण असण्याची नितांत आवश्यकता त्यांनी ओळखली होती.

(.... in the context of modern India, development in the tribal areas must be much more intensive than elsewhere to enable them to catch up with their neighbours, that special emphasis must be laid on economic programmes and on health, and that very large sums of money must be spent on roads to make the people accessible. The unity of the hills and plains is as essential to the general national interest as it is to that of the hill and forest people themselves. We may indeed look forward to an enriching process of mutual fertilisaion. We have much to give the tribes and they have much to give us.... )स्वातंत्र्यानंतर सामुहिक विकासाबाबतची चळवळ उदयास आली. हे पाहून डॉ. व्हेरियर एल्वीन यांना प्रकर्षाने जाणवले की " कार्यपध्दती " व " दृष्टीकोन " यांचा अधिकाधिक पाठपुरावा करणे हेच त्यांचे या संदर्भातील आद्य कर्तव्य होते व त्यानुसार स्वातंत्र्यानंतर पहिली पाच (५) वर्षे त्यांनी आदिवासींबाबत काय दृष्टीकोन असावा व आदिवासींमध्ये व इतरांमध्ये कोणत्या प्रकारच्या मानसिक व सामाजिक तडजोडी आवश्यक आहेत याबाबत लिखाण व विवेचन केले.

**ध्यावयाची खबरदारी:**

डॉ. व्हेरियर एल्वीन यांनी काही धोक्याच्या सूचना देऊन त्या संदर्भात योग्य ती खबरदारी घेण्याबाबत स्पष्टपणे बजावले होते.

- आदिवासींवर अनेक योजनांचा " मारा करणे " - योग्य होणार नाही. ('Overwhelming the people with too many schemes.').
- बाहेरील तांत्रिक सुबत्तेमुळे आदिवासींमध्ये न्युनगंडाची भावना निर्माण होऊ शकेल.

('depressing them by our technological superiority and creating an inferiority complex.')

- बाहेरील लोकांची मोठ्या प्रमाणावर आदिवासी भागात " गर्दी " वाढल्यास अनेक गुंतागुंतीच्या

समस्या निर्माण होतील.

('creating an inferiority complex and anxiety about their land by importing too many outsiders into their villages.')

डॉ. व्हेरियर एल्वीन यांनी अगदी सुरूवातीच्या काळात आदिवासी संस्कृतीचे जतन करण्याबाबत विचार केला. तथापि नंतर त्यांनी स्वत:च आपल्या विचारात एक महत्वाचा बदल केलेला दिसून येतो. त्यांनी असे प्रतिपादन केले की संस्कृती जिवंत राहिली पाहिजे व जे काही जिवंत आहे ते स्थिर राहू शकत नाही तर त्यात बदल निश्चितच अभिप्रेत असतात. (या संदर्भात डॉ.व्हेरियर एल्विन यांना जे काही अभिप्रेत होते ते पंडित नेहरूंच्या विचारातून अगदी संक्षिप्तपणे व्यक्त झालेले दिसून येते. ''आदिवासींनी आपली परंपरा, बुद्धी व कुवत यांनुसार विकास करून घ्यावा. इतरांनी त्याच्यांवर दडपण आणू नये. त्यांच्या पारंपरिक संस्कृतीस व कलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

('developing the tribal people along the lines of their own traditioin and genious.')

१९४८ साली श्री. नरी रूस्तुमजी यांनी जी ठोस धोरण प्रणाली मांडली ती जगातील कोणत्याही संस्कृतीस निश्चितच लागू होण्यासारखी आहे. आदिवासींचे नागरीकरण व उन्नती या विषयावरील निष्फळ व बेजबाबदार वक्तव्यांचा त्यांनी स्पष्टपणे धिक्कार केला आहे.

- सामाजिक कार्यकर्ते व अधिकाऱ्यांनी आदिवासींमध्ये जाऊन हुकूम सोडणाऱ्या धन्याची नव्हे तर प्रेमळ, समजूतदार, अनुभवी थोरल्या भावाची भूमिका करणे अभिप्रेत आहे.

- सगळीकडे एकाच साच्यातली एकाच प्रकारची प्रशासकीय यंत्रणा लादण्यात येऊ नये.

- दुर्गम डोंगराळ प्रदेशातील आदिवासींची जी न्याय संस्था आहे त्या संस्थेस इतर ठिकाणच्या न्यायसंस्थांच्या बरोबरीने आणण्याचा प्रयत्न होऊ नये.

- ज्या भागातील लोकांमध्ये न्यायाची भावना ही अंगभूत/ मुलभूत भावना आहे. त्या भागात भ्रष्ट, बदनाम व कालापव्यय करणारी व गैरवापर होण्याची शक्यता असलेली कोणतीही संस्था/पध्दती लादली जाऊ नये, कारण त्या भागातील न्यायाची जी अंगभूत भावना आहे त्यामुळे तेथील न्यायसंस्था ही निश्चितच कार्यक्षम व गतीमान असते.

डॉ./ व्हेरियर एल्वीन यांनी १९४९ साली असे मत व्यक्त केले की आदिवासींसाठी ज्या विशेष संरक्षणात्मक तरतुदी व सवलती देण्यात आल्या आहेत त्या सवलतींचा परिणाम देशाच्या ऐक्यावर होऊ नये म्हणूनच आदिवासींमध्ये, ते या गणराज्याचे पूर्ण नागरिक आहेत व त्यांनाही सर्व अधिकार व कर्तव्ये आहेत अशी भावना निर्माण होणे अत्यावश्यक आहे व हे शक्य होण्यासाठी आदिवासींना शिक्षण देण्याची नितांत आवश्यकता आहे.

(.... 'the special care and protection given to the tribesmen must not cast any shadow on the unity of India. They must be educated to feel that they are full citisens of the Republic, with real rights and still more urgent duties.'...) त्या काळात देशातील बहुतेक आदिवासी भागातील प्रश्न तुलनात्मकरित्या साधे होते. कारण बहुतेक ठिकाणी लोकांना संरक्षण विकास व सामाजिक न्याय आवश्यक होते. या व्यतिरिक्त इतर कांही ठिकाणी ही समस्या निश्चितच गुतांगुतीची व जटील अशी होती. उदा. सावरा व मुरिया-

या जमाती त्या काळात समृध्द, समाधानी, आनंदी, उत्कट अर्थपूर्ण असे आदिवासी जीवन

व्यतीत करीत होत्या.

नेफा व ईशान्य भागातील जमातींनी आपल्या प्राचीन संस्कृतीचे व्यवस्थितपणे जतन केले होते. भारतात इतर कोठेही पहावयास दुर्मिळ अशी कला तेथे उत्तमरित्या विकसित होण्याच्या मार्गावर होती.

- आदिवासी जीवन अद्यापही उत्कट व अर्थपूर्ण असे होते. या जमातींमध्ये कशाचेही पुनरूज्जीवन करावयाचा प्रश्नच उद्भवत नव्हता. किंबहुना तेथे प्रश्न होता तो पारंपारिक जीवनातील सांस्कृतिक मूल्यांचा ऱ्हास न करता ''बदल'' या प्रक्रियेस चालना देण्याचा.

या समस्येबाबत आदिवासी विकासाबाबत श्री. नरी रूस्तुमजी यांनी बरीच वर्षे चिंतन-मनन केले होते. त्यांचे विचार ईशान्य सरहद्द प्रांत विभागात अंमलात आले होते. (डॉ. व्हेरियर एल्वीन यांनी ''ए फिलॉसॉफी फॉर नेफा'' हे पुस्तक लिहिले त्यावेळी त्यांना श्री. नरी रूस्तुमजी यांचे कोणतेही साहित्य उपलब्ध होऊ शकले नाही, असे त्यांनी नमूद केले आहे.) श्रीं. रूस्तुमजी यांनी १९५३ मध्ये जे काही लिहिले त्याबाबत डॉ. व्हेरियर एल्वीन यांनी असे म्हटले आहे की ''मला जे काही अभिप्रेत होते, अगदी तेच श्री. रूस्तुमजी यांनी लिहिले आहे.''

- या दुर्गम प्रदेशात नृत्य व संगीत हे दैनंदिन जीवनाचे अविभाज्य घटक आहेत, येथील लोक निर्भयपणे व मोकळेपणाने विचार करू शकतात व बोलू शकतात व म्हणूनच तेथे जीवनाचे सौंदर्य आजही अस्तित्वात आहे.

- ''आधुनिक'' किंवा पुढारलेल्या ''प्रथा ज्या तेथील विचारसरणीस अयोग्य असतील व आदिवासी संस्कृतीस अंगभूत असलेल्या चांगल्या गोष्टींचा विंध्वंस करतील अशा कोणत्याही प्रथांना आदिवासी भागातील कार्यकर्त्यांनी उत्तेजन देऊ नये.

-आदिवासींचा दृष्टीकोन अत्यंत स्वच्छ, सरळ व निकोप असतो, शहरी लोकांच्या जीवनात जी गुंतागुंत व धावपळ असते या सर्वांपासून दुर्गम भागातील आदिवासी अलिप्त (आनंदाने) आहेत.

-आदिवासी भागात कार्य करावयाचे झाल्यास त्यांच्या सांस्कृतिक संस्थांच्या, त्यांच्या बोली भाषेचा, त्यांच्या संगीताचा/गायनाचा मान राखणे अत्यंत आवश्यक आहे कारण असे केल्यास जे काम करावयाचे आहे ते काम पूर्णत्वास नेण्यासाठी लोकांचा जो विश्वास आवश्यक आहे तो संपादन करणे सहज शक्य होते.- यासाठी या क्षेत्रात कार्य करण्यासाठी पहिल्या प्रथम स्थानिक बोलीभाषा आत्मसात करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ज्या भागात कार्य करण्याचे आहे; त्या भागातील लोकांच्या चालिरिती, त्यांच्या दृष्टीकोनातून समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे.

- आपण जर आपले कार्य करतांना चुकीची/सदोष पध्दत अवलंबिली व त्यामुळे जर आदिवासींच्या संस्कृतीमधील चांगल्या मूल्यांचा ऱ्हास/विध्वंस झाला तर आपले कार्य कितीही चांगले असले तरी ते कार्य निरूपयोगी असेच ठरेल.

## ''ए फिलॉसफी फॉर नेफा'':

नेफामधील आदिवासी विकास व बदल या विषयावरील डॉ. एलूविन यांच्या सुरवातीचे तात्त्विक चिंतन,- त्यांनी राज्यपालांना सादर केलेल्या एका अहवालात होते.

(आदिवासी विकासाबाबत डॉ. व्हेरियर एलूविन यांनी पुढे जे कांही विस्तृतपणे लिहिले आहे त्या सर्वाचा सारांश या अहवालात होता. डॉ. व्हेरियर एलूविन यांनी या संदर्भात असे नमूद केले आहे की, दुर्दैवाने हा अहवाल शासकीय

यंत्रणेमार्फत '' गोपनीय '' ठेवण्यांत आला होता. )

हा अहवाल नंतर तत्कालीन पंतप्रधान श्री. पं. जवाहरलाल नेहरू यांना पाठविण्यात आला. पं. नेहरूंनी एक दीर्घ टिपणी लिहून या अहवालातील डॉ. व्हेरियर एल्विन यांच्या म्हणण्याचें समर्थन केले. त्यानंतर डॉ. व्हेरियर एल्विन , त्यांच्या सहकाऱ्यासह २-३ वर्षे आदिवासींच्या विविध समस्या व विकास विषयक धोरणप्रणाली ठरविण्यासाठी नेफाच्या सचिवालयात कार्यरत होते. या कालावधीत कधी राजभवनात राज्यपालांबरोबर तर कधी त्यांच्या स्वत:च्या राहत्या घरी या संदर्भातील विविध पैलूंवर चर्चा होई. या सत्रांमधून '' आदिवासींचा धर्म ''- यापासून आदिवासींची वेशभूषा/कपडे- अशा सर्व पैलूंवर विस्तृत चर्चा करण्यात आली. प्रशासनाने या सर्व सत्रातील निर्णायक बाबींची '' मार्गदर्शक मालिका '' तयार केली. प्रशासनाने डॉ. व्हेरियर एल्विन यांना या मार्गदर्शक मालिकेवरून पुस्तक लिहिण्याबाबत सुचविले. यातूनच '' ए फिलॉसफी फॉर नेफा '' या पुस्तकाचा जन्म झाला.

या पुस्तकाची पहिली आवृत्ति संक्षिप्त होती- या पुस्तकास लाभलेली पं. जवाहरलाल नेहरूंची स्फूर्तिदायक प्रस्तावना व या पुस्तकाची सर्वत्र झालेली प्रशंसा यामुळे डॉ. व्हेरियर एल्विन यांना पुस्तकाची दुसरी आवृत्ती विस्तृतपणे लिहून काढण्यास प्रेरणा मिळाली. ही दुसरी आवृत्ती १९५७ मध्ये प्रकाशित झाली व या आवृत्तीसाठी पं. जवाहरलाल नेहरू यांची नवीन प्रस्तावना लाभली होती. व या प्रस्तावनेतच पं. जवाहरलाल नेहरू यांनी आपली प्रसिध्द '' पंचशील '' ( आदिवासी विकासाची पाच तत्वे ) नमूद केली आहेत. ( दोन वर्षानंतर या पुस्तकाचे पुन्नर्मुद्रण करण्यात आले. व नंतर या पुस्तकाचा हिंदी व आसामी भाषांमध्ये अनुवाद करण्यात आला )

'' ए फिलॉसफी फॉर नेफा '' या पुस्तकात- आदिवासींच्या दैनंदिन गरजा, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व मानसिक प्रश्न या सर्व बाबी व्यतिरिक्त आदिवासींच्या मूलभूत प्रश्नांवर चर्चा करण्यात आली आहे.

स्वातंत्र्यानंतर अतिदुर्गम भागातील आदिवासींनाही मुख्य प्रवाहात समाविष्ट करून घेण्याची त्यांची भूमिका, या त्यांच्या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीत विशद करण्यात आली आहे. आदिवासींची संस्कृति व त्यांची जीवनप्रणाली आहे त्या स्थितीत गोठविण्याची त्यांची भूमिका नव्हती.

आदिवासींचा विकास करतांना त्यांच्यावर काहीही लादायचे नव्हते तर त्यांच्या संस्कृति व परंपरांच्या आधारे त्यांना विकासासाठी उत्तेजन द्यायचे होते. त्यांनी आपल्या भूतकाळाच्या अनुषंगाने नैसर्गिक उत्क्रांती अन्वये स्वत:चा विकास साधावयाचा आहे असे अभिप्रेत आहे. आदिवासी विकासाशी निगडित असलेल्या अधिकाऱ्यांकडून ज्या अपेक्षा आहेत, त्या पं. जवाहरलाल नेहरूंनी स्पष्टपणे नमूद केल्या आहेत. आदिवासी लोकांना त्यांच्या इच्छेनुरूप स्वत:चा विकास करण्यास पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे. त्यांच्यावर राज्य केले जात आहे. अशी त्यांची भावना होणार नाही यासाठी योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक आहे. ज्या गोष्टी त्यांच्या दृष्टीने परक्या आहेत, अशा गोष्टी त्यांच्यावर लादल्या गेल्यास ते मुख्य प्रवाहापासून निश्चितच दुरावतील. पुष्कळशा आदिवासी जमातींमधील '' युवागृहे '' या परंपरागत संस्थेचा उपयोग शैक्षणिक संस्थांचा पाया भक्कम करण्यासाठी करणे शक्य आहे असे पं. जवाहरलाल नेहरूंनी नमूद केले आहे. '' नेफामधील आदिवासींच्या परंपरागत जमात पंचायतींचा विकास व या पंचायतींना असलेले अधिकार या गोष्टींचा तेथील आदिवासी विकासात महत्वाचा वाटा आहे असे डॉ. व्हेरियर एल्विन यांनी नमूद केले आहे. नेफामध्ये बाहेरील

व्यापाऱ्यांना स्थायिक होण्यास परवानगी नव्हती. स्थानिक आदिवासींना व्यापार उद्योगात पडण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे धोरण अत्यंत यशस्वी ठरले. ( ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे. ) आदिवासींच्या कलासुंदर कौशल्यपूर्ण वस्त्रोद्योग, संगीत व नृत्य या सर्वांना भ्रष्ट न करता प्रोत्साहन द्यावयाचे होते. प्रत्यक्षात या सर्व बाबींमध्ये सातत्याने विधायक बदल होतच असतात. आदिवासी भागात बांधावयाच्या इमारतीबाबत ( शासकीय इमारतीसह ) डॉ. व्हेरियर एल्विन यांचे असे मत होते की आदिवासी भागातील इमारती त्या भागात साजेशा अशाच असल्या पाहिजेत. ( अर्थात हा विचार यशस्वी होऊ शकला नाही हे दुर्दैवच म्हणावे लागेल. )

आदिवासी भागात जाणारे अधिकारी, कर्मचारी व समाजसेवक या सर्वांनी आदिवासींना पूर्णपणे मानावे व मित्रत्वाची वागणूक द्यावी अशी या धोरणप्रणालीची अपेक्षा आहे.

डॉ. व्हेरियर एल्विन यांनी आदिवासी विकासाबाबत जे धोरण विकसित केले त्याचा उगम पहिल्या प्रथम नेफाच्या संदर्भात जरी झाला असला तरी हे धोरण इतर भागातील आदिवासींच्या विकासासाठी निश्चितच उपयुक्त असे आहे. कांही भागात आदिवासींच्या कर्जबाजारीपणाची गंभीर समस्या आहे तर कांही भागात वाढत्या औद्योगिकरणाचे परिणाम दुर्लक्ष करण्यासारखे नाहीत. निरनिराळ्या भागातील समस्या जरी विविध असल्या तरी या धोरण प्रणालीतील मूलभूत दृष्टीकोन निश्चितच सर्वत्र उपयुक्त आहे.

### ''ए न्यु डील फॉर ट्रायबल इंडिया''

''ए फिलॉसफी फॉर नेफा''या पुस्तकात डॉ. व्हेरियर एल्विन यांची आदिवासी विकासविषयक धोरणप्रणाली अगदी स्पष्टपणे व्यक्त झाली आहे. अर्थात ही धोरणप्रणाली या पुस्तकाव्यतिरिक्त आणखी दोन प्रकाशनांमध्ये व्यक्त झालेली आहे.

बहुउद्देशीय आदिवासी गट- समितीचा अहवाल,

सदरहू समितीचे अध्यक्ष या नात्याने या अहवालाचे बहुतेक लिखाण डॉ. व्हेरियर एल्विन यांनीच केले आहे.

( २ ) अनुसूचित जमाती आयोग अहवाल ( ढेबर आयोग )

डॉ. व्हेरियर एल्विन या आयोगाचे एक सदस्य होते. या आयोगाचा अहवाल ७५० पानांचा होता म्हणून श्री. ढेबर यांनी डॉ. व्हेरियर एल्विन यांना या अहवालाचे संक्षिप्त रूपांतर करण्यास सांगितले. हे संक्षिप्त रूपांतर म्हणजेच डॉ. व्हेरियर एल्विन यांचे ''ए न्यू ड्रील फॉर ट्रायबल इंडिया'' हे पुस्तक.

ढेबर आयोगाने विकासाबरोबर ''सामाजिक न्याय'' व ''संरक्षण'' यावर भर दिला आहे. या अहवालावर संसदेत भरपूर चर्चा झाली व तदनंतर हा अहवाल संसदेने स्वीकारला. ही बाब डॉ. व्हेरियर एल्विन यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची होती; कारण या तत्त्वांना स्वतंत्र भारताच्या संसदेने राजमान्यता दिली होती. इतकेच केवळ नव्हे तर यामुळे आदिवासींवरील अन्याय, अत्याचार व पिळवणूक या विरूध्द युध्द पुकारण्याचे महत्व पटवून देणाऱ्या डॉ. व्हेरियर एल्विन यांच्यावरील हल्ले निश्चितच असमर्थनीय ठरतात.

### टीकाकारांचा हल्ला

डॉ. व्हेरियर एल्विन यांनी प्रस्तावित केलेली आदिवासी विकास विषयक धोरणप्रणाली ज्या सैध्दांतिक तत्त्वावर आधारित होती त्या तत्त्वांवर बरीच टीका झाली. कांही लोकांचे असे म्हणणे आहे की आदिवासींना जर राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घ्यायचे असेल तर मुख्य प्रवाहात

त्यांचे पूर्णपणे सामिलीकरण (assimilation) करणे नितांत आवश्यक आहे. व हे करत असतांना त्यांची संस्कृति, परंपरा, बोलीभाषा, वेशभूषा यातील, ( चांगल्या गोष्टींसह ) कांहीही जतन करण्याचा आग्रह धरण्याची आवश्यकता नाही. परंतु या विचारातील फोलपणा डॉ. व्हेरियर एल्विन यांनी उदाहरणासह स्पष्टपणे नमूद केला आहे. तथाकथित मुख्य प्रवाहातील भारतीय संस्कृतिचा बारीक विचार केला तरी असे दिसते की, ही संस्कृति कोठेही एकसंघ नाही, तर ही संस्कृति पूर्णपणे वैविधतेने नटलेली आहे.

अशा परिस्थितीत आदिवासींनी अंगिकारण्याकरिता नेमकी कोणती संस्कृति प्रमाणित मानावी ? हा प्रश्न निश्चितच उदभवतो. केवळ फोलपणाच नव्हे तर यातील धोकाही लक्षात घेणे नितांत आवश्यक आहे. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे नागा बंडखोर किंवा स्वतंत्र राज्याची मागणी करणारे आसामचे लोक. नागा बंडखोर किंवा आसामचे बंडखोर हे त्यांच्या मूळ आदिवासी संस्कृतिपासून पुष्कळसे दूर गेले असून तथाकथित मुख्य प्रवाहात पूर्णपणे मिसळलेले दिसतात. इतके की ते आदिवासी आहेत हे ओळखू येणार नाही असे असूनही या नागा व आसामी बंडखोरांची मागणी निश्चितच धक्कादायक अशी आहे. त्यांची संस्कृति नष्ट होत असल्याचे त्यांना प्रकर्षाने जाणवत असून त्यांना त्यांच्या संस्कृतिच्या ''मूळ प्रतिमेचे'' रक्षण करावयाचे आहे.

''आदिवासी बदलणार आहेत यात शंका नाही. परंतु या बदलांचा वेग कृत्रिमरित्या वाढविणे हे निश्चितच अयोग्य आहे'' असे डॉ. व्हेरियर एल्विन यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे.

''ए फिलॉसॉफी फॉर नेफा'' या पुस्तकात डॉ. व्हेरियर एल्विन यांनी नेमके काय लिहिले आहे, हे वाचून खात्री करून न घेता ''नेफामधील आदिवासींना पूर्णपणे अलिप्त ठेवावे'' असे तत्व डॉ. एल्विन यांनी मांडले आहे असे त्यांच्या टीकाकारांनी गृहीत धरले होते. डॉ. एल्विन यांनी जी धोरणप्रणाली प्रस्तावित केली होती- त्यात कोठेही कसल्याही प्रकारे नेफामधील आदिवासींना आसाममधील लोकांपासून पूर्णपणे अलिप्त ठेवण्याचा विचार नव्हता. या धोरणप्रणाली अन्वये डॉ. व्हेरियर एल्विन यांनी जी तत्वे मांडली होती ती समजून न घेता नेमकी या तत्त्वांच्या विरूध्द मते मांडल्याचे श्रेय डॉ. एल्विन यांना देऊन त्यांच्या विरूध्द टीकेची झोड उठविली. चीनचे नेफावर आक्रमण झाल्यावर टीकाकारांचा जोर वाढला परंतु डॉ. एल्विन यांनी सुचविलेल्या धोरणप्रणालीचा- सैन्याच्या हालचालीवर नेमका कसा व किती परिणाम झाला याबद्दल कोणीही नेमके असे कांहीही सांगू शकले नाही.

या संदर्भात लक्षात घेण्यासारखी महत्वाची गोष्ट म्हणजे डॉ. व्हेरियर एल्वीन यांनी ''ए फिलॉसॉफी फॉर नेफा'' हे पुस्तक लिहिण्यापूर्वी पंच्याऐंशी वर्षे आधीच ( त्यावेळी त्यांचा जन्मही झाला नव्हता ) त्यावेळच्या प्रशासनाने ईशान्य सरहद्द प्रांतास ''इन्नर लाईन'' असे संबोधले व त्या भागात लोकांच्या हालचालींवर मर्यादा घातल्या- या भागात जाण्यासाठी प्रशासनाची अनुमती घेणे आवश्यक बाब बनली. ही ऐतिहासिक वस्तुस्थिती डोळ्यासमोर ठेऊनच, ''नेफा मधील आदिवासींचा विकास अशा पध्दतीने झाला पाहिजे की त्याद्वारे त्यांची असामी जनतेबरोबर व पर्यायाने सर्व भारतीयांबरोबर एकात्मता साधली गेली पाहिजे'', असे- डॉ. व्हेरियर एल्वीन यांनी त्यांच्या पुस्तकांत नमूद केले आहे.

**तत्त्वधिष्टीत धोरण प्रणालीचे थोर मानवशास्त्रज्ञाकडून समर्थन :**

डॉ. व्हेरियर एल्वीन यांच्यावर अशा प्रकारे टीका होत असतानांच निष्णांत मानवशास्त्रज्ञ

डॉ. ख्रिस्टॉफ- व्हॉन फ्युरेर- हॅमेंडॉर्फ यांनी ''ए फिलॉसफी फॉर नेफा'' या पुस्तकाने आदिवासी विकास विषयक एक आशादायक व फलद्रूप अशी धोरण प्रणाली दिली आहे'' या शब्दात डॉ. एल्वीन यांच्या सैधांतिक धोरण प्रणालीचे महत्त्व विशद करून यथार्थ समर्थन केले आहे. डॉ. व्हेरियर एल्वीन यांच्या सैधांतिक धोरण प्रणालीचे समर्थन करताना डॉ. हॅमेंडॉर्फ यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की-

१) एकोणीसाव्या शतकातील व विसाव्या शतकाच्या सुरुवातीस शासनाचे धोरणातील दोषांमुळे आदिवासींच्या जमिनी हडप करणे व त्यांची पिळवणूक करणे ही बाब अत्यंत सोपी होती. या विरुध्द ज्या सामाजिक कार्यकर्त्यांनी व काही निष्ठावंत शासकीय कर्मचाऱ्यांनी आदिवासींवरील अत्याचारांविरुध्द आवाज उठविण्याचा प्रयत्न केला त्यांच्याकडे प्रशासनाने सोयीस्करपणे दुर्लक्ष केले.

२) केवळ एकच आदिवासी प्रदेश असा आहे की जेथे सहानुभूतिपूर्वक व ठोस अशा धोरणप्रणालीमुळे आदिवासींची पिळवणूक होऊ शकली नाही. बाहेरील लोकांनी त्यांच्यावर कुरघोडी केलेली नाही.

३) ईशान्य भागातील आदिवासींनी विकास, आधुनिकता व त्याचबरोबर त्यांच्या पारंपरिक संस्कृतीतील मूल्यांच्या चांगल्या बाबी जतन करून या सर्वांचा कौशल्यपूर्ण ''सुवर्ण-मिलाप'' कसा केला आहे हे ज्यांनी पाहिले असेल (त्याकाळात) ते निश्चितच भारावल्याशिवाय राहिले नसतील. याचे सर्व श्रेय तेथील प्रशासन यंत्रणेबरोबर डॉ. एल्वीन यांच्या सैधांतिक धोरणप्रणालीसही जाते. (ही वस्तुस्थिती आजही टिकून आहे असे म्हटले तर त्यात अतिशयोक्ती निश्चितच होणार नाही).

४) तेथील आदिवासींची अस्मिता पूर्णपणे अबाधित असून त्यांनी आपला निर्मळ-निरामय आनंदही गमावलेला नाही. याचबरोबर आर्थिक विकासाची फळे त्यांना व त्यांच्या पुढील पिढ्यांना निश्चितच चाखावयास मिळतील अशी त्यांना पूर्ण खात्री आहे.

५) देशातील इतर आदिवासी भागात जो सांस्कृतिक ऱ्हास पहावयास मिळतो त्याची आजच्या सांप्रत परिस्थितीतही नेफा व ईशान्य भागातील समृध्द आदिवासी संस्कृतीशी तुलना केल्यास, '' ए फिलॉसफी फॉर नेफा '' या पुस्तकाने आदिवासी विकास विषयक एक दैदिप्यमान, आशादायक व फलद्रुप अशी धोरण प्रणाली दिली आहे हे एक निर्विवाद सत्य आहे असे निश्चितच ठामपणे म्हणता येईल.

## सारांश

सर्वांगीण विकासासाठी शेती विषयक, दळणवळण विषयक, आरोग्य सेवा विषयक, शिक्षण विषयक या व इतर आवश्यक क्षेत्रातील योजना राबवितांना पुढील पाच (५) महत्वाच्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत असे डॉ. एल्वीन यांनी नमूद केले आहे-

१) आदिवासींना त्यांच्या जमिनींची हमी असली पाहिजे. बाहेरील लोकांकडे होणाऱ्या आदिवासींच्या जमिनीचे हस्तांतरण थांबले पाहिजे.

२) आदिवासींच्या वन विषयक हक्कांचा मान राखला गेले पाहिजे. प्रशासनाने या संदर्भात संपूर्ण देशात पूर्णपणे एक नवीन दृष्टीकोन आत्मसात करण्याची नितांत आवश्यकता आहे.

३) आदिवासींच्या कर्जबाजारीपणाचा प्रश्न त्वरीत सोडविण्याची नितांत आवश्यकता असून त्यासाठी-

अ) कायदा करण्यात यावा;

ब) आदिवासींमध्यें सहकाराच्या चळवळीस वेग यावा;

क) आदिवासींना मान्यता प्राप्त यंत्रणेमार्फत

कर्जाची सुविधा उपलब्ध होण्याची आवश्यकता आहे;

४) आदिवासी भागातील औद्योगिकरणाबाबत अत्यंत गांभिर्याने विचार होणे नितांत आवश्यक आहे. काही कारणांसाठी जर आदिवासींच्या जमिनी ''संपादित'' करण्यात आल्या तर विस्थापित आदिवासीचे पुनर्वसन व्यवस्थितपणे होऊन त्यांना उदारपणे नुकसान भरपाई देण्यात यावी.

५) पूर्वीप्रमाणे आदिवासींना अलिप्त ठेवण्यात येऊ नये. प्रत्येक क्षेत्रात त्यांचे स्नेहपूर्ण स्वागत करून त्यांना समान पातळीवर वागणूक द्यावी. सार्वजनिक क्षेत्रामध्ये सेवा करण्यास त्यांना सर्वतोपरी संधी देण्यात यावी.

डॉ. व्हेरियर एल्वीन यांनी हे मुद्दे नमूद करून असे म्हटले आहे की वरील मुद्दे अगदी साधे वाटत असले तरी या मुद्यांकडे गेल्या दहा वर्षात (स्वातंत्र्यानंतरच्या) पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. केंद्र व राज्य शासनाने जर ठामपणे निश्चय केला तर या मुद्यांप्रमाणे अंमलबजावणी सहजपणे शक्य होईल यात शंकाच नाही.

वरील साध्या मुद्यांव्यतिरिक्त अधिक गुंतागुंतीचे असे पाच (५) मुद्दे डॉ. एल्वीन यांनी नमूद केले आहेत.

१) आदिवासींच्या भूतकाळातील संस्कृतीतील चांगल्या गोष्टींची अस्मिता राखली गेल्यास ''आदिवासींचा विकास'' ही बाब त्यांची सांस्कृतिक उत्क्रांती ठरेल म्हणजे आदिवासी ''वर्तमानकाळात'' (विकासपूर्वी) व ''भविष्यकाळात'' (विकास प्रक्रिया सुरु झाल्यानंतर) त्यांच्या मूळ संस्कृतीचा अव्हेर करणार नाहीत.

२) केवळ शासनाच्या सवलतीचे फायदे (गैर) मिळविण्यासाठी स्वत:स आदिवासी म्हणवून घेणाऱ्या तोतयांपासून जो धोका निर्माण होणार आहे, त्याविरुध्द खंबीरपणे लढले पाहिजे. या संदर्भात पांढरपेशा/सुशिक्षित वर्गाकडून जे शोषण, जी पिळवणूक होईल ती इतर प्रकारच्या शोषणापेक्षा/पिळवणूकीपेक्षा निश्चितच अधिक धोकादायक अशी असेल. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, तामीळनाडू या राज्यांमध्ये ''खोट्या आदिवासींचा'' प्रश्न अतयंत गंभीर बनला आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर हे लक्षात येईल की डॉ. एल्वीन यांना या गंभीर प्रश्नाची जाणीव कितीतरी पूर्वी झाली होती.

३) आदिवासींमध्ये न्यूनत्वाची भावना निर्माण होणार नाही हे काळजीपूर्वक पाहणे नितांत आवश्यक आहे. यासाठी-

अ) आदिवासींवर आपले आचार-विचार लादण्यात येऊ नयेत;

ब) त्यांना समजणार नाहीत किंवा आचरणात आणण्यास अवघड असे नियम व पध्दती त्यांच्यावर लादून त्यांच्यात अपराधीत्वाची भावना निर्माण होणार नाही हे काळजीपूर्वक पाहणे नितांत आवश्यक आहे;

क) ते कोणत्याही प्रकारे अधीर होतील किंवा घाबरतील असे होणार नाही याची काळजी घेतली गेली पाहिजे;

ड) त्यांच्या पारंपरिक/प्रचलित प्रथांचा त्यांना कमीपणा वाटू नये यासाठी सर्वतोपरी खबरदारी घेणे आवश्यक आहे;

४) आदिवासींची संस्कृती व त्यांची कला यांची जोपासना करणे आवश्यक आहे कारण त्या बाबी अमूल्य अशा आहेत. ही संकल्पना आदिवासींच्या मनात यशस्वीपणे रुजविणे महत्वाचे आहे.

देशासाठी ते काहीतरी करू शकतात ही भावना निर्माण झाली म्हणजे देशाबद्दल त्यांना निश्चितच आपुलकी वाटेल. मुख्य प्रवाहात त्याचे सामिलीकरण होण्याच्या दृष्टीने ही अत्यंत महत्वाची बाब आहे. अर्थात ही संकल्पना प्रत्यक्षात

येण्यासाठी आदिवासींकडून इतरांना मदत कशी होऊ शकेल ही शक्यता सर्वतोपरी अजमावून पाहणे अत्यंत महत्वाचे आहे.

५) आदिवासींचा जगण्याचा आवेश, आनंद, उमेद, व स्वातंत्र्य लुप्त होणार नाहीत याची हमी घेणे आवश्यक आहे.

ही तत्वे पूर्णत्वास येण्याअगोदर तीस ( ३० ) वर्षापूर्वी यातील बऱ्याच गोष्टींवर डॉ. एल्वीन यांनी चिंतन-मनन केले होते, परंतु त्यांचा या विषयातील गाढा व्यासंग, अभ्यास, अनुभवसिध्दी व देशातील परिस्थिती या सर्वांची एकत्रित परिणती, त्यांच्या विचारांना निश्चित आकार व दिशा देण्यात झाली.

१) सुरुवातीस त्यांचे विचार सिमित परंतु उत्कट होते. त्यांच्या दृष्टीने समस्या केवळ 'अध्यात्मिक' होती व या समस्येकडे ते केवळ दया दृष्टीने पाहत होते.

२) वस्तुस्थिती व कटु सत्य समजल्यावर डॉ. एल्वीन यांनी आदिवासींच्या ''संरक्षणावर'' ( protection )भर दिला.

३) त्यानंतर त्यांना आदिवासींच्या संस्कृतीची जपणूक ( preservation ) व विकास या गोष्टींचे महत्व अधिक वाटले.

४) ईशान्य भागातील आदिवासींच्या संदर्भात संरक्षणाची ( protection ) हमी होती. परंतू त्यांच्या संस्कृतीतील चांगल्या गोष्टींचा विध्वंस न करता त्यांना आपल्या जीवनातील चांगल्या गोष्टी कशा प्रकारे देणे शक्य होईल, केवळ हा प्रश्न होता.

५) आदिवासींच्या विकासासाठी अनेकविध योजना राबवितांना, त्यांच्या संस्कृतीचा आदर करणे, त्यांच्या संस्कृतीतील धर्म, बोलीभाषा, स्वयंशासित, ग्राम, समाज व्यवस्था इ. महत्वाच्या बाबींची जपणूक करणे व या सर्व बाबींची अस्मिता राखणे या दोन टोकांच्या साध्यांचा विध्वंस न करता ते जुळवून घेणे, हा एक भव्य, दिव्य, महान असा विकास आराखडा असून, त्याची अंमलबजावणी अवघड जरी असली तरी ते साध्य करणे निश्चितच शक्य आहे, असा विश्वास डॉ. व्हेरियर एल्वीन यांनी व्यक्त केला आहे.

# बैगा

## शौनक कुलकर्णी

ज्येष्ठ मानवशास्त्रज्ञ व्हेरीअर यांना समर्पित असलेल्या हाकाराच्या अंकासाठी त्यांच्याच 'दि बैगा' या पुस्तकाची मी निवड केली आहे. मराठी भाषिक आदिवासी बांधवांना आपलेच आदिवासी बांधव बैगा यांच्या जीवनाची ओळख व्हावी असा प्रयत्न या लेखातून केलेला आहे. हिंदू धर्म आणि ख्रिस्ती मिशनरी यांच्या संपर्कात असूनही त्यांनी स्वत:ची परंपरा आजही टिकवली आहे; तसेच जीवनाच्या विविध अंगांवर बैगा संस्कृतीचा प्रकाश सातत्याने टिकून असल्याने या समाजाकडे अगदी सहज लक्ष जाते.

कॅप्टन थॉमसन यांनी बैगा समाज हा अत्यंत दुर्गम भागात, दूरवर जंगलात राहणारा समाज अशी नोंद केली आहे. बैगा मनुष्य हा लाजाळू, बुजरा आणि इतर लोकात न मिसळता दूर जाण्याची प्रवृती असलेला असतो. बंगाल आणि बिहार भागातील भूईया समाजाचीच एक शाखा बैगा समाजात विस्तारीत झाली असावी असा काही सामाजिक शास्त्रज्ञांचा विचार आहे. मांडला,बालाघाट या भागातील बैगा हे प्रामुख्याने छत्तीसगड भागातून स्थलांतर केलेले आहेत. 'बैगा' या शब्दाचा मूळ अर्थ जादूविदया जाणणारा, चेटूक करणारा मंत्र-तंत्र करुन औषध देणारा असा आहे. मिर्झापूरभागातील भूईयार ज्यावेळी आपल्या स्थानिक, पारंपरिक व प्राचीन देवतांना प्रसन्न करुन घेण्यासाठी कर्मकांड करतो त्यावेळी त्याला बैगा असेच संबोधिले जाते. मध्य इलाख्यातील धर्मगुरुचे काम करणाऱ्या कोणासही बैगा असेच संबोधिले जाते, जसे प्रधान खारवार इत्यादी.

बैगा समाज हा आंतरजातीय (endoga-mans) जातीसंस्थेमध्ये विभागला आहे, असे असले तरीही आंतरजातीय विवाह पध्दतीत स्थलपरत्वे फरक आहे. कॅलोनल बार्ड याने सर्वप्रथम बैगा समाजातील तीन जाती किंवा पंथाची यादी केली, त्यात बिंजवर किंवा बिंचवर, मोंदया, भैरोन्या यांचा समावेश आहे. ब्लुमफील्ड आणि रसेल यांनीही यावर खूप संशोधन केलेले आहे. त्यानुसार बिंजवर, भारोटीया, नारोटीआ किंवा नहार, रायभैना, काथमैना, कोंडूवान किंवा कुंडी गोडंबैना इत्यादी सर्व बैगांमध्येच येतात. या यादीमध्ये कुरका बैगा, सावत बैगा आणि दुहड बैगा यांचाही आज समावेश करावा लागतो, जातीबाह्य विवाहामुळे बैगांच्या या वेगळ्या शाखा निर्माण झाल्या असाव्या असा एक मतप्रवाह आहे.

बैगांची मूलत: भाषा ही बैगानी आहे. इतर समाजाबरोबर आलेल्या संबंधामुळे गोंड, मराठी, हिंदी, बिहारी अशा भाषांमधील कितीतरी शब्द त्यांच्या भाषेत आढळतात तसेच या भाषांचे त्यांना थोडेफार आकलनही होते.

बैगांच्या गावाच्या वेशीबर कित्येकदा दगड मांडलेले असतात. मारघाट किंवा दफनभूमी ही बहुतेकवेळा वेशीच्या आतच असते. देवाचे किंवा श्रध्देचे स्थळ स्वतंत्र असे नसतेच. मात्र काही वेळेस घरासमोर मोठा खांब उभा केलेला असतो. पूर्वीच्या काळी बैगांच्यामध्ये दर काही वर्षांनी पहिले घर पाडून नविन घर बांधण्याची प्रथा होती. आजची पध्दत फारशी वेगळी नाही. घर व्यवस्थित बांधण्याकडे गोंडांचा जितका कल असतो तितकासा या लोकांचा नसतो. बैगाचे घर म्हणजे एक साधीसुधी कच्च्या स्वरुपाची

झोपडीच, मोडकळीची भिंत, उंचसखल स्वरुपाची जमीन साधे छप्पर असेच असते. बैगाची घरे एका सलग रेषेत बांधलेली असतात मात्र शेजार शेजारच्या दोन घरात दोन ते तीन फुटाइतकी अरुंद जागा सोडलेली असते. घरांच्या भिंतींना माती, शेण वापरुन व्यवस्थित गिलावा केलेला आढळत नाही, गिलावा फक्त भिंतीना आतूनच केलेला असतो. घराच्या आतमध्ये खोल्याही पाडलेल्या नसतात. स्वयंपाक, जेवण, धान्य ठेवणे, झोपणे या सर्वासाठी एकाच खोलीचा वापर करतात; मग कुटुंब लहान असो की मोठे. बालाघाट भागातील भोंगवा येथे मात्र एका आकर्षक घराची नोंद श्री. एलविन यांनी केली आहे. हे घर बरेच मोठे असून त्याभोवती कुंपण आहे. घरामध्ये देवघर स्वतंत्र असून इतरही स्वतंत्र खोल्या आहेत. भिंती व जमीन व्यवस्थित असून, दारावर लाकडी कोरिव काम आहे. बैगा समाजामध्ये असे घर अगदी क्वचितच असल्याने मुद्दाम उल्लेख केलेला आहे. तरीही हे छोटे घर पुरेसे उबदार, स्वच्छ असते. घरगुती कामाच्या वस्तू घरात टांगून ठेवलेल्या असतात. घरातील चुलिचा धूर लागून काळ्या पडलेल्या असतात. असे हे घर अंधारी व धुरकट घर आपल्यामधील कौटुंबिक जिव्हाळा मात्र टिकवून असते.

पारंपरिक पध्दतीनुसार बैगांचा पोषाख मर्यादितच असतो. पुरुषांचा पोषाख म्हणजे फक्त धोतर. बऱ्याचवेळा तर लांब पट्टीची लंगोटीच वापरली जाते. हिवाळ्यात मात्र ' कपची ' नावाचा जाड पोषाख वापरला जातो, तसेच डोक्याला पटका बांधतात. भूमिआ स्त्रिया लांबलचक लुगडे बांधतात आणि त्याचाच काही भाग खांद्यावरुन पदर म्हणून घेतात.' कंच ' वापरणे ही पध्दत म्हणजे लुगडेच पुरुषांच्या धोतर पध्दतीने बांधणे ही होय. बैगांच्यामध्ये ही पध्दत गोंड समाजाकडून घेतली गेली असावी असे वाटते. बैगांमधील भूमिआ स्त्रिया चोळी वापरत नाहीत तर निवास स्त्रिया ' झुलवा ' प्रकारचे जॅकेट वापरतात.

दागदागिने वापरायची पध्दत ही बैगांमध्ये आहे. पुरूष चांदीचे किंवा पोलादी कडे ( ब्रेसलेट ) हातात वापरतात. तिसऱ्या बोटात मुंडरी अंगठी वापरतात. कानात बाला, बारी आणि लुरकी वापरतात. हे अलंकार अनुक्रमे कानाचे वरील भागात मध्ये व कानाचे पाळीत घालतात. नृत्याचे वेळी डोक्यावर ' कलगी ' नावाची टोपी घातली जाते, यात मोराची पिसे फेटचावर बसवलेली असतात. गळ्यात घालायचा ' छुरा ' हार हा एक प्रसिध्द अलंकार आहे. भूमिआ स्त्रिया ' धर ' नावाचा अलंकार कानात घालतात त्याच ठिकाणी ' पोलादी ' घालतात. बिलासपूर भागामध्ये छत्रीसारखा दिसणारा ' किनवा ' हा पितळी झुब्याचा प्रकार कानात घालतात. इतर आदिवासींपेक्षा एक विशेष फरक म्हणजे बैगा व्यक्ती नाकात कधीही अलंकार घालत नाही. गळ्यात छुऱ्याबरोबरच चांदीच्या रुपयाचा ' हवेल ' गळयातच बांधला जातो. कांथी, लाटकानिआ, गुरिआ आणि बिचुली हे इतर काही प्रकारचे नेकलेस आहेत. बोटात मुंडरी, हातात चुडा तसेच पायरी, चुटकी आणि चुटकी हे पायातील अलंकार आहेत. विविध भागातील बैगांचे अलंकारातही थोडा थोडा फरक आहे.

केशभूषेचा प्रकारही आपले वेगळेपण राखून आहे. डोक्यावरील केस एकतर सरळ वाढवून डोक्याखालीपर्यंत व्यवस्थित राखले जातात किंवा पुढच्या बाजूला संपूर्ण मुंडण करून मागील बाजूचे केस वाढवून ते जुरा किंवा बन यामध्ये बांधले जातात व डोक्याच्या डावीकडे ती रचना केली जाते. मात्र नारोटिआ आणि बिंजवर मध्ये केंस बांधण्याची प्रथा नाही. स्त्रियांचे केस कापले जात नाहीत तर मध्ये भांग घेऊन वर-खाली बांधत मान झाकली जाईल इतपत रचना केली जाते. गोंदवून घेण्याची प्रथाही आहे.

पूर्वीच्या काळी दररोज स्नान करण्याची पध्दत बैगांमध्ये नव्हती तर स्नान केल्यावर वाघ पळवून नेतो अशा प्रकारचा अंध विश्वास होता. याला कारण म्हणजे बैगा नेहमी जंगलातच राहतो आणि स्नानासाठी नदी, विहिरीवर, तळ्यावर जाण्यायेण्याचा मार्ग ही जंगलातूनच. त्यामुळे वाघाने हल्ला करण्याचे प्रकार कदाचित होत असतील. आता मात्र आठवडयात काहीवेळा तरी आंघोळ केली जाते. स्त्रिया महिन्यातून एकदा आंघोळ करतात. दात स्वच्छ करण्यासाठी जांभूळ, सराई, हिरडा याच्या कोवळ्या फांदया किंवा काडया वापरल्या जातात. कपडे धुण्यासाठी पाण्यात लाकडाची राख टाकली जाते.

उदयोग व्यवसाय आणि आर्थिक जीवन याचा विचार करता बैगा समाजाचे व्यवसाय अगदी प्राथमिक स्वरुपाचे असून आर्थिक मागासलेपणा आहेच. कॅलोनल ब्लूमफील्ड यांनी नोंद केलेले व्यवसाय म्हणजे खरीपाची शेती; पूजापाठ, मंत्रतंत्र; जंगली औषधे मिळवणे; बांबूपासून चटया, टोपल्या बनवणे, हिरडा, बेहडा, मध जमवून विकणे, जंगली फळे लाकूड यांची विक्री, मच्छीमारी, शिकारी आणि मजुरी.

प्रत्येक बैगाच्या घराभोवती थोडाफार तंबाखू लावलेला असतो. त्यातून त्याची दैनंदिन गरज भागविली जाते. बहुतेक अन्नधान्य हे स्वतःच पिकविलेले किंवा रानातून जमविलेले असतात. मुख्य खर्च करावा लागतो तो म्हणजे तेल, मीठ, कापडाला आणि परिस्थितीनुसार दागदागिने यावरच. शिकारीसाठी विविध प्रकारचे पिंजरे बनविले जातात. उदा. धंग फांदा, खिजी फांदा, उंदराचा पिंजरा याचा उपयोग त्यांना व्यवसायिकदृष्टयाच होतो. घरगुती वापराच्या विविध प्रकारच्या वस्तूही बैगा स्वतःच तयार करतात. लाकूड, बांबू व गवताची पाती वापरुन झोपण्यासाठी सुंदर बाज बनविण्यातही बैगा वाकबगार आहेत. बांबूच्या पट्ट्यांपासून विविध प्रकारच्या टोपल्या बनविल्या जातात उदा. मोरा, डाली, धुती, दाऊरी, किकराई, पितला, चालगी इत्यादी. झापी ही गोल आकाराची झाकणासह बनवलेली टोपली दागिन्यांसाठी वापरतात.

पाळीव प्राणी म्हणून डुक्कर बाळगणे आणि त्याची पैदास करणे बैगात विशेषत्वाने जाणवते. लग्नविधी किंवा इतर धार्मिक कार्यक्रमात डुक्कराच्या मासाचे भोजन हवेच. बळी देण्यासाठीही बोकड, कोंबडी प्रमाणे डुक्करही चालते. डुक्कराचे मागचे पाय धरुन हवेत फिरवणे आणि डोके दगडावर आपटून ठार मारण्याची पध्दत मात्र क्रूरच वाटते. शेतीच्या कामासाठी बैलाची विशेष मदत घेतली जात नाही, इतकेच काय दूधासाठी गाय बाळगण्याची पध्दतही अलिकडेच सुरु झाली आहे.

बैगा लोकांमध्ये तंबाखू खाण्याचे प्रमाण आधिक आहे. दारू पिण्यात ही मंडळी चोखंदळ आहेत. त्यांना आवडणाऱ्या विशिष्ट स्वादाच्या, तल्लफ आणणाऱ्या दारूसाठी कितीही दूर जाण्याची यांची तयारी असते. बहुधा दारू मोहाच्या फुलापासून गाळलेली असते. ही दारू सराई किंवा मोहलेनच्या पानापासून केलेल्या कपामधून प्यायली जाते हे वैशिष्ठ्य आहे. बैगा लोक विडया ओढतात, गांजा ओढतात, क्वचित कधी अफू, भांग यांचाही वापर करतात.

बैगाचा रोजचा आहार अगदी साधा असतो. दिवसामध्ये तीन वेळा जेवण घेण्याची पध्दत असून, सकाळी न्याहरी किंवा 'जुरा' घेतात. त्यावेळी तांदूळ किंवा तत्सम पदार्थाची पेजच असते. दुपारच्या जेवणातही भात, पेज हेच मुख्य प्रकार असतात. रात्रीच्या जेवणात मात्र भाताबरोबर डाळ बनविली जाते. याबरोबरच बांबूचे कोवळे कोंब खाल्ले जातात. आंबा, जांभूळ, उंबर, बेल, चिंच अशा रानात मिळणाऱ्या फळांचाही मौसमाप्रमाणे वापर असतो. मोहाच्या बियांपासून काढलेले तेल स्वयंपाकात वापरले

जाते. मांसाहारात अंडी, कोंबडी डुक्कर याबरोबरच मासेही खाल्ले जातात. मासे मीठ, तिखट, हळदीसह तेलावर तळून ठेवले जातात. बैगांच्या मांसाहारातील वेगळेपणा म्हणजे दृष्टी चांगली व्हावी म्हणून लहान मुलांना भाजलेल्या कावळ्याचे मांस दिले जाते. उंदीर पकडून भाजून खाण्याची पध्दतही बैगांमध्ये आहे.

जन्म, मृत्यू, लग्न या कार्यातही बैगा आपले विशेष स्थान टिकवून आहेत. बैगा व्यक्तीचा विवाह बैगा व्यक्तीशीच व्हावा असे बंधन असले तरी एका कुलात करता येत नाही. इतर समाजातील स्त्रीने बैगा पुरूषाशी लग्न केल्यास योग्य विधी किंवा संस्कार पार पाडल्यावर त्या स्त्रीला बैगा म्हणून मान्यता मिळते. पुरूष दुसऱ्या जातीतील कुमारी मुलीशी विवाह काही ठराविक परिस्थितीतच करू शकतो. बैगा समाज जातीत व जात कुलात विभागलेली आहे.

वयात येण्याच्या सुमाराला मुलामुलींचा विवाह पक्का केला जातो. मुलाकडची मंडळी प्रथम मुलीकडच्या माणसांना भेटायला येतात याची आधी कल्पना दिली गेलेली असते. नंतर मुलाकडची मंडळी कपडे, बांगड्या, चिकन, नारळ आणि दारू घेऊन मुलीकडे येतात आणि मुलगी लग्नाची आहे का म्हणून विचारतात. मुलीने आपली पसंती सांगितल्यास तिला या भेटी दिल्या जातात. मुलीचा बाप ती दारू स्वीकारतो व एकत्र जेवण होते. लग्नविधीत दोन दोशी आणि दोन सुवासिनी यांना महत्व असते. दोशी हा घरातीलच कोणी वृध्द पुरूष असतो व त्याने सर्व धार्मिक विधी पार पाडायचा असतो. सुवासिनी या वधुवरांच्या अविवाहीत बहिणी असतात. लग्नविधीत दोशी मंत्रतंत्रादी कामे करतो. लग्नविधीच्या पध्दतीत स्थलपरत्वे विविध जातीत फरक असल्याने तो विषय प्रस्तुत लेखात आधिक लिहीत नाही. हळदीपाणी विवाह हा एक सोप्पा प्रकारचा विधी आहे. बहुपत्नीत्वाची पध्दत काही प्रमाणात आहे. लग्नानंतर मातृत्व येणे भाग्याचे मानले जाते. निपुत्रिक स्त्रीचे तोंड सकाळच्या प्रहरी पाहणे अशुभ मानले जाते. जन्मानंतर बाळाचे नाव आईकडचे आजोबा किंवा चुलत आजोबांकडून ठेवले जाते. जावळ काढण्याची, कान टोचण्याची प्रथा हिंदू धर्माशी जवळीक दर्शविते. व्यक्तिच्या मृत्यूनंतर व्यक्तिस आंघोळ घालतात. व्यक्तिला मृत्यू अचानक आला असल्यास, दक्षिणेकडे डोके करून पुरण्याची प्रथा आहे. व्यक्तिचा मृत्यू नैसर्गिक, वार्धक्याने आला असल्यास दहन करण्याची पध्दत आहे. दहाव्या दिवशी होणाऱ्या दशकर्म विधीत रक्षा जमवून तिचे विसर्जन केले जाते. तिसऱ्या दिवशी बाराव्या दिवशीही स्वतंत्र विधी करतात.

बैगा पंथियांच्या धार्मिक कल्पनेत स्थलपरत्वे फरक होत असला तरी बैगा श्रध्दाळू मनुष्य आहे. कोणत्याही अमानवी, सुप्त शक्तीची बैगा उपासना सुरू करतो. आदिवासी निसर्गोपासक असले आणि कोणत्याही धर्माचे घटक नसले तरी इतर समाजाच्या धर्माचा त्यांच्या जीवनावर परिणाम होतो, त्यामुळेच बैगा समाज त्यांच्या कर्मकांड, परंपरा रिवाज यामुळे हिंदूच होऊन गेले आहेत. बैगा त्यांच्या पारंपरिक देवतांबरोबरच हिंदू देवतांचीही पूजा करतात. तसेच ख्रिश्चन, मुसलमान, बौध्द या धर्मियांच्या संताचीही पूजा करतात. एकूण सर्व धर्मियांच्या पूजनीय व्यक्तिमत्वाची पूजा बैगा मोठ्या श्रध्देने करतात. बैगांच्या मूळ भाषेवर इतर भाषांच्या प्रभुत्वामुळे बैगांच्या देवतांची ( deities) नावे संस्कृत किंवा हिंदी भाषेतीलच आहेत. निरनिराळ्या देवता बैगांच्या श्रध्देच्या ठिकाणी असल्या तरीही मोठा आदर किंवा त्यांचे उच्चत्वाबद्दल आदराऐवजी बरोबरचे संबध असतात. देवदेवतांच्या बऱ्याचशा कथांमधून त्यांचे बरोबरीचे संबध दाखविलेले असतात. मात्र भगवंत हा मुख्य मानला असून तो उत्पत्तीदर्शक मानला आहे. जंगले आणि

त्यामध्ये बैगांना स्थिर जीवन मिळाले याचे श्रेय किंवा कर्ता भगवंतच आहे. यानेच बैगांना शेती करण्याची कला शिकविली अरणि विवाहविषयक नियम घालून दिले. जन्ममृत्यूचा भाग केवळ त्याच्याच हातात असून, मृत्यूनंतर प्रत्येक जीव त्याच्याकडेच जातो. एखाद्या व्यक्तिचे आयुष्य संपल्यावर तो आपल्या दूताला त्या व्यक्तिला आणण्यासाठी पाठवितो. हे तत्त्वज्ञान बैगांचे असले तरी हिंदूधर्मीय तत्त्वज्ञानाशी नाते सांगणारे आहे.

बारा देव ही प्रमुख देवता (deity) म्हणून बैगा मानतात. ग्रामदेवता म्हणून ठाकूरदेवतेचे स्थान आहे. धरतीमाता किंवा जमिनीला ते मातेसमान मानतात. तिच्यावर कुदळ चालवणेही त्यांच्या जीवावर येते. लग्नप्रसंगी किंवा इतरही समारंभाच्यावेळी मद्यपान होते त्यावेळी चार थेंब जमिनीवर टाकून तिला अर्पण केले जातात. भीमसेन ही पर्जन्य देवता आहे, दुष्काळ पडल्यास कोंबडे बळी देऊन देवतांना संतुष्ट करण्याची प्रथा अस्तित्वात आहे. या मुख्य देवतांव्यतिरिक्त नारायणदेव, रातमाई, दुल्हादेव अशा कितीतरी पारंपरिक बैगा देवता त्यांना पूजनीय आहेत.

बैगा लोक जे काही सणवार साजरे करतात, ते हिंदूधर्मीय सणांप्रमाणे असले तरीही त्यावर बैगा संस्कृतीचा प्रभाव आहे. जानेवारीमध्ये साजरा होणारा 'चेरटा' किंवा 'किचराई' हा सण मुलांसाठी असतो आणि बहुधा तो गोंड समाजाकडून बैगांनी स्वीकारला असावा. यादिवशी मुले साधुसारखा वेश करून गावात भिक्षा मागतात व मुली स्वयंपाक करतात. यादिवशी प्रौढ माणसांचा उपवास असतो. मार्चमध्ये 'फाग' आणि जूनमध्ये 'बिडरी' हे सण साजरे केले जातात. ऑगस्टच्या सुरवातीस साजऱ्या होणाऱ्या हरेली या सणाचे वेळी चार प्रकारच्या वृक्षांच्या डहाळ्या आणून पूजून घराचे दारावर लावल्या जातात. पाठोपाठ दुसऱ्या महिन्यात 'पोळा' येतो. यावेळी जनावरांचे पूजन होते. पावसाळा संपताना येतो तो ठाकूर देवाच्या पूजनाचा सण 'नावा' जणू काही पर्जन्यवृष्टीबद्दल धन्यवादच दद्यायचे असतात. ऑक्टोबर मध्ये साजरा होतो 'दसरा' त्यापाठोपाठ येणार असते 'दिवाळी'; जी सर्व भारतवर्षात कमीअधिक प्रमाणात साजरी होते. त्याला बैगा तरी कसे अपवाद असतील; असे बैगांमध्येही दिवाळी जोरात साजरी होते. अशा या सण उत्सवामुळे बैगांच्या जीवनात आनंदाचे, उत्साहाचे वातावरण पसरत असते.

बैगा समाजाचा शुभअशुभ शकून (omen) यावर खूप विश्वास आहे. तरीही ग्रहण, वादळ, वीजांचा कडकडाट, भूकंप याकडे ते फारसे लक्ष देत नाहीत. आठवड्याच्या दिवसात कोणता दिवस कशासाठी योग्य याचा विचार केला जातो, उदा. शनिवार रविवार जंगलकाम, मंगळवारी प्रवास करू नये तर बुधवारी तो करावा. प्रेमिकांना भेटण्यास गुरूवार चांगला तर शुक्रवार न्हाणे धुणे अशा स्वच्छतेस चांगला. लग्नविधी ज्येष्ठ ते पौष या काळात करू नये. एखादी घटना शुभ किंवा अशुभ मानणे, एखादा काळ योग्य अयोग्य अशा प्रथा बैगांमध्ये आहेत. असे सर्व असताना बैगा समाजाने स्त्रीला मात्र बरेच स्वातंत्र्य दिलेले दिसते. स्त्री लग्नासाठी नवऱ्याची निवड स्वतः करू शकते, सामाजिक कार्यक्रमाचे ठिकाणी नृत्यादि कार्यक्रम करू शकते, तसेच दारू, विडी यासारखे शौकही पतीबरोबर करू शकते.

श्री.एल्विन यांनी लिहिलेल्या 'दि बैगा' हे पुस्तक वाचून माझ्या मनात तयार झालेल्या बैगा संस्कृतीचे प्रतिबिंब मी प्रस्तुत लेखात देण्याचा प्रयत्न केला आहे. या लेखातून बैगा समाज व त्याची परंपरा याची थोडीफार तरी कल्पना येईल अशी मला आशा वाटते.

# सीमावर्ती भागातील ललित वाङ्मय

## व्ही.एस. कुलकर्णी

''ए न्यू बुक ऑन ट्रायबल फिक्शन'' किंवा ''आदीवासींच्या ललित वाङ्मयावर आधारित नवीन पुस्तक'' हा व्हेरियर एल्विन यांनी लिहिलेला, व ''नॉर्थ ईस्ट फ्रॅंटीयर एजन्सी'' किंवा ''ईशान्य सरहद्द प्रतिनिधी/एजन्सी'' द्वारा १९७० साली प्रकाशित केलेला ग्रंथ आहे. त्या आधीच्या त्यांच्या ''मिथस् ऑफ दी नॉर्थ-ईस्ट फ्रॅंटीयर ऑफ इंडिया'' किंवा ''भारताच्या ईशान्य सरहद्दीवरील (लोकांच्या) दंतकथा'' या ग्रंथासाठी वरील पुस्तक पुरवणी म्हणून उपयोगी ठरेल अशी याची मांडणी आहे. याशिवाय त्यांच्या ''फोक टेलस् ऑफ महा-कोशल''; ''मिथस् ऑफ मिडल इंडिया'' व ''ट्रायबल मिथस् ऑफ ओरीसा'' या ग्रंथांनाही हे पुस्तक पुरवणी स्वरुपात उपयुक्त ठरेल. एल्विनच्या ओघवती भाषेतील या कथा व त्या अनुषंगाने दिलेली प्राथमिक माहिती सर्व साधारण लोकांना मनोरंजक तर ठरेलच; पण आजकाल नामशेष होत चाललेल्या या वाङ्मयीन खजिन्याच्या काही प्रमाणात जपणुकीबद्दल एल्विनला द्यावेत तेवढे धन्यवाद कमीच पडतील. या ठिकाणी या पुरवणीचा स्वैर आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

आपल्या प्रस्तावनेत व्हेरियर एल्विन लिहितात: ''मी काही खऱ्या अर्थाने दंतकथा लेखक नाही. आदिवासींच्या कथा, दंतकथा, आख्यायिकांच्याद्वारे त्यांच्या चालीरिती व विचार यांवर जो प्रकाश पडतो त्याने मी खूपच भारावून गेलो; म्हणून या ग्रंथलेखनाचा खटाटोप! साहजिकच, मी या विभागामध्यें लोककथा गोळा करण्यासाठी गेलो नव्हतो. परंतु माझ्या दुसऱ्या विषयातील माहिती गोळा करण्याच्या संदर्भात तेथे गेलो असताना, जे काही सहजगत्या हाती लागले त्याची काटेकोर नोंद ठेवली, नेफा विभागातील खोलवर प्रदेशात सुमारे दहा वर्षांच्या काळात धर्मासंबंधी, सामाजिक संघटनासंबंधी, कलाकृती व गुन्हेगारीसंबंधी व कधी कधी उपयुक्त मानवशास्त्रासंबंधी माहिती गोळा करण्याकरिता जेव्हा जेव्हा मी गेलो, त्या त्या वेळी फुरसतीच्या वेळी या कथा मी मिळविल्या व जशाच्या तशा लिहिल्या.''

एल्विनने इतर पुस्तकातील कथा, त्यांचे मूळ हेतू शोधण्याच्या उद्देशाने लिहिल्या; पण या पुस्तकातील कथा बहुतांशी सर्वसाधारण स्वरूपाच्या आहेत. परंतु त्या अतिशय रंजक व रसाळ आहेत. ही साधनसामुग्री जरी एल्विनच्या सहाय्यकांनी गोळा केली असली, तरी शास्त्रशुध्द मानवशास्त्रीय पध्दतींचा अवलंब करून एल्विनने त्याची व्यवस्थित नोंद ठेवली; म्हणजे असे की श्री. सुंदरलाल नर्मदा यांनी मिळविलेली माहिती एल्विनने स्वत: जशीच्या तशी लिहून काढली; प्रत्येक प्रकरणाला स्वत:च्या प्रवासाची छोटी प्रस्तावना जोडून रोजच्या रोज दिनदर्शिका लिहिली; त्यातील सहजतेवर भर दिला व कोठेही वर्णन ओढून ताणून केले नाही; त्याचबरोबर जाता जाता स्वत:ला जे दिसले व अनुभवले त्यांची, त्या लोकांच्या दृष्टीकोनातून दिसलेली, त्रोटक नोंदही ठेवली. यथायोग्यतेच्या दृष्टीकोनातून सर्व वर्णन परिपूर्ण व्हावे म्हणून हे काम त्यांनी स्वत: त्यांचे दुभाषे, सुंदरलाल, गावातील वयोवृध्द इत्यांदींच्या मदतीने केले. त्यायोगे त्यातील सत्यासत्यतेची तपासणी व्यवस्थित केली गेली.

हा मानवशास्त्रीय दृष्टीकोन आहे.

एक अतिशय मोठी अडचण संशोधकाला जाणवते ती अशी की भारतातील बहुतेक आदीवासी विभागातील गोष्टींना लोकमताने मानलेला असा एक ठराविक आदर्श असत नाही किंवा सर्वसामान्य तत्त्वांची शिकवण किंवा तत्त्वप्रणालीही असत नाही. त्यातील शीर्षकांच्या अगर नावांच्या बाबतीतही हाच प्रश्न येतो. म्हणून काय होतं की एकच साचा असलेल्या परंतु निरनिराळी नावे किंवा पात्रे असलेल्या गोष्टी निरनिराळ्या खेड्यात नोंदल्या जातात. कधीकधी तर एकाच खेड्यातील गोष्टींमधील नट, नट्या किंवा इतर पात्रांच्या नावाबाबत लोकांचे एकमत असत नाही. म्हणजे थोडक्यात बहुतेक गोष्टी एकाच साचाच्या परंतु निरनिराळ्या नामावलीच्या असतात. त्यामुळे त्यांचे वर्गीकरण करणे अवघड जाते.

''नॉर्थ ईस्ट फ्रॉंटीयर एजन्सी'' किंवा नेफा या नावाने रूढ असलेल्या उत्तरेकडील प्रदेशाच्या कामेंग, सियॉंग व लोहीत या तीन विभागातील दंतकथा या पुस्तकात आलेल्या आहेत. ज्यांना या विभागांची भौगोलिक तसेच लोकजीवनाची माहिती आहे, त्यांच्या दृष्टीने या कथा मनोरंजक आहेत.

पण ज्यांना यांची काहीही माहिती नाही, त्यांनी येथील प्रदेशाची पूर्वपिठिका किंवा पार्श्वभूमी समजावून घेणे आवश्यक आहे. गोष्टीतील कथानकाचा संदर्भ समजण्याच्यादृष्टीने ही बाब फार महत्त्वाची आहे. उदाहरणार्थ येथे काही संदर्भ असे आहेत की, काही लोक घराखालून वरच्या हालचाली, संभाषण (चोरून) ऐकतात, किंवा घराखाली सरपटत जाणून काय बोलणं चाललय हे ऐकतात. हे कस शक्य आहे? यासाठी, या प्रदेशातील बहुतांशी घरे जमिनीपासून थोड्याशा उंचीवर, खांबांच्या आधारे बांधलेली असतात, म्हणून जमीन व घराची जमीन यामध्ये पोकळी असते, याची माहिती असणे आवश्यक आहे. तसेच घरांची जमीन बांबूंनी विणल्याप्रमाणे असल्याने त्यात असणाऱ्या फटीतून धान्यधुन्य वगैरे खाली जमिनीवर पडून डुकरे, कुत्री, कोंबड्या, वगैरेंना ते आयतेच खाद्य होते. ही घरांची रचना माहित असणे अत्यावश्यक आहे; तसेच या रचनेमध्ये वऱ्हांड्याचा समावेश व मुख्य चुलीवर उंचावर टांगलेले बाबूचे शिंकाळे हेही महत्त्वाचे आहे. या शिंकाळ्यावर मांस मासे वाळवण्यासाठी ठेवले जातात. तसेच मुख्य खोलीच्या बाजूस साठवणीसाठी केलेल्या कोठीची रचनाही महत्त्वपूर्ण आहे.

या कथांमध्ये आता लुप्त झालेल्या परंतु एकेकाळी अस्तित्त्वात असलेल्या गुलामगिरीचे दर्शन होते. यामध्ये स्त्रीची गुलामगिरी व पुरूषाची गुलामगिरी वेगवेगळ्या स्वरूपात दृष्टीस पडते. उदाहरणार्थ एका चोरट्या मुलीला गुलाम बनविण्याचे ठरविलेले असते, पण नंतर तिने काही नुकसानभरपाई दिली तर तिची यातून मुक्तता करण्यात यावी असाही निर्णय ग्रामपंचायत घेते. तसेच दुसऱ्या एका (वियू) मुलीला चोरीच्या आरोपावरून त्याज्य ठरवून गुलाम म्हणून घोषित केले जाते. पुरूषाची गुलामगिरी जरा निराळ्या प्रकारची आहे. एखाद्या गुन्हेगार पुरूषाला ग्रामपंचायतीने ठोठावलेला दंड जर देता आला नाही, तर त्याची गणना कायम गुलामगिरीत पूर्वीच्या काळी होत असे. काही ठिकाणी याला वेठबिगारी असे संबोधले जाते. अशाच एका कथेमध्ये एक जण वधूदक्षिणा देण्यास असमर्थ असतो; म्हणून आपल्याला होणारी मुले सासऱ्याला व इतर नातेवाईकांना गुलाम म्हणून देण्याचे तो मान्य करतो; यायोगे तो कर्ज मुक्त होऊ इच्छितो. आणखी दुसऱ्या एका बोरी कथेमध्ये ग्रहणाची कल्पना गुलामगिरीच्या संकल्पनेशी जोडलेली आहे. एक महाकाय अमानवी वियू शक्ति अस्वलाच्या रूपात येऊन सूर्य आणि चंद्राचे अपहरण करते आणि त्यांना आपल्या

शेतात कामं करण्यासाठी गुलाम म्हणून ठेवून घेते. इतर माणसे, प्राणी आणि वियू त्यांची काही प्रमाणात मुक्तता करतात. पण ठरविलेली किंमत सूर्य चंद्राला पूर्णपणे देणे अशक्य झाल्याने, वेळोवेळी वियु महाकाय शक्ती कर्जवसुलीसाठी येते व म्हणून त्यांना ग्रहण लागते अशी ती दंतकथा गुलामगिरीवर आधारित आहे. याठिकाणी सूर्य आणि चंद्र हे पुरूषरूपी मानले आहेत.

ग्रामपंचायत, 'केबांग' या संस्थेच्या कार्याविरोधी आदी कथांमध्ये वेळोवेळी उल्लेख आलेले आहेत. अशाच एका ''सुतारपक्षी आणि मधमाशी'' च्या कथेमध्ये एका चोरी करणाऱ्या मुलीवर काय कारवाई करावी? याचा विचार करण्यासाठी जमलेल्या केबांगचा उल्लेख आहे. कथासूत्रानुसार या ग्रामपंचायतीत दोघेजण अट्टल दारूडे असतात, ते चर्चा जास्तीत जास्त लांबवत राहतात, कारण जोपर्यंत चर्चा चालेल तोपर्यंत त्यांना इतरांच्या खर्चाने फुकटची दारू ढोसायला मिळेल. पण चर्चेचा निकाल लागला की ही ('राइस- बियर') तांदळापासून बनविलेली दारूही थांबेल, म्हणून चर्चा जास्तीत जास्त काळ करीत रहाणे त्यांना हितावह आहे. एकंदरीत पंचायतीच्या विशेषत: वयस्कर सभासदांवर चर्चा लांबवीत राहण्याचा आरोप सतत केला जातो, कारण या एवढ्या कारणामुळेच त्यांना (सभासदांना) इतरांच्या खर्चाने मनसोक्त दारू ढोसायला मिळते. बऱ्याच कथामध्यें या आरोपांचा उल्लेख आढळतो.

'आदि' (Adi) खेड्यातील कुमारीकांना एकत्र आणणारी व त्यांच्यात काही शिस्त उत्पन्न करणारी ''राशेंग'' ही अशीच आणखी एक प्रकारची संस्था आढळते. एका छोट्याशा झोपडीमध्ये फक्त रात्रीच्या वेळी मुली एकत्र जमतात, विणकाम, भरतकाम व झोप येईपर्यंत नाच-गाणी करीत राहतात. त्यातल्या त्यांत वयाने मोठ्या असणाऱ्या मुलीकडे याचे पुढारीपण जाते. एस.सी. रॉय आपल्या, ''आस्पेक्ट्स् ऑफ पदम-मिनयांग कल्चर'' (शिलाँग १९६०) पृष्ठ २०१ वर म्हणतात की '' शिस्त, नेतृत्व जबाबदारी व साथीदारांची असणारी ही (राशेंग) एक प्रशिक्षण संस्थाच आहे. राशेंगची रचना कुलानुसार असून लग्नेच्छु होतकरू तरूण मुलेही या ठिकाणाला भेट देतात. एकमेंकांतील सलोख्याची भावना वाढवणारी, साथीदारांची सुयोग्य निवड करण्यासाठी सोयीस्कर व सर्व प्रकारचे ताण कमी करणारी अशी ही विस्तृत प्रमाणावर पसरलेली संस्था आहे.'' या संस्थेचा संदर्भ कित्येक कथांमध्ये आलेला आहे. यातील आदिवासींचे निरोगी वातावरण कसे टिकवून धरले जाते याची माहिती असणे आवश्यक आहे; अन्यथा गैरसमज फार वाढतील.

कित्येक कथांमध्ये शेजारी देशांशी चालणाऱ्या व्यापाराचा उल्लेख, संदर्भ आहे. हा व्यापार मुख्यत: तिबेटी व्यापाऱ्यांबरोबर चालतो. भारत ते तिबेट हा सुमारे २-२॥ महिन्यांचा त्या काळचा प्रवास फारच हलाखीचा, जिकीरीचा होता. घोडे मरत, थंडीने बेजार होई व थंडी व भुकेने मरणोन्मुख अवस्थाच प्राप्त होत असे. पण अशाही परिस्थितीत आदी, आशिंग व्यापारी सामान घेऊन तिबेटमध्ये जात व तिकडचेही व्यापारी इकडे येत. हा व्यापार मुख्यत: चामडी, मीठ व लोकर यांच्या देवाणघेवाणीचा असे. याशिवाय निरनिराळ्या प्रकारचे मणी माळा, खाद्यपदार्थ, लोखंडी वस्तु इत्यादींचाही सामवेश असे. त्यामुळे आदी कथांबरोबरच तिबेटी कथांचाही समावेश नेफा भागातील लोकांमध्ये असलेला दिसतो. यामध्ये तिबेटी कथांवर आदी कथासुत्रांचा अधिक पगडा असून, त्या अस्सल तिबेटी न वाटता आदीच वाटतात. परंतु आदी कथांवर तिबेटी प्रभाव दिसत नाही.

आदी कथांमध्ये वियू नावाच्या अदृश्य शक्तीचा जास्त उपयोग केला जातो, कारण

एकंदरीत मानवी जीवनावर या शक्तीचा जास्त प्रभाव आहे. असे मानले जाते. त्याचप्रमाणे प्राण्यांवर आधारित कथाही आहेत. काही काही गोष्टीत सर्व पात्रे प्राणीच असतात, तर काही कथात प्राणी व मानव यांचे मिश्रण असते. मानव व प्राणी यांचे लग्नसंबंध असल्याचेही कित्येक कथांमध्ये उल्लेख आहेत. याउलट बुध्द कथा इतक्या उल्लेखनीय- विशेषत: प्राण्याच्या बाबतीत- वाटत नाहीत. त्या जास्त सुधारीत व पुढारलेल्या वाटतात. आदी कथांमध्ये गरीबीतील, वडीलधारी व्यक्तींचा व कुटुंब किंवा ग्राम प्रमुखांचा उल्लेख येतो तर तिबेटी श्रीमंती कथामध्ये राजे राण्यांचा उल्लेख आढळतो.

## स्त्रीविषयक दृष्टीकोन

बौध्दकथांमध्ये बऱ्याच वेळा स्त्रीविषयी प्रतिकूल दृष्टीकोन मांडला जातो. विशेषत: बौध्दधर्म ज्यांनी स्वीकारला आहे, त्यामध्ये मठाचे स्थान व त्यातील पावित्र्य यादृष्टीने स्त्रीला स्थान तसे गौणच आहे. बौध्दकथा ह्या बहुतांशी जातककथा म्हणून प्रसिध्द आहेत. तसेच पंचतंत्र व तिबेटी दंतकथा याही बुध्दकथा मानल्या जातात. ज्याने भिसुधर्म स्वीकारला त्याला बाह्यजगातील सर्वात जास्त भुरळ पाडणारी गोष्ट म्हणजे स्त्री होय. असतमंत जातक म्हणतात, '' स्त्री म्हणजे कुकर्मी, काम वासनेने भरलेली, दुराचारी व अधोगतीला गेलेली (व नेणारी) चीज आहे, आणि तरीसुध्दा एखादा समंजस माणूस स्वत:ला वासनेच्या आहारी का जाऊ देतो ? '' असा प्रश्नही ती स्त्री करते. एका तिबेटी कथेमध्ये स्त्री किती कृतघ्न असू शकते याचे यथार्थ वर्णन केले आहे. एक नवरा आपल्या बायकोचा दोनदा प्राण वाचवतो; एकदा आपल्या मांडीचे मांस कापून केवळ तिला वाचविण्यासाठी खायला देतो. तसेच आपल्या दंडाच्या रक्तवाहिन्या कापून रक्तही प्यायला देतो. पण इतके करूनही ती त्याची निर्भत्सना, 'हाता पायानी थोटा' म्हणून करते. पंचतंत्रामध्येही अशीच एक कथा आहे. एक स्त्री तहानेने व्याकूळ होऊन एका रानात मरते. 'तिला नवऱ्याने आपले अर्धे आयुष्य दिले तर ती वाचेल', असा आवाज तिच्या नवऱ्याच्या कानावर पडतो. तो त्याप्रमाणे करतो. काही काळानंतर तिचा नवरा कामानिमित्त बाहेर गावी जातो. त्यावेळी एका उद्यानात ती स्त्री एक सुंदर संगीत ऐकते व त्या संगीतकारावर मोहित होऊन, प्रेमात पडते. पहिले सगळं विसरून; इतकंच नाही तर आपल्या नवऱ्याला लवकरात लवकर संधी मिळताच विहीरीत ढकलून देते.

प्रस्तुत ग्रंथांमध्यें आदी दंतकथा आणि बुध्दी दंतकथा या मध्ये वरील पार्श्वभूमीवर विरोधाभास दिसतो. सर्वसाधारणपणे आदींचा स्त्रीविषयक दृष्टिकोन अतिशय उदार व विश्वासार्ह आहे. अर्थात् सर्व समाजाप्रमाणे या जमातीत सुध्दा वाईट चालीच्या मुली स्त्रिया आहेतच. पण तरीसुध्दा आदीकथांमध्ये अधिक मैत्रिपूर्ण वातावरण आहे.

परत एकदा बौध्द कथाकडे वळूया! बऱ्याचशा कथांमध्ये स्त्रियांचा उद्देश पुरूषांना खेळवणे, नाचवणे असा असतो आणि म्हणून जो जो पुरूष त्यांच्याकडे आकर्षिला जाईल त्याला फशी पाडणे हे त्या करीत राहतात. स्त्रियांचे हे वर्तन केवळ मानवी योनीतच असते; असे नव्हे तर काही कथांमध्ये ते पिशाच्य योनीतील स्त्रियांच्या बाबतीतही सत्य असल्याचे दिसते. दुसरे असे की मत्सर हा त्यांचा स्थायीभाव अगदी देवतांमध्ये सुध्दा दिसून येतो. त्यामुळे त्या एखाद्या सत्शील व चांगल्या माणसास नरकात पोहोचवतात. कित्येक खम्पती गोष्टींमध्ये ही वस्तुस्थिति दाखविलेली आहे. पण एक गोष्ट मात्र खरी की ज्या स्त्रिया योग्य मार्गाने चालत नाहीत त्यांचे स्थान नरकातच आहे.

एका सिंगपो कथेमध्ये अशाच एका बदफैली स्त्रीची कहाणी सांगितली आहे व ती नरकात जाते असे दाखविले; पण सरतेशेवटी तिचा मुलगा तिला क्षमा करून स्वर्गात जागा द्यायला लावतो.

## औदार्याचा प्रभाव :

बौध्द कथांमध्ये जास्त प्रभाव जर कशावर पडत असेल, तर तो म्हणजे कशाचीही आसक्ती न ठेवता आपल्या जवळचे सर्व उदारपणे देऊन टाकणे, त्याचा त्याग करणे याचा आणि या औदार्याचा जास्त सन्मान केला जातो. अशा प्रकारच्या कथांची मध्यवर्ती कल्पना अशी की त्यातील प्रमुख हीरो/पात्र आपल्याजवळचे सगळे दुसऱ्याला देऊन टाकतो. अगदी स्वत:ची बायको, मुले; इतकेच नव्हे तर स्वत:चे डोळे, हात पाय; थोडक्यांत अवयव सुध्दा देऊन टाकतो. शेवटी मात्र इतकी परीक्षा पाहिल्यावर त्याचे त्याला सन्मानाने व गौरवाने परत मिळते. मात्र मध्यंतरीच्या काळात अनंत हालअपेष्टा भोगाव्या लागतात. बौध्द कथांचा हा गाभा बहुतेक सगळीकडे दिसून येतो. सर्वांत प्रसिध्द कथांमध्ये बोधिसत्त्वांचे जातकस्वरूपात वेशांतरीत होणे महत्त्वाचे व पवित्र मानले जाते. कारण त्यायोगे भगवान बुध्दांचा पुनर्जन्म होतो असे मानतात; आणि या पुनर्जन्माचे जास्तीत जास्त मोल म्हणजे ''औदार्य!'' त्याच्या बालपणी, तरूणपणी व वृध्दपणी कोणीही त्याला औदार्यापासून परावृत्त करू शकत नाही. बोधीसत्त्वांचे लग्न एका राजकन्येशी होते. तसेच त्यांचा आवडता प्राणी म्हणजे पांढरा शुभ्र हत्ती, पण शेवटी या दोन्हींचांही ते उदारपणे त्याग करतात; व सर्व संग परित्याग करून रानात निघून जातात. या बोधिसत्त्वांच्या कथांप्रमाणेच भारतातील परीकथांमध्ये राजा हरिश्चंद्राची कथा फार प्रसिध्द आहे. त्यामध्येही राजा हरिश्चंद्राचे औदार्य हाच गाभा आहे. 'कथा सरितसागर' मध्ये अशा प्रकारच्या औदार्याच्या कथा आहेत, पण तेथे मानवाऐवजी पिशाच्च किंवा राक्षसाचे औदार्य दाखविले आहे. त्याचप्रमाणे कुरूक्षेत्र राजाच्या मुलाच्या- इंदुप्रभाच्या औदार्याच्या कथाही प्रसिध्द आहेत.

## हास्यातील जादू:

ब्लूम फील्ड व पेन्झर यांनी हास्याचे विविध प्रकार वर्णन केले आहे. उदाहरणार्थ आनंदाच्या वेळचे हास्य, उपरोधिक हास्य, लबाडीचे किंवा छदमी हास्य, विजयानंद, हासू आणि आसू ही भावना प्रकट करणारेही हास्य, गूढ हास्य, तिरस्कारव्यंजक हास्य, अनाकलनीय हास्य वगैरे. पेन्झरने एकूण हास्याचे दोन प्रकार केले आहेत. ते असे १) हास्याचे स्वरूप स्पष्ट दिसते पण त्यामागच्या कारणाचा पत्ता लागत नाही व २) विचित्र व गूढ हास्य की ज्याचे स्वरूप व त्यामागील कारण या दोन्हींचाही पत्ता लागत नाही. कथा कथनाला मात्र नाटकी हास्याचा जास्त उपयोग होतो. वरील सर्व प्रकार निरनिराळ्या संदर्भात आशिंग, खम्पति वगैरे आपल्या कथांमधून दिसतात व त्यामुळे एक निराळेच वातावरण तयार केले जाते. 'कथा सरितसागर' मध्ये हास्याचा एक निराळाच प्रकार सांगितला आहे. खूप हसल्यामुळे माणसांचे मृत्यू झाल्याचे प्रसंग आहेत. हासतहासत एखाद्याचा काटा काढण्याच्या प्रकारातील हास्यही काही कथांमधून वर्णन केले आहे. काही आशिंग कथांमध्ये भयावह हास्याचा प्रकार सांगितला असून, त्यामुळे हसण्याचेही भय वाटू लागले.

## शरीराच्या मळाची शक्ती:

अशा बऱ्याच दंतकथा आपण ऐकतो की, ज्यामध्ये एखाद्या दैवी शक्तीने शरीर खरवडून

निघालेल्या घाणरूपी मळातून एखादा प्राणी किंवा एखाद्या मानवाची निर्मीती केली, व तिच्या करवी अनेक कामे करवून घेतली. ह्यातील पराकोटीची पायरी मानवातही क्वचित का होईना, पण दिसून येते. यामध्ये एखाद्याने बरेच दिवस स्नान/आंघोळ केली नाही तर साहजिकच त्याच्या शरीरावर मळाची पुटे चढलेली दिसतील. अशी व्यक्ती विशेषकरून धार्मिक विधी, जादू टोणा, मंत्रतंत्र वगैरे करणारी असेल तर, ती आपल्या मळातून कशाचीतरी निर्मिती करून त्याकरवी आपली कामे करून घेते. यात फारसे अशक्य असे वाटू नये. या मध्यवर्ती कल्पनेचा अनेक कथांमध्ये उपयोग करून घेतला जातो. त्यायोगे मानवी व अमानवी शक्तीची ताकद दाखविण्याचा छोटासा प्रयत्न केला जातो. सर्वसामान्य लोक अशा प्रकारांना घाबरतात, व शेवटी शक्तीचे वर्चस्व मान्य करतात. खम्पति, सिंगूपोंच्या कथांमध्ये याचा उल्लेख आढळतो. एका कथेमध्ये निर्मात्याची बायको आपल्या शरीरातील घाण खरवडून एका सुरेख तरूण मुलीची निर्मिती करते, आणि तिचा उपयोग आपल्या नवऱ्याचे पावित्र्य तपासण्याच्या कामी करते. आणखी एका सिंगपो कथेमध्ये हा निर्माता एकदा घोंगावणाऱ्या वादळात अन्न मिळविण्यासाठी बाहेर पडतो. तो बराच वेळ न आल्याने त्याच्या बायकोला काळजी वाटते. व ती आपला गाल काही विशिष्ट हेतू डोळ्यासमोर ठेवून खाजवू लागते. थोडच्या वेळाने तिच्या गालावर एक चामखीळ उमटतो. तरीही ती खाजवणे चालून ठेवते शेवटी त्यातून रक्तप्रवाह चालू होतो. त्याला ती तिच्या नवऱ्याला शोधून बोलावून आणण्याची आज्ञा करते.

ओरिसा आणि मध्य भारतातील अनेक आदिवासींमध्ये वरील प्रकारावर आधारित अनेक गोष्टी सांगितल्या जातात. कमार, जोहरा, कोंढ, या ओरिसातील जमातींची तसेच गोंड, मुरिया, भुइया, अगारी, कोल वगैरे मध्य भारतातील आदिवासी जमातींची उदाहरणे देता येतील.

## क्वचितच आढळणारे इतर प्रवाह:

सर्वसाधारणपणे सावत्र आईविषयींचे उल्लेख या गोष्टींमध्ये सुध्दा आढळत नाही. पण इतर समाजामध्ये सावत्र आईचा उल्लेख खूप वेळा वाईट वागणुकीच्या संदर्भात येतो. तसेच सर्वात लहान पण यशस्वी भावासंबंधी, बाह्यात्म्यासंबंधी, भरभराटीच्या हातासंबंधी, सत्याच्या प्रयोगासंबंधी व विषप्रयोगासंबंधीचे उल्लेख अनुल्लेखानेच या कथांमध्ये असतात.

या उलट सर्वसाधारण उद्देश खालील प्रकारांपैकी कोणत्या ना कोणत्या प्रकारचे असतात. सूर्याचे उगमस्थान वा सूर्याची ऊष्णता, प्राक्कालीन समुद्र, एका मोठ्या प्राण्यामुळे झालेला धरणीकंप किंवा मोठ्या माशाने आपल्या पाठीवर तोलून धरलेली पृथ्वी, कबुतर व कुत्रा यांच्यामधील वितुष्ट वगैरे येथे कोळी विणकाम शिकवण्याच्या भूमिकेतून अवतरतो; तर काही कथांमध्ये उडणाऱ्या हत्तींचा उल्लेख आहे. शिवाय शरिराच्या मळातून तयार केलेला खबऱ्या/गुप्तहेर/ व जादूटोण्यावर आधारित कथाही येथे आढळतात. अनेक कथांमध्ये सुंदर कन्यांना प्रमुख स्थान असते. तर कांही कथांमधील पार्श्वभूमी मनाला खटकणारी त्याचबरोबर स्तंभित्त करणारी असते. उदा. धरणी व आकाश यांचें प्रेम, आकाशाने चमकणाऱ्या विजेच्या आपल्या प्रियकराला शोधण्यासाठी केलेले उपयोग इत्यादी. इतक्या सर्व पार्श्वभूमीनंतर आपण आता काही कथांचे नमूने पाहू. या कथा आदी कथा व बौध्द कथा अशा दोन विभागात विभागलेल्या आहेत. आदी कथांमध्ये आशिंग, शिमाँग व शमोपागल्वो कथांचा समावेश असून बौध्द कथांमध्यें 'यांग सांग चू' दरीशी संबंधीत खम्पति, सिंडापो व शेरडूकपेन कथांचा समावेश

आहे. या सर्व कथांची मांडणी व्हेरियर एल्विनने फार कलात्मक रीतीने केलेली आहे. आशिंग कथा सांगण्यापूर्वी आदी जमातीबद्दल त्रोटक माहिती देऊन त्यानंतर आपली दैनंदिनी त्यांनी दिली आहे. त्यायोगे एल्विनचा एकूण प्रवास कसा झाला व त्यावेळी माहिती कशी कशी गोळा केली गेली, याचे यथातथ्य वर्णन मिळते. शनिवार दिनांक ४ जानेवारी १९५९ पासून ही दैनंदिनी सुरू होते व त्यामध्ये मंगळवार दिनांक २१ जानेवारी पर्यंत उल्लेख आहेत,. निरनिराळ्या एकूण ३४ आशिंग कथांचा त्यानंतर संग्रह आहे. याच पध्दतीने इतरही कथांची मांडणी केली आहे. शिमाँगच्या १८ कथा, समो पायब्लोच्या १३ कथा या दुसऱ्या भागात मांडलेल्या आहेत. तिसरा भाग बौध्द कथांचा आहे. यामध्ये यांग सांग चू दरीतील लोकांच्या ६ कथा; खम्पतिचया २५ कथा, सिंगपोंच्या १२ कथा व शेर्टुकपेनच्या ७ कथांचा समावेश आहे. अशा एकूण १०९ कथांचा हा संग्रह आहे. बहुतेक सर्व कथानकांमध्ये प्रादेशिक नावे जशीच्या तशी ठेवलेली आहेत. प्रादेशिक कथा, त्यांच्या मूळ धाटणीनुसार दुसऱ्या म्हणजे इंग्रजी भाषेमध्ये मांडणे तसे अवघड असले; तरी व्हेरियर एल्विनने आपल्या खुमासदार शैलीने सर्व कथा उत्तम प्रकारे रंगविलेल्या आहेत. ग्रंथाच्या शेवटी काही संदर्भ सूचि दिल्यामुळे मूळ नावे समजण्यात फार अडचण येत नाही. इतक्या सर्व कथांवर परामर्ष येथे घेणे अर्थातच शक्य नाही. परंतु त्यातील काही निवडक कथा यापुढील विवेचनात मांडलेल्या आहेत. हा ग्रंथ एल्विनने १९७० मध्ये लिहून प्रकाशित केला व त्याच्या कित्येक आधी म्हणजे १९५८ मध्ये त्या प्रथम नोंदविल्या. म्हणून या कथा वाचताना कालाची तफावत लक्षात घेऊनच त्या वाचाव्या. ज्या परिस्थितीत त्या लिहिल्या गेल्या ती परिस्थिती आता राहिलेली नाही इतके लक्षात घ्यावे.

या सर्व प्रकारच्या कथा हळूहळू विसरल्या जात आहेत. एकेकाळी त्या कथांमध्ये गोवलेली उच्च सूत्रे, आज कालबाह्य ठरू लागली आहेत. त्यातील कल्पना कपोलकल्पित व अविश्वसनीय वाटतात. आदी लोकांची सियांग नदी किंवा शमो पायलबो टेकड्या हळूहळू नामशेष होत आहेत. आता बहुतेक सर्व ठिकाणी शाळा उघडल्या गेल्या असून एकत्र कुटुंबपध्दतीतही खूपच बदल झाले आहेत. या कथा आता कुटुंबातील वयस्कर लोकांकडून न सांगितल्या जाता, त्या शाळेतील पुस्तकामधून सांगितल्या जातात. असे करताना मूळ कथांची अपभ्रंश रूपेही सांगितली जातात. आधुनिक वैद्यकीय ज्ञानापुढे पुरातन वैद्यकीय पध्दती व त्यांचे रोग निदानाचे तंत्र आता कालबाह्य व मागे पडत चालले आहे तसेच पूर्वीची व्यापाराची पध्दतीही आमुलाग्र बदलत आहे; नेफामधील व्यापारी आता हालअपेष्टा सोसून तिबेटमध्ये जात नाहीत, तर त्यांचे सामान आधुनिक दळणवळणाच्या सोयींचा लाभ घेऊन दूरवर विमानांद्वारे चटकन पोहोचविले व आणले जाते. सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या संस्थांमुळे व्यापार उदीम सोपा झाला आहे. त्याचप्रमाणे गुलामगिरीचे बहुतेक सर्वच ठिकाणी उच्चाटण झाले आहे. पोषाखात बदल झालेत, चालीरीती बदलताहेत. जीवनमूल्ये बदलताहेत! थोडक्यात म्हणजे एकंदरीत नेफा विभागातील जीवन व दैनंदिन व्यवहार आमूलाग्र बदलत आहेत. या बदलाचा वेगही मोठा आहे; आणि म्हणून या पार्श्वभूमीवर आशिंग कथा काय किंवा इतर कथा काय! सर्वच हळू हळू इतिहास जमा होत चालल्या आहेत. या कथांद्वारे सांगितलेल्या जीवनाचा अमोल ठेवा हळूहळू नष्ट होत आहे. तो अशा लिखाणांद्वारे काही प्रमाणाततरी जतन करून ठेवला पाहिजे. अशा कथांपैकी काही निवडक कथा आता आपण पाहू.

## जमीन अधून मधून गरम का होते. ?

कांही कांही दिवसात धरणीमाता फार गरम होते, त्याचे कारण असें की जमिनीखाली खूप खोलवर सिटकिंग केंटुग नावाचे वियुंचे वसतिस्थान आहे. वेळोवेळी ते ( वियू ) डुकराचा बळी देतात, व त्यांचे मांस भाजण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अग्नि तयार करतात आणि म्हणून त्यावेळी जमीन खूप गरम होते.

## आसामातील सुबत्ता ( कशामुळे ? )

डगम पेयंग नावाच्या एके ठिकाणी दोन बहिणी-बहिणी रहात होत्या. एके वर्षी त्यांच्या शेतात इतके पीक निघाले की ते सर्वच्या सर्व घरी आणण्याचे सुध्दा त्यांना शक्य झाले नाही; शिवाय त्या दोघींना पुरून किती तरी उरेल इतके ते होते. त्या अतिशय आळशी होत्या. त्याकाळी त्यांनी जी वल्कले नेसली होती, ती सर्व काढून टाकली, त्याच्या चिंध्या चिंध्या केल्या व त्या जाळून त्यांच्या शेतात पसरून टाकल्या. शेतातील धान्याची कापणी करण्याचे कष्टही त्या घेत नसत, इतक्या त्या आळशी होत्या.

उत्पादक बियाण्यांची पैदास करणाऱ्या वियुने जेव्हा हे पाहिले, त्यावेळी तो ( वियू ) अतिशय रागावला व त्याने स्वतःचे रूप बदलून एका पक्षात रूपांतर करून घेतले. उडता उडता त्या पक्षाचे एक पीस नदीच्या किनाऱ्यावरील जमिनीवर पडले व त्यापासून आता आपण पहातो ते कापसाचे रोप तयार झाले. अशा प्रकारे वियू मिनयांग, पासी, पदम व शेवटी आसामपर्यंत उडत राहिला. आणि त्या प्रत्येक ठिकाणी त्याची पिसे गळत गेली व तेथे तेथे कापसाची रोपे तयार होत गेली. सरतेशेवटी तो आसाममध्ये येऊन स्थिरावला, आणि म्हणून तेथे कापणीचे उत्कृष्ट हंगाम झाले व त्यामुळे आसाममध्ये कायमची सुबत्ता झाली.

## पावसाची प्रथमोत्पत्ती ( कशी झाली ? )

कायूममधून यामकांग आला. यामकांगमधून कासी; कासीमधून सियाँग. सियाँग मधून आबो; आबोपासून बोमुख; बोमुखपासून मुकसेंग आणि सरतेशेवटी मुकसेंगपासून सेदी म्हणजेच या पृथ्वीची उत्पत्ती झाली.

सेदीची वंशावळ म्हणजे सेदी, दिर्लींग, लिटींग तेने, एपे आणि पेडाँग, होय. पेडाँग म्हणजे पाणी असल्याने ते तिबेटमधील एका तलावात राहिले. तेथील माशांनी, बेडकांनी, खेकड्यांनी व ताऱ्यांनी त्याला तेथेच डांबून ठेवले व तेथून कोठेही बाहेर जाऊ दिले नाही. मासे व बेडूक एकमेकांवर खूप प्रेम करीत असत. माशांनी खूप पाण्याची निर्मिती केली. त्यामुळे त्या तलावांत इतके पाणी झाले की ते ओसंडून वाहण्याच्या सुमारास पोहोचले. पाणी ही मुलगी असल्याने साहजिकच तिला नवरा शोधणे क्रमप्राप्तच होते.

सुने वियू या पेडाँग सुनेच्या नातवाने मासे आपली बायको असावी अशी इच्छा दर्शविली. पण तो मातीचा होता तर ती पाण्याची होती; मग अशा परिस्थितीत ते कसे काय एकत्र येणार ? पण जेव्हा त्याने पाणी ओसंडून वाहील असे पाहिले त्यावेळी ते एका कालव्याद्वारे वाहून जाईल अशातऱ्हेने योजना केली. त्यामुळे मासे मोकळे होतील व त्याला तिच्याशी लग्न करता येईल असे त्याला वाटले. त्याप्रमाणे त्याने कालवा खोदला आणि पाणी त्यातून सुखेनैव आपल्या प्रियकराला भेटण्यासाठी वाहू लागले, पण त्याबरोबरच मासे, बेडूक व खेकडेही त्यातून वाहून गेले.

डोंगर दऱ्यातुन उड्या मारत पाणी खाली आले आणि त्याची भली मोठी नदी तयार झाली; तिच्या अंगातून दवांची निर्मिती झाली

व ते ( दंव ) आकाशात झेपावले व शेवटी तिचे ढग तयार झाले. पाण्याने ढगांशी लग्न केले आणि आपल्या नवऱ्याबरोबर आकाशात उडून गेले, परंतु आकाशात तिला रहायला योग्य अशी जागा न मिळाल्याने पावसाच्या रूपाने ते ( पाणी ) परत जमिनीवर येऊन आदळले. ( अशा तऱ्हेने पावसाची निर्मिती झाली. )

## झोप आणि प्रेम ( याचे रहस्य )

सुरूवातीला माणसे न झोपता रात्रंदिवस सतत कामच काम करीत असत. पण डोंगरातील व नदीच्या वियुना हे आवडत नसे; म्हणून एकदा ते सिटकिंग केंडुग कडे गेले व म्हणाले "हे लोक जर असेच इतके काम करत राहिले तर ते सर्व डोंगरच्या डोंगर खलास करतील व आम्हाला रहायला जागाच मिळणार नाही.

सिटकिंग-केडुंग म्हणाले, "घाबरू नका, मी बघतो काय करायचं ते !"

आता रात्रीच्या पुरुष व स्त्री भुतांनी जमिनीत खूप खोलवर मानवी रूप धारण केले. तेथे ते वाढले व त्यांनी एकमेकांशी लग्ने केली. त्यांना मुले-मुली मिळून खूप संतती झाली. ते अगदी हुबेहुब मानवासारखे दिसत असल्यामुळे त्यांनी एक खेडेगाव तयार केले.

एके दिवशी ही वियू मुले व मुली मानवी खेडयात गेले व तेथील मुला-मुलींची काळीजे घेऊन आले, आणि तेव्हापासून लोक झोपी जाऊ लागले. तसेच वियु मुलींची एक मोठी राशेंग होती. तेथील वियू मुलींनी मानवी मुलांची काळीजे चोरली आणि त्यांना नाच गाण्यात दंग ठेवले. तसेच वियू मुलांनी मानवी मुलींची काळीजे चोरली व त्यांच्याशी लग्ने केली. नंतर सकाळी प्रत्येकजण आपापल्या घरी गेला. ( अशा प्रकारे झोप आणि प्रेम सुरु झाले. )

## मृत्यू कसा आला ?

## ( मृत्यूचे रहस्य )

माणसाला मृत्यू येऊ लागण्यापूर्वी या जगामध्ये पुष्कळ म्हणजे पुष्कळच माणसे होती. त्यामध्ये कित्येक पारधी व कोळी लोक होते. त्यामुळे पशू-पक्षी व माशांनी एकदा एक बैठक बोलावली व त्यामध्ये विचार मांडले की, "आपली वंशावळ कमी कमी होत चाललीय, पण आपल्याला मारणारे मात्र अमरच रहाताहेत. आपल्याला जगायचे असेल, तर त्यांना मारण्याचा काहीतरी उपाय शोधून काढला पाहिजे." परंतु कोणीही काही मार्ग सुचवू शकले नाही. म्हणून सरतेशेवटी ते मदत मागण्यासाठी वियू या शक्तीकडे गेले.

परंतु त्याच दिवशी त्याच्या ( वियूच्या ) वामांगातून दोन मुले जन्माला आली होती, म्हणून तो सूतक पाळत होता.

तो त्यांना म्हणाला, "तुम्ही सध्या माझ्या घरी येऊ शकत नाही."

पण जेव्हा सुतकाचा काल संपला तेव्हा ते परत त्याच्याकडे गेले व त्याला आपली समस्या सांगितली.

तो म्हणाला, "माणसांना मारु शकतील असे प्राणी म्हणजे ही माझ्या वामांगातून जन्माला आलेली दोन मुले होत. ती आता लहान आहेत; पण त्यांना थोडे मोठे होऊ दे व मग मी त्यांना माणसांना मारण्यासाठी पाठवीन."

बंजा व बिडाक अशी त्या मुलांची नावे होती आणि ती मुले म्हणजे पहिले सर्प होत.

अगदी ह्याच सुमारास अबिंग-निबूचा एकुलता एक मुलगा जन्माला आला. त्याचे आपल्या मुलावर अतिशय प्रेम होते. एके दिवशी त्याने त्या मुलाला एका वस्त्रात गुंडाळून उजेडात ( उन्हात ) झोपविले व घरात इतर काम करायला निघून गेला. वरील दोन सापांनी त्याला पाहिले

व ते त्याला (मुलाला) कडकडून डसले. तो (मुलगा) किंचाळला; म्हणून काय झाले ते पहायला अबिंग-निबू धावत आला असताना ते साप सरपटत जाताना त्याने पाहिले. ते मूल मेले आणि त्याचे वडील त्याचे मृत शरीर घेऊन ' यादो योंगामो ' या वियुकडे आले.

हा वियु लोहारकाम व कुंभारकाम करणारा होता व तो गाडकी-मडकी, बाणांची टोके तयार करीत असे.

अबिंग-निबू त्याला म्हणाला की, "तू इतका मोठा कुशल कारागीर आहेत, तर माझ्या मुलाला परत जिवंत कर."

त्या वियुने त्याला सांगितले की, "हे काम माझ्या शक्तीबाहेरचे आहे. परंतु जमिनीखाली असणाऱ्या सिटकिंग केडुंग या कुंभाराकडे जा; तो कदाचित् तुला मदत करू शकेल."

अबिंग-निबूने जमिनीला एक भोक पाडले व त्यातून तो जेव्हा वियुच्या खेडयात पोहोचला, तेव्हा त्याने तेथील कुंभाराला, त्याच्या मुलाला परत जिवंत करण्याविषयी सांगितले.

तो कुंभार म्हणाला की, "तुझ्या मुलाचे मृत शरीर इथंच ठेव आणि पाच दिवसानंतर परत ये. परंतु जाता जाता ज्या भोकाद्वारे तू आलास ते बुजवून टाकण्याचे काम न विसरता कर."

रडत-भेकत तो चिंतातूर अबिंग-निबू घरी परत आला, पण तो काही खात-पीत नसे व त्याचे चित्तही ठिकाणावर राहिले नाही. तो जंगलात भटकून आपला वेळ घालवू लागला. त्याच्या मार्गामध्ये तो एका विशिष्ट वियुच्या थडग्याजवळून जाऊ लागला. तेथे सर्वात पहिले तंबाखूचे रोपटे उगवले होते. अबिंग-निबू भुकेमुळे फार अशक्त बनला होता. खायला इतर काहीही नसल्यामुळे त्याने तंबाखूची काही पाने खुडली व ती चघळायला सुरवात केली. पण त्यानंतर त्याला फार बरे वाटले .. अगदी इतके बरे वाटू लागले, की तो आपल्या मुलाला घेऊन येण्याचेच पार विसरुन गेला.

मध्यंतरीच्या काळात, त्या कुंभाराने मुलाला जिवंत केले व बरे केले, परंतु त्याचे वडील त्याला नेण्यासाठी परत न आल्याने आपल्याच गोत्रात सामील करून घेतले; आणि तो मुलगाही जमिनीखाली सुखाने जगू लागला व सरतेशेवटी वियू बनला.

आणि या घटनेनंतर एकूण दोन गोष्टी घडून आल्या. त्या म्हणजे- माणसे मरू लागली आणि ती तंबाखू चघळण्याचे व ओढण्याचे शिकली.

आता शिमांग कथांपैकी १/२ नमुने पाहू.

**सियांग नदी (चा उगम):**

सुरवातीला सगळीकडे पाणीच पाणी होते. अशी कित्येक वर्षे गेली आणि एकदा डावनी सूर्य, पोलो चंद्राला म्हणाला, "आपण आपल्या मुला-बाळांकरिता कुठे घर बांधावे ? (ते समजत नाही)" त्यांनी त्यांच्या पोलंग सोबो या मुलाला, काहीही करून पाणी वाहून जाईल अशी तजवीज करण्यासाठी पाठविले. तो भला प्राणी तिबेट मधील कोजे-जांगो येथे आला, आणि सगळीकडे एक नजर टाकली; पण जरी ओतर आणि जॅकल काय करता येईल यासंबंधी मदत करण्यास तयार होते तरीही त्याला या सर्व पाण्यापासून सुटका करुन घेण्याचा मार्ग सापडला नाही.

सरतेशेवटी त्या पोलंग-सोबोचा स्वत:वरील ताबा सुटला, आणि त्याने आपल्या एका शिंगाने जमिनीत एक मोठा खडडा खणला; पण यावेळी त्याचे ते शिंग मात्र तुटले. खूप रक्तस्त्राव झाला आणि त्यापासून तामेंग झुडपे तयार झाली आणि झुडपांपासून लाल रंग तयार झाला. काळे शिंगापासून बांबू तयार झाला. शिंगातील

पांढरी पावडर जमिनीवर पडली व त्यापासून मीठाची निर्मिती झाली. म्हणूनच सर्वोत्कृष्ठ मीठ तिबेटमधील कोजे-जांगो येथून मिळते.

नंतर पोलंग-सोबोने आपल्या दुसऱ्या शिंगाने तो खड्डा पूर्ण केला आणि, ओतर व जॅकेल ज्या मार्गाने गेले होते त्या मार्गाने, पाणी वाहू लागले. म्हणून सियांग नदीचा प्रवाह घोंगावत, रोंरावत जाणार आहे. पोलंग-सोबो तसाच पुढे आसाममध्ये पोहोचला. तेथे त्याचे दुसरे शिंगही तुटले व तोही मरण पावला. या कारणामुळे आसामात सर्व प्रकारचे वृक्षांची, कापसाची व धातूंची सुबत्ता दिसून येते.

## माणसे रडायची कसे शिकली ?

पाण्याशी निगडीत अशा लाडो-लायो या जीवात्म्याला क्रिकेट नावाचा एक मुलगा होता. हा मुलगा जेव्हा मोठा झाला तेव्हा तो मुलींच्यासाठी असलेल्या राशेंगमध्ये दररोज संध्याकाळी जाऊ लागला. त्या सर्वांना तो खूप आवडत असे आणि तिथे एकही मुलगी अशी नव्हती की जिला त्याच्याशी लग्न करावेसे वाटले नाही, पण त्याला मात्र त्यांच्यातील एकहीजण पसंत नव्हती. त्याने पुष्कळशा राशेंगना भेटी दिल्या, आणि सरतेशेवटी त्याला गोइंग नावाची त्याच्याच कुळातील मुलगी पसंत पडली. त्याला ती आवडली आणि त्याने तिच्याबरोबर शय्यासोबतही केली. इतर मुलींना जेव्हा हे समजले तेव्हा त्या त्याला हसल्या व म्हणाल्या की, ''तो त्याच्या सख्ख्या बहिणीबरोबर राहतोय.''

त्या दोघा प्रेमिकांना खूप लाज वाटली व म्हणून ते खूप दूरच्या डोयनी-पोलो गावी गेले. परंतु तिकडे इतके गरम होते की, त्या मुलींची शुध्दच हरपली आणि तो क्रिकेट नदीतून तिच्यासाठी पाणी घेऊन येण्यापूर्वीच ती मेलीसुध्दा. तो परत आला, त्यावेळी तिच्यावर पाणी शिंपडले, पण खूपच उशीर झाला होता. तो तेथेच मटकन् खाली बसला आणि रडू लागला. तिच्या शरीरातून एक मिरचीचे झाड उगवले, क्रिकेटने त्याला खत-पाणी स्वत:च्या अश्रूंचे घातले.

लोकांनी जेव्हा ही मिरची प्रथम खाल्ली, त्यावेळी त्यांच्या डोळ्यातून पाणी आले आणि अशा प्रकारे ते रडण्याचे शिकले. मिरची माणसाला रडवते कारण एका नवऱ्याच्या अश्रूंनी पाणी घातलेले ते एक दु:खाचे प्रतीक असलेले झाड आहे.

आता रामो-पायल्बोंच्या २/३ कथा पाहू.

## धरणीकंप:

एकदा एके ठिकाणी जमिनीच्या खोलवर खाली मिथुनप्रमाणेच एक भयंकर डोंगराएवढा मोठा प्राणी रहात होता. त्याला मोठाली शिंगे होती पण एकच पाय होता आणि त्यावर तो उभा रहात असे. कधी कधी तो फडफडत असे, आणि त्याद्वारे तो लोकांना हवेतील बदलासारख्या गोष्टींसंबंधी गोष्टी सांगत असे.

ज्यावेळी कोणी मोठा माणूस-म्हणजे योध्दा, शिकारी किंवा श्रीमंत माणूस (या तीन गोष्टींनी माणूस मोठा होतो असे मानतात)- कोटीन लिंपो मरतो, त्यावेळी त्याच्या दफनानंतर तीन दिवसांनी फार मोठा भूकंप/धरणीकंप होतो. असे घडण्याचे कारण असे की त्याचा जीवात्मा त्याच्या शरीराजवळ दोन दिवस रहातो आणि तिसऱ्या दिवशी तो पोमटो-रोमटोकडे जातो. पोमटो-रोमटो जमिनीच्या खूप वर रहातो, पण प्रत्यक्षात त्याच्याकडे जाण्यासाठी जमिनीखालूनच जावे लागते. पण आता मिथुनसारख्या मोठ्या प्राण्याने तो मार्ग अडवलेला असल्याने ओरम (जीवात्मा) त्या मार्गाने जाऊ शकत नाही. म्हणून तो आपल्याकडचे मोठे हत्यार त्या प्राण्याला

मारण्यासाठी काढतो. हे पाहून तो प्राणी आपला भला मोठा पाय हलवतो आणि त्यामुळे सबंध धरणी/पृथ्वी कापते. (धरणीकंप होतो.)

मणिगाँगमध्ये डंग्यो पुलाँग नावाचा एक फार मोठा योध्दा व शिकारी प्रसिध्द होता आणि प्रत्येकजण त्याला फार मान देत असत. शिवाय तो खूप श्रीमंतही होता. तो जेव्हा वारला, त्यानंतर तीन दिवसांनी मोठा धरणीकंप झाला होता.

## चंद्रावरील अत्याचार (बलात्कार)

टामिंग-टामो नावाचा एक महाकाय आणि मर्दानी वियू होता. तो वियू स्त्रियांना तसेच मानवी-स्त्रियांनाही त्रास देत असे. डोयनीला हे अजिबात आवडत नव्हते. टामिंग-टामो त्याला म्हणाला की, "मी काय करतोय हे जर तुला आवडत नसेल, तर मी तुझ्या बायकोवर सुध्दा जबरदस्ती करीन." आणि त्याने तसे करण्याचा प्रयत्नही केला, पण डोयनीनी आपले प्रचंड तोंड उघडले व त्याला गिळून टाकले. परंतु कसेतरी करून टामिंग-टामोने आपली सुटका करून घेतली. परंतु त्यानंतर टामिंग-टामो रस्त्याच्या बाजूला लपून बसला व तेथून त्याने पोलो (चंद्र व डोयनीची बायको) वर उडी घेतली व बलात्कार केला. अशा प्रकारे डोयनी मात्र पराभूत झाला. अलीकडे आता टामिंग टोमो पोलो या चंद्राला पाहिजे तेव्हा पळवतो, आणि कुठेतरी नेऊन तिच्यावर अत्याचार करतो. याला आपण चंद्रग्रहण म्हणतो.

## पहिली-वहिली घर बांधणी
## किंवा
## पहिली घरे:

सुरवातीला माणसे गुहेमध्ये व पक्षांच्या सारखी रहात असत. वाळवीला व लाल मुंग्यांनाही घरे कशी बांधावीत याचे ज्ञान नव्हते. परंतु एके दिवशी त्यांनी एका मधमाशीला तिचे पोळे तयार करताना पाहिले.

"हे तू कसे काय करतेस? (बांधतेस)" त्यांनी तिला विचारले.

"मी माझ्याजवळच्या मेणाचा वापर करून हे बांधते" मधमाशी म्हणाली.

त्यांनी तिच्याशी मैत्री केली व तिने त्यांना मेण दिले व त्यायोगे त्या दोघांनीही (वाळवी व लाल मुंगीने) आपली घरे बांधली; एक जमिनीत व दुसरे झाडावर!

जेव्हा हे सर्व तेथील पुरुष व स्त्रियांनी पाहिले, तेव्हा 'हे कसे काय शक्य झाले?' असे त्यांनी त्या मुंग्यांना विचारले. त्यांनी मधमाशीकडे जाण्यास माणसांना सांगितले. परंतु त्यांनी जेव्हा मधमाशीकडे मदत मागितली, तेव्हा ती म्हणाली, "तुम्ही लोक माझ्या जातीचे शत्रू आहात, म्हणून मी तुम्हाला मेण देऊ शकत नाही."

शेवटी त्यांना मेणाची चोरी करावी लागली. त्यांनी वाळवीप्रमाणे सर्व प्रथम मातीचे घर बांधले, पण पावसाने ते सर्व वाहून गेले. नंतर ते एका कारागिराकडे गेले व त्याचा सल्ला विचारला, पण वाटेतच त्यांना एका जोडप्याच्या सर्वांगाचे मांस झडून फक्त हाडाचा सापळा शिल्लक राहिलेला दिसला.

त्यांनी तो सापळा पाहिला व "आपणही यासारखेच घर बांधू या! व त्यात राहू." असे ठरविले.

असे म्हणून ते घरी गेले व त्या मृत शरीरासारखे एक घर त्यांनी बांधले, त्यावर छत म्हणून झाडाची पाने पसरली व त्यात ते राहू लागले.

# आदिवासी कलेचे स्वरूपः एल्विन यांच्या दृष्टीकोनातून

सुचित्रा साठे

प्रस्तुत लेख एल्विन यांच्या 'ट्रायबल आर्ट ऑफ मिडल इंडिया' ह्या पुस्तकावर आधारित आहे.

आदिवासी कलेची माहिती देताना सुरूवातीलाच एल्विन यांनी कलात्मक आणि सौंदर्यपूर्ण ह्यामध्ये फरक केला आहे. त्यांच्यामते आपण ज्याला 'कला' म्हणून संबोधतो ती किंवा त्या स्वरूपाची कला आपल्याला आदिवासी संस्कृतीमध्ये दिसून येणार नाही. परंतु ज्याचा आपण आदिवासी कला म्हणून निर्देश करतो त्यात कलात्मकता, सौंदर्यपूर्णता आढळते. त्यामुळे एल्विन यांच्या थोडे पुढे जाऊन आपण असे म्हणू शकतो की, आदिवासींची कला ही आपल्या रूढार्थाने कला नसली तरी ती सौंदर्यपूर्ण नक्कीच आहे. म्हणजेच कलापूर्ण आणि सौंदर्यपूर्ण ह्यात फरक केल्यास आपल्याला असे म्हणता येईल की, जे जे कलापूर्ण असते ते ते सौंदर्यपूर्ण असतेच, पण ह्या उलट जे जे सौंदर्यपूर्ण असते ते सर्वच 'कला' ह्या वर्गात सामावले जाणार नाही. आदिवासींची कला ही पण 'कला' वर्गात न मोडणारी पण 'सौंदर्यपूर्ण' वर्गात सामावणारी होऊ शकेल. परंतु ही आदिवासी कला- जी सौंदर्यपूर्ण आहे- पण कला नाही असे का ? कोणत्या निकषांवर आपण तिला कला म्हणू शकणार नाही ? इत्यादि प्रश्नांचा विचार आदिवासी कलांच्याच अनुषंगाने करावा लागेल. थोडक्यात आपल्याला कलेचे निकष आदिवासी कलांना लागू पडतात का नाही ते पहावे लागेल.

कोणत्याही कलेचा विचार करताना आपल्याला कलाकार, कलावस्तू आणि कलास्वाद ह्या तीन घटकांचाच विचार करून चालणार नाही. तर, त्या बरोबरच कलानिर्मितीमागच्या हेतुंचाही विचार करावा लागेल. कला निर्मितींच्या हेतुंचा विचार सर्वसाधारण दोन दृष्टीकोनातून केला जातो. ते म्हणजे, (१) कले साठी कला आणि (२) विशिष्ट उद्देशाने केलेली निर्मिती. उदा. सामाजिक बदल, प्रबोधन, निव्वळ आनंद निर्मिती.

परंतु जेव्हा आपण आदिवासी कलेचा विचार करतो तेव्हा ह्या दोन्ही शक्यता फारच कमी जाणवतात. निव्वळ कलेसाठी कला ही आपल्याला थोड्या भिन्न स्वरूपांमध्ये आदिवासींमध्ये आपल्याला पहायला मिळते. (त्याचा विचार चर्चेच्या ओघात केलेला आहे.) पण काही विशिष्ट उद्देशाने केलेली निर्मिती येथे अभावानेच दिसून येईल. मग आदिवासी कलांचे मूळ आपल्याला कशात दिसून येते ते पहावे लागेल. एल्विन यांनाही त्यांच्या वर निर्देश केलेल्या पुस्तकात अशाच प्रकारचा प्रयत्न केला आहे. त्याच आधाराने आपण वरील प्रश्नांची उकल करायचा प्रयत्न करू शकतो.

एल्विन यांच्या पुस्तकांच्या आधारे आपल्याला असे म्हणता येईल की आदिवासी कलांचा उगम मुख्यतः दोन गोष्टीमध्ये दिसून येतो.
(१) दैनंदिन गरजा- उदा. वस्त्र, निवारा इ. भागविणयासाठी करायला लागणारी धडपड आणि त्यातूनच पुढे आलेला त्यातील सौंदर्याविष्कार.
(२) दैनंदिन गरजांच्या स्थिरतेनंतर दिसणारे दुसरे निमित्त म्हणजे धार्मिक व सामाजिक चालिरिती आणि त्यांच्या पूर्ततेसाठी केली जाणारी सौंदर्यपूर्ण निर्मिती.

हया दोनही घटकांचा विचार करणे महत्वपूर्ण ठरते, कारण त्यातूनच आदिवासी

कलांचे मूळ शोधायला मदत होईल, तसेच त्यांना रुढार्थाने कला म्हणता येईल का हे ही पहाता येईल.

दैनंदिन गरजांचा विचार करताना वस्त्रप्रावरणांचा विचार आधी करु या. बहुतेक आदिवासी कपडे बनविण्यासाठी मिल मध्ये तयार होणारे कापड किंवा तयार कापडाचे तयार कपडेच वापरतात. परंतु त्या आधी ते जंगलात उपलब्ध असणाऱ्या वस्तुंचाच वस्त्रांसाठी उपयोग करत. हयासाठी मुख्यत: मोठमोठया पानांचा नारळाच्या झावळ्या, रानकेळीची मोठमोठी पाने इत्यादिंचा वापर करत. तसेच शिकार केलेल्या मोठ्या प्राण्यांच्या कातडीचाही वापर करत. हया नंतरची पायरी म्हणचे झाडांच्या सालींपासून वस्त्रे, वल्कले तयार करणे. त्यासाठी ते झांडाच्या फांद्या वाळवून त्यांची साले काढत. नंतर ती पाण्यात भिजत घालून मऊ करत. जंगली घालून सुवासिक करत. काही वेळा नारळाच्या पाण्यात हळद कालवून रंगवत आणि हया धाग्यापासून वस्त्रे विणत. त्यासाठी त्यांचे छोटेछोटे मागही होते. नंतर आदिवासींचा जसजसा नागर संस्कृतीशी संबंध येऊ लागला तसे ते सूत विकत घेऊन किंवा घरीच सूत बनवून कापड विणू लागले. हया कापड विणण्यात ही विविधता दिसून येते. चित्तकारक रंगसंगती आणि त्यानुसार बदलणाऱ्या पण काही ठराविक प्रकारच्याच विणी. ही रंगसंगती ही निसर्गात आढळणाऱ्या गोष्टीतूनच घेतलेली दिसते उदा. वाघ किंवा चित्त्यांच्या अंगावरील पट्ट्यांप्रमाणे दिसणारे कापडावरील पट्टे वस्त्र, ही जरी नित्य गरजेची असली तरी त्याबरोबरच केवळ सौंदर्यवाढीसाठी शरीर सजावट केलेली ही आढळते. त्यासाठी ते पूर्वापारपासून त्यांना सहज मिळणाऱ्या पानाफुलांचाच उपयोग करीत. पण हल्ली ते बाजारात मिळणाऱ्या मण्यांच्या माळा किंवा धातूचे दागिनेही वापरतात. पूर्वी ते हाडे किंवा मांसाचे मणी बनवत आणि त्याचे दागिने करुन घालत. मांस व हाडे हयांचे दागिने बनविण्यामागची एक आख्यायिका मुडिया आदिवासींमध्ये प्रचलित आहे. जेव्हा आदिवासींचा नागर संस्कृतीशी परिचय होऊ लागला त्या सुमारास ही गोष्ट घडली असावी, ती अशी. एकदा एक जमिनदार आदिवासी भागातून प्रवास करीत होता, तेव्हा त्याच्या कुटुंबातील स्त्रिया व मुलींच्या अंगावरील सोन्या-चांदीचे दागिने पाहून एक लहान आदिवासी मुलगी तशाच दागिन्यांसाठी हट्ट धरुन बसली. ती रडायची थांबेचना तेव्हा लोक तिला घेऊन गावदेवीला गेले तरी तिचे रडणे थांबले नाही. तेव्हा लोकांचा असा समज झाला की तिला दागिने दिले नाहीत तर देवीचा कोप होईल कारण देवी समोरही ती रडायची थांबली नाही. पण दागिने आणणार कसे ? शहरात जाणे कठीण आणि गेले तरी दागिने विकत घ्यायला पैसे कुठून आणायचे ? हा पेच सोडविण्यासाठी तिच्या घरच्यांनी एक शेळी मारली. तिच्या मांसाचे बारीक तुकडे करुन लाल काळे मणी तयार केले. हाडे कापून त्याचेही मणी बनवले आणि ह्या मण्यांचे दागदागिने करुन त्या मुलीला घातल्यावर ती रडायची थांबली. तेव्हा पासून आदिवासींमध्ये हाडे व मांसांच्या तुकडयाचे दागिने घालण्याची प्रथा पडली.

दागदागिने घालणे, निरनिराळ्या केशभूषा करणे, त्यातून आदिवासींची सौंदर्याची जोपासना करण्याची सहज प्रवृती दिसून येते पण म्हणून, ह्यातून 'कला निर्मिती' केली जाते असे रुढ अर्थाने कितपत म्हणता येईल हे सांगणे कठीण आहे.

आदिवासींच्या दागिन्यात किंवा इतर नित्योपयोगी वस्तुंमध्येही कवडयांचा वापर फार मोठ्याप्रमाणात केलेला दिसून येतो. काहींच्या मते कवडया हे अर्धवट मिटलेल्या डोळ्यांचे प्रतिक आहेत. म्हणूनच बऱ्याच देवतांच्या मूर्तींना ते कवडयाचे डोळे बसवतात. तसेच असाही एक समज आढळून येतो की कवडयांच्या वापराने वाईट नजरेपासून संरक्षण मिळते. त्यासाठी ते लहान मुलांच्या गळ्यात कवडयांची माळ घालतात किंवा

वहाणेला कवड्या बांधून गावाबाहेर उंचावर टांगून ठेवतात, ज्यामुळे गावावर कोणतेही संकट येणार नाही किंवा गावावरचे संकट टळेल. कवड्यांमध्ये जादूटोणा दूर करण्याची शक्ती आहे असे मानले गेल्यामुळे भगत मंडळीही दाणा उतरवताना, वगैरे कवड्या बसवलेले कपडे घालतात.

कवड्यांचा आणखी एक उपयोग म्हणजे देवघेवीचे साधन. आदिवासी जसे आता नाण्यांच्या माळा करुन घालतात तसेच ते पूर्वी कवड्यांच्या देवघेवीच्या चलनाच्या माळा घालीत असावेत. भारतातल्या काही थोड्या जमातीत तसेच इजिप्त, सिरिया, जपान इ. ठिकाणच्या जमातीत कवड्यांना पुनरुत्पादनाचे प्रतीक मानले जाते; परन्तु एल्विन यांच्यामते भारतात हा समज फारसा रुढ नाही. भारतात त्यांचा वापर वाईट नजरेपासून बचाव करायलाच केला जातो. शिवाय त्यांच्या आकर्षक आकारामुळे दागदागिने, पिशव्या, कंगवे इ.चे सौंदर्य खुलविण्यासाठीही त्यांचा वापर करतात. अशाप्रकारचा कवड्यांचा वापर आदिवासींची कलात्मकतेची आवड तसेच त्यांची सौंदर्यदृष्टीही सूचित करतो. अर्थात एल्विन यांनी जमवलेली माहिती आणि त्यासाठी जमवलेला आदिवासी कलांच्या फोटोंचा संग्रह यावरुनच ते या निष्कर्षाप्रत येतात.

काही आदिवासींमध्ये दिसून येणारी आणखी एक कलात्मक चीज म्हणजे आदिवासींचे कंगवे. बहुतेक आदिवासी आता बाजारात मिळणारे कंगवे वापरत असले तरी पूर्वी ते स्वत:च लाकडी कंगवे बनवत. पण फारच थोड्या जमाती सुबक कंगवे बनवत. कोंड, माडिया, बैगा हे आदिवासी कंगवे बनवायला विशेष कष्ट घेतात. त्यातही माडियांचे कंगवे जास्त कलात्मक व वैविध्यपूर्ण असतात. काही त्रिकोणी तर काही चौकोनी, काही दोन्ही बाजूला दाते असलेले तर काहींमध्ये एका बाजूला दाते आणि दुसऱ्या बाजूला नक्षीकाम केलेले आढळते. काही कंगव्यांना डोक्याला बांधायची पट्टी जोडलेली असते तर काहींना गवताच्या झिरमिळ्या किंवा त्यात बांधलेल्या कवड्या आढळतात. माडिया लोकांच्या काही कंगव्यांना धातूची नक्षीकाम केलेली पट्टी असते. त्यात पारंपरिक वाद्ये, नाचाचे प्रकार कोरलेले असतात तर पुरुषांच्या कंगव्यांवर शिंगे, योध्यांची चित्रे ही आढळतात.

आदिवासींचे कंगवे जरी वैशिष्ट्यपूर्ण, कलात्मक असले तरी ते बनवण्यासाठी काही विशेष संकेत असतात. तरुण माडिया हे कंगवे बनवून आपल्या मैत्रिणीला भेट देतात आणि तरुण मुलीही त्यांना मिळणाऱ्या कंगव्यांची सुरेख रचना करतात. परन्तु हे कंगवे त्या लग्न होई पर्यंतच वापरु शकतात. लग्नानंतर ठराविक काळात, एका विशिष्ट दिवशी त्यांना ते कंगवे काढून टाकावे लागतात. म्हणजेच कंगवे बनविण्यातच नाही तर त्यांच्या वापरात ही काही सामाजिक संकेत, चालीरिती दिसून येतात.

काही आदिवासींमध्ये असाही समज आहे की जर का एखाद्या मुलीने तिला भेट मिळालेला कंगवा स्वीकारला तर कंगवा देणाऱ्याची व तिची मैत्री चटकन जमते. ह्या समजातूनच काही आदिवासींमध्ये लग्नात नवऱ्यामुलाने नवरीला कंगवा भेट देण्याची प्रथा पडली असावी. काही आदिवासींमध्ये धर्मगुरू नवरा-नवरीला कंगवे भेट देतात.परंतु ह्या लोकांमध्ये अशी प्रथा आहे की माणूस मेला की धर्मगुरुने दिलेला कंगवाही त्याच्या बरोबर पुरतात. थोडक्यात, असे म्हणता येईल की ज्या जमातीत कंगव्याला सामाजिक महत्व आहे, काही रितीरिवाज त्याच्याशी निगडीत आहेत अशाच आदिवासींमध्ये कौशल्यपूर्ण, कलात्मक कंगवे बनवलेले आढळतात.

वरील प्रकारच्या उदाहरणात नित्योपयोगी वस्तू बनविण्यातील आदिवासींची कलात्मक दृष्टी दिसून येते. परन्तु ह्याच बरोबर निव्वळ सजावटीसाठी किंवा सौंदर्यवृद्धीसाठी ही ते

निरनिराळ्या कलात्मक वस्तू बनवितात. उदाहरणार्थ भारतातील आदिवासी रोज डोक्यावर टोपी किंवा फेटा बांधतात. पण विशेष प्रसंगी नाचासाठी प्रामुख्याने ते प्राण्यांची शिंगे, पिसे यापासून बनवलेले शिरपेच घालतात. ह्यासाठी बैलांची किंवा सांबार शिंगे वापरतात. शिंगांभोवती टोपीसारखे कापड गुंडाळून त्यात मोरपिसे वगैरे खोचतात आणि सुंदर शिरपेच बनवतात. फक्त नाचाच्या आधी हा शिरपेच बनवतात एरवी सर्व सुटे करुन बांबूच्या टोपलीत ठेवतात.

शिरपेचा ऐवजी कागदाच्या लगद्याचे किंवा लाकडी मुखवटेही बनवतात. त्याला नाक डोळ्यांच्या जागी खाचा असतात. मुखवटचांना जिवंतपणा आणण्यासाठी अस्वल किंवा घोड्यांच्या केसांचा केस, मिशा म्हणून वापर करतात. परंतु काही माडिया लोक अस्वलाचे केस मुखवटचांना चिकटवत नाहीत. त्याचे कारणही ते देतात. एकदा एका लहान माडिया मुलीला एका गालावर दाढी सारखे केस आले त्याचे कारण म्हणजे तिच्या वडिलांनी मुखवटचासाठी अस्वलाच्या केसाचा वापर केला म्हणून असे झाले. तेव्हा पासून त्यांनी मुखवटचांना केस चिकटवणे बंद केले.

कोंड लोकही माणसांच्या चेहऱ्यासारखे मुखवटे बनवतात. पण त्यांच्या मुखवटे बनवण्यामागची कुळकथा वेगळीच आहे. इतर आदिवासींप्रमाणे कोंडही पूर्वी नरबळी देत असत. कालौघात ही प्रथा बंद होऊन नरबळी ऐवजी ते बैलाचा बळी देऊ लागले. पण तेव्हापासून त्यांना रात्री निरनिराळे भास होऊ लागले, आवाज ऐकू येऊ लागले. तेव्हाच एका भगताच्या स्वप्नात पृथ्वी देवता आली आणि तिने तिला संतुष्ट केले तरच हे भास थांबतील असे सांगितले. त्यासाठी तिने माणसाच्या चेहऱ्यासारखा मुखवटा तयार करुन आधी त्याचा बळी देऊन मग बैल बळी देण्यास सांगितले. तेव्हा पासून कोंड लोक बळी देण्यासाठी मुखवटे बनवू लागले. परंतु अशा कारणासाठी मुखवटे बनवणारे आदिवासी विरळाच किंवा फक्त कोंडच असतील. बहुतेक आदिवासी नाचासाठी निरनिराळ्या प्राण्यांचे मुखवटे करतात. हल्ली हिंदू संस्कृतीच्या प्रभावाने ते निरनिराळ्या देवदेवतांचे तसेच असूरांचेही मुखवटे बनवतात. त्यांच्या नाचाच्या कथांचेही हिंदू पुराणातील कथांशी साधर्म्य असते, ज्यात बलिष्ठ राक्षसाला मारण्यासाठी देवांना मानवाचा अवतार घ्यायला लागतो आणि राक्षसवधा नंतर आनंदोत्सव साजरा केला जातो. म्हणजेच मुखवटे केवळ सामाजिक रुढींसाठीच तयार केले जातात असे नाही तर कित्येकदा निव्वळ आनंदही त्यातून व्यक्त केला जातो. पण दोन्हीतही सारखाच जिवंतपणा आढळतो, कलात्मकता आढळते.

आदिवासींचे नाच, त्यांच्या घरावरील, भिंतिंवरील चित्रे ही पूर्णतः आनंदनिर्मिती साठी, सौंदर्यवृद्धीसाठी केलेली असतात. त्यातील आशय जरी पारंपरिक, सामाजिक असले तरी त्यातून आदिवासींचे कलासक्त मन व्यक्त होते तसेच व्यतीत होते ते त्यांची सुंदरतेबद्दलची ओढ, सौंदर्य जोपासण्याची वृत्ती. थोडक्यात, आपल्याला असे म्हणता येऊ शकेल की मनुष्य जसजसा सुसंस्कृत होत गेला, जसजशा त्याच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या तसतशा त्याने ज्ञानाच्या निरनिराळ्या शाखा तयार केल्या, त्याचे सुसंबद्ध, सुसंगत शास्त्र बनवले आणि कोणतीही निसर्गनिर्मित किंवा मानवनिर्मित वस्तू तो ह्याच चौकटीतून पाहू लागला. आदिवासी कलांकडे आपण जेव्हा ह्याच चौकटीतून पहातो तेव्हा आपल्याला जाणवते की, आदिवासींची कला आपल्या कलेच्या चौकटीत बसणारी नाही. मग प्रश्न उरतो, आदिवासी कलेचे स्वतंत्र असे महत्व आहे का ? स्वतंत्र अस्तित्व आहे का ?

आदिवासींची कला ही आज प्रामुख्याने सामाजिक, सांस्कृतिक संकेतांनी बांधलेली आहे, रुढ चालीरिती रितीरिवाजाच्या अनुषंगानी फुललेली

आहे. म्हणूनच त्याकडे निखळ कलेसाठी कला म्हणून पहाता येणार नाही पण आदिवासींची कलासक्ती निश्चितच अमान्य करता येणार नाही, कारण सौंदर्यनिर्मितीची, सौदर्य जोपासनेची आणि त्यातून आनंद उपभोगण्याची जी सहज मानवी प्रवृती आहे ती आदिवासींच्या दैनंदिन जीवनातूनही प्रगट होते. फक्त काही प्रश्न उरतात ते म्हणजे आदिवासींचा जसजसा नागर संस्कृतीशी घनिष्ट संबंध येईल, त्याचा त्यांच्या कलेवर परिणाम होईल काय ? परिणामत: त्यांच्या कलात बदल होईल का ? बदल झाल्यास ह्या बदलाचे स्वरुप कसे असेल ? सर्वात महत्वाचा प्रश्न म्हणजे बदललेल्या स्वरुपामध्ये आदिवासी कलांचे स्वतंत्र असे स्थान कायम राहिल का ?

परन्तु ह्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आजच्या आदिवासी संस्कृतीचे चित्रण, आजची आदिवासी कला, कलेचे स्वरुप पहाण्याची नितांत आवश्यकता आहे. कारण प्रस्तुत लेखात निर्देश एल्विन यांचे ''ट्रायबल आर्ट ऑफ मिडल इंडिया'' हे पुस्तक १९५१ साली प्रकाशित झालेले आहे आणि काळाच्या ओघात आदिवासी संस्कृती नागरी जीवनाशी खूपच सामावून गेलेली दिसते आणि म्हणूनच आजच्या आदिवासी कलेचे स्वरुप मांडणे ही काळाची गरज भासते.


## हाकारा

( फॉर्म ४, नियम ८ नुसार निवेदन )

१. प्रकाशन स्थळ: ६४/३, आनंद पार्क, औंध, पुणे-४११००७.

२. प्रकाशन काळ: त्रैमासिक

३. मुद्रक, प्रकाशक, संपादक: रामचंद्र केशव मुटाटकर

४. राष्ट्रीयत्व: भारतीय

५. पत्ता: ६४/३, आनंद पार्क, औंध, पुणे-४११००७.

६. स्वामित्व: महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद,६४/३, आनंद पार्क, औंध, पुणे-४११००७.

मी, रामचंद्र केशव मुटाटकर जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीनुसार व समजुतीनुसार खरा आहे.

रा. के. मुटाटकर.
प्रकाशक
३१ जानेवारी १९८९

# डॉ. वेरिअर एल्विन यांची आदिवासींच्या प्रगतीसाठी दिलेली रूपरेखा

सविता देशपांडे

पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. वेरिअर एल्विन यांच्या ''ए फिलॉसॉफी फॉर नेफा'' या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेमध्ये म्हणाले,

''आपण आदिवासींच्या जीवनामध्ये सहभाग व रस घ्यायचा नाही, त्यांच्या कारभारामध्ये जास्त ढवळाढवळ करणे, आणि विशेषतः इतर भागातील आधिकारीही तिथे पाठविणे चांगले नाही.

या दोन विरूध्द टोकांमधून आपल्याला प्रगती घडवून आणायची आहे, त्यामध्ये दळणवळण, आरोग्य सुविधा, शिक्षण, प्रगतीशील शेती वगैरे प्रकारच्या योजना येतील. आणि हा प्रगतीचा यशोमार्ग खालील पंचशील तत्वांच्या साहाय्याने मिळवता येईल.

१) लोकांची प्रगती त्यांच्या विचारानेच व्हायला हवी. त्यांच्यावर आपण कोणत्याही प्रकारची सक्ती करायला नको. त्यांच्या पारंपरिक कला व संस्कृती यांना आपण स्फूर्ती दिली पाहिजे.

२) आदिवासींच्या जंगल व जमीन यांच्यावरील आधिकारांना मान दिला पाहिजे.

३) आपण त्यांच्याच लोकांची एक तुकडी बनवून त्यांना त्यांच्या प्रगतीच्या दृष्टीने कारभार पाहण्याचे प्रशिक्षण दिले पाहिजे.

४) आपण त्यांच्या कारभारात अति लक्ष घालणे चांगले नाही व आपण आपल्या असंख्य योजनांनी त्यांना दडपून टाकणे चांगले नाही.

५) आपण फलाची परीक्षा, सांखिक तत्त्वाने किंवा त्यांच्यावर खर्चलेल्या पैशाने करू नये तर, त्याऐवजी माणसाची विशेष लक्षणे जी तयार झाली आहेत, त्यांची प्रत पाहावी. ''

९ ऑक्टोबर १९५८

## उत्तर पूर्व सीमा एजन्सी:-

उत्तर पूर्व सीमा एजन्सीचा इतिहास शेकडो वर्षांपूर्वी दंतकथेमध्ये व परंपरेमध्ये उदयास आला. उत्तरपूर्व सीमा एजन्सी ही घटनेप्रमाणे आसाम राज्याचा भाग आहे, आणि जेव्हा या भागाची पुरेशी प्रगती होईल, तेव्हा तो आसामला जोडला जाईल. याचा कारभार परराष्ट्र खाते, आसामच्या गव्हर्नरच्या साहाय्याने बघते. याचा कारभारप्रमुख हा गव्हर्नरचा उपदेशक असतो व यांची मुख्य कचेरी शिलाँग मध्ये आहे. आणि कारभारप्रमुखाला, कायदेविषयक सल्लागार, आदिवासीविषयक सल्लागार, आर्थिक सल्लागार, व आरोग्यप्रमुख, अभियांत्रिकी प्रमुख व शिक्षण, शेती आणि जंगलविषयक सल्लागार यांच्याकडून साहाय्य मिळते.

उत्तरपूर्वसीमा एजन्सीमध्ये ३०,००० चौरस मैलापेक्षाही आधिक भाग येतो. हा सर्व भाग डोंगराळ आहे. आणि ह्या भागाला भुतानने पश्चिमेकडून, तिबेट व सिकाँग उत्तर व पूर्वेकडून, बर्मा दक्षिणपूर्वेकडून व्यापलेले आहे. ह्या भागामध्ये हजारो छोट्या नद्या आहेत. हा भाग जवळजवळ आदिवासींचा देशच म्हटला पाहिजे.

या भागातील प्रमुख आदिवासी म्हणजे

१) कामेंग:- हे भूतान आणि तिबेटच्या हद्दीवर राहतात.

२) सुबानसिरी:-

३) सियांग:- ह्यांना बऱ्याच वर्षांपासून जवळ जवळ आतापर्यंत 'अबोर' नावाने ओळखले जाई.

४) लोहित:- हे मिश्मी टेकड्यांवर राहतात.

५) तिराप:- हे बर्मा सरहद्दीवरच्या, मर्गेरिटा व ब्रह्मपुत्रा दऱ्यांवरच्या टेकड्यांवर राहतात.

**प्राथमिक प्रश्न:-**

**आदिवासींना स्वतंत्र सोडण्याचे धोरण:-**

आदिवासी लोक कदाचित अधिक आनंदी राहतील जर, आपण त्यांना एकटे सोडले. त्यांच्याकडे जीवनातील बऱ्याच गोष्टी नाहीत. परंतु दुसऱ्या बाजूने विचार करता, ते स्वतंत्र व मोकळे आहेत, त्यांच्यामध्ये कोणी ढवळाढवळ करीत नाही. ते त्यांच्या धर्म व परंपरेनुसार जगू शकतात. परंतु तरीही त्यांची कला ओबड धोबड आहे, त्यांच्या धर्मात बऱ्याच अंधश्रद्धा आहेत. त्यांच्यामधे बरेच रोग आढळतात आणि या दोन गोष्टी अगदी टोकावर आहेत म्हणूनच आदिवासींकडे पूर्णत: न लक्ष देणे, व वगळणे चांगले नाही तर, ह्या बरेच वर्ष दुर्लक्षित झालेल्या भागाकडे आधुनिक दृष्टीने लक्ष घातले पाहिजे.

**आदीवासी विलिनीकरण धोरण:-**

वरील आदिवासींना स्वतंत्र सोडण्याच्या धोरणाच्या अगदी विरुद्ध धोरण म्हणजे आदिवासी विलिनीकरण धोरण. बऱ्याच ख्रिश्चन मिशिनरी, समाजसुधारक, ग्रामसुधारक हे धोरण वापरत आहेत आणि याचा बऱ्याच वेळेला फायदा झालेलाही दिसून येतो. परंतु याचे बरेच तोटेही आहेत. ह्या प्रकाराची प्रगती पूर्वइतिहास तोडून आहे. पूर्वइतिहासापासून होत नाही आणि ह्यामुळे आदवासी माणसाला त्याच्या धर्म व संस्कृतीची लाज वाटू लागते व हे राजकीय व सामाजिकदृष्ट्या धोक्याचे आहे. यामुळे आदिवासी लोकांची एकता कमी होऊन, त्यांच्या दंतकथा, नृत्य वगैरे लोप पावून तरुण पिढीला एका अनोळख्या जगात प्रवेश करावा लागतो आणि याचबरोबर भारतात आदिवासींचे जातीत रुपांतर चाललेले आहे. आणि या जाती सामाजिक दृष्टया खालच्या पातळीवरील आहेत आणि ह्यामुळे आदिवासी संस्कृतीरहित होतील व हे त्यांच्या प्रगतीपथाच्या आड येत आहे.

यासाठी पं. जवाहरलाल नेहरुंनी मार्ग दर्शविलेला आहे. हा मार्ग आदिवासींच्या ऐतिहासिक प्रगती व संस्कृती ह्यांच्याकडे मानाने बघतो आणि लोकांकडे कोणत्याही वरचढ भावनेने न बघता, त्यांच्याकडे प्रेमाने बघतो. हा त्यांच्या इतिहासाकडे लक्ष देऊन, त्याच्यावर आधारित, आधुनिक जगातील चांगल्या गोष्टींची सुरुवात करतो परंतु हे करताना त्यांच्या सांस्कृतिक जीवनात काहीही अडथळा येता कामा नये, व उलट त्यांच्यातील चांगल्या गोष्टी जोमाने वर येतील. शिक्षण, आरोग्य, दळणवळण या सर्व गोष्टी निश्चितच जरुरीच्या आहेत, परंतु हे करताना त्यांच्या जीवनात अडथळा यायला नको. भारत सरकारच्यादृष्टीने आदिवासींची प्रगती त्यांच्या बुद्धी, विचार, व संस्कृती प्रमाणे होणे जरुरीचे आहे. त्यांच्यावर काहीही लादले गेले नाही पाहिजे.

**भौतिक उद्देश:**

भौतिक उद्देशाचे तत्व, भरले पोट, निरोगी त्वचा, आरोग्यदायी फुफ्फुसे व चांगली गर्भधारणा यावर आधारित असले पाहिजे

**आदीवासींचा जमिनीचा प्रश्न:-**

जमिनीच्या मालकीची पद्धत प्रत्येक आदिवासींमध्ये वेगवेगळ्या प्रकारची असते. उत्तरपूर्व सीमा एजन्सीमध्ये मुख्यत: तीन प्रकाराच्या

जमिनमालक्या दिसून येतात.

१ ) व्यक्तिश: मालकीची जमीन

२ ) कूळ किंवा गावाच्या मालकीची जमीन

३ ) झूम प्रकारची शेती आणि आदिवासी जे नेहमीच्या पद्धीने शेती करतात.

आदिवासी लोक त्यांच्या मनात जमिनीविषयी, मालकी हक्काच्या भावनेपेक्षाही अधिक काहीतरी असते. जमीन त्यांना, त्यांचा इतिहास, त्यांच्या दंतकथा, त्यांची दऱ्याखोऱ्यातील प्रवासवर्णने व शूरवीरांच्या कथांशी फारच निगडीत आहे.

'झूम प्रकारची शेती' हा एक सध्याचा वादाचा विषय आहे, ह्यामुळे जंगलांवर वाईट परिणाम होतात, कारण या पद्धतीत मोठी झाडे पाडून, तेथे शेती केली जाते. तसेच जमिनीची धूपही वाढत जाते व मोठी झाडे तोडण्यासाठी बराच वेळ व शक्ती वाया जाते; परंतु आता शास्त्रीय संशोधनामुळे बऱ्याच नव्या पद्धती आल्या आहेत, की ज्यामुळे ह्या प्रकारच्या शेतीचे तोटे कमी होत असून, जमिनीची सुपिकता वाढत आहे. परंतु ह्या पद्धतीच्या शेतीचा प्रमुख फायदा म्हणजे, ह्यामध्ये सामुदायिक शेती केली जाते व आज, सामुदायिक शेतीच्या दिशेने जग वाटचाल करीत आहे. आदिवासींमध्ये जर कायमस्वरुपी शेती सुरु केली, तर जमीन म्हणजे फक्त स्वत:ची मालमत्ता ही भावना रुजू होईल आणि आदिवासी पंचायतीद्वारा भाताची लागवड सामुदायिक पद्धतीने सुरु करता येईल.

भारत सरकारने १९४७ मध्ये आदिवासींच्या जमीन हक्कासाठी कायदे लागू केले आहेत. हे कायदे आदिवासी लोकांना त्यांच्या परंपरागत झूम प्रकाराच्या शेतीचे पूर्ण अधिकार देतात. कोणत्याही आदिवासीची जमीन परंपरागत किंवा १९४७ पूर्वी खरेदी केली असल्यास ती त्याच्या पूर्णपणे मालकीची असते. आदिवासींची जमीन फक्त आदिवासी माणसेच खरेदी करु शकतात, इतरांना त्यांच्याकडून जमीन खरेदी करता येत नाही.

**राखीव जंगलांचा प्रश्न: -**

उत्तर पूर्व सीमा एजन्सीमध्ये प्रामुख्याने ३ प्रकारची जंगले आढळतात.

१ ) जी जंगले सरकारने राखीव जंगले म्हणून जाहीर केली आहेत आणि अशा प्रकारची जंगले खूप कमी आहेत

२ ) जी जंगले राखीव जंगले म्हणून जाहीर केली नाहीत, परंतु तिथे लोकसंख्या फारच कमी आहे

३ ) जी जंगले गावाच्या सरहद्दीमध्ये येतात.

काही लोकांनी त्यांचे मत मांडले होते की, तिथे बरेच जंगलांचे पट्टे आहेत, की जे कोणाच्याच मालकीचे नाहीत, तर अशा प्रकारचे पट्टे राखीव जंगले म्हणून जाहीर करावेत, त्यामुळे लाकडाची बचत होईल.

आदिवासी भागात राखीव जंगलांचे तत्त्व थोडेफार बदललेही आहे. उत्तरपूर्व सीमा एजन्सीमध्ये जी जंगले गावाच्या सरहद्दीत येतात, त्यामधील काही भागातून जंगल तोड त्यांच्या आजच्या व उद्याच्या वाढत्या गरजांसाठी-करण्याची परवानगी आहे. आदिवासी लोक जे जंगलात किंवा जंगलांच्या आजूबाजूला राहतात त्यांना जंगलातील लाकडे व इतर छोटी उत्पादने गोळा करण्यासाठी परवानगी आहे. परंतु या वस्तू त्यांना फक्त स्वत:साठी वापरता येतात, भेट किंवा विकण्यासाठी नव्हे. त्यांना जंगलात त्यांची गुरे चारण्यासाठी शिकार करण्यासाठी, मच्छीमारी करण्यासाठी, प्राण्यांचे कातडे, हस्तिदंत जमा करण्याची पूर्णपणे मुभा आहे.

सरकारचे एक धोरण आहे की, जंगलांची व्यवस्था आदिवासी पंचायतीवर सोपवावी, कारण त्यामुळे त्यांच्यातील एकता वाढेल, व जर ते स्वत: व्यवस्था बघत असतील, तर निश्चितच ते त्याची अधिक काळजी घेतील. आणि यामुळे त्यांच्यातील मालकी हक्क व पैशाची भावना न वाढता,

त्यांच्यावरील जबाबदारीची त्यांना जाणीव होईल.

**शिकार व मच्छीमारी: -**

काही थोडे भाग वगळता, जंगलातील प्राण्यांचे जीवन फार धोक्याचे बनले आहे. पूर्ण भारतामध्ये आदिवासींसाठी शिकार व मच्छीमारी म्हणजे केवळ अन्नाचा शोध नसून, ही एक धार्मिक गोष्ट असून, त्यामध्येही बरेच कडक नियम आहेत. परंतु आपल्याला शिक्षणाद्वारे हे शक्य आहे की, त्यांच्यामध्ये हळूहळू प्राणीमात्रावर प्रेम करण्याची भावना जागृत करणे, व त्यामुळे जरी प्राणीहत्या केली तरी ती बऱ्याच चांगल्या प्रकाराने होईल व विष देऊन मच्छीमारी करण्याची प्रथा बंद होईल.

**दळणवळण: -**

जवळजवळ सर्व आदिवासी लोक दूर व अलग जागेत राहतात आणि त्यांच्यापर्यंत पोहचणे फारच अवघड पडते. नवीन रस्ते, पूल, मार्ग यांच्या साहाय्याने त्यांना बाहेर पडण्याची संधी मिळेल. पूर दुष्काळ व इतर आपतकालीन वेळेला त्यांना मदत लवकर मिळू शकेल. दळणवळणामुळे त्यांचा भाषेचा प्रश्नसुद्धा सुटू शकेल. पण काही ठिकाणी रस्ते म्हणजे शापच बनू लागली आहेत. कारण त्यांच्यामुळे आदिवासींमध्ये बरेच संसर्गजन्य रोग, सावकार व दारु विकणारी माणसे, वेश्याव्यवसाय , येऊ लागल्यामुळे त्यांच्या मनाचा व संस्कृतीचा तोल घसरु लागला आहे. हातमागावरचे कापड, कारखान्यातील स्वस्त कपडयांपुढे कमी पडू लागले आहे. आणि ते बऱ्याच कमी दर्ज्याच्या व अनुपयोगी वस्तू विकत घेवू लागले आहेत.

**आरोग्य: -**

आरोग्य सुधारण्यासाठी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे, 'पाणीपुरवठा'. कारण पाण्याचा तुटवडा म्हणजे अस्वच्छता, रोगराई व वेळेचा दुरुपयोग.

दवाखान्यातील डॉक्टर, की जे रोग बरा करण्यासाठी प्रयत्न करीत असतात, त्यांनी योग्य मार्ग अवलंबिला पाहिजे. त्यांनी स्वत:ला आदिवासी माणसातलाच एक समजले पाहिजे. जो डॉक्टर, तेथील भाषा शिकण्याचे कष्ट घेत नाही, त्याचा वेळ फक्त लोकांबद्दल तक्रारीत जातो, तो डॉक्टर अयशस्वी होतो. डॉक्टरांनी त्यांच्या रोग्यांवर प्रेम केले पाहिजे. डॉक्टरांच्या मनात त्यागाची भावना पाहिजे.

**कापड तयार करण्याचे स्वावलंबन: -**

उत्तरपूर्व सीमा एजन्सीमध्ये बऱ्याच आदिवासींमध्ये कापड विणण्याची कला आहे. पण बाजारातील कारखान्यातील कापडाच्या स्पर्धेपुढे ही कला नष्ट होत आहे. भारत सरकार ही कला पुढे येण्यासाठी खूप प्रयत्न करीत आहे. उत्तरपूर्व सीमा एजन्सी व्यवस्था, प्रत्येक घरात कमीतकमी एक माग असावा, व हातमागाचे उत्पादन वाढावे यासाठी खूप प्रयत्न करीत आहे.

**हस्तकला उद्योग: -**

उत्तरपूर्व सीमा एजन्सी हस्तकलांनापण उत्तेजन देत आहे. लाकडावरील कोरीवकाम, रंगकाम, सोनेरी, लोहारी, मातीची खेळणी यासारख्या कलांना उत्तेजन मिळाल्यामुळे लोकांना रोजगारीपण मिळेल.

**प्रगतीच्या दिशेने वाटचाल: -**

उत्तरपूर्व सीमा एजन्सीने तेथील आदिवासींच्या प्रगतीसाठी काही योजना आखल्या आहेत, पण त्या अंमलात आणल्या गेल्या नाहीत. लोकसंख्या कमी आहे व तेथील कामगार काही थोडयाच दिवसांसाठी उपलब्ध असतात आणि दुसऱ्या ठिकाणाहून कामगार आणणे योग्य नाही, कारण जर तेथील जागा दुसऱ्याच माणसांनी भरल्या तर,

आदिवासी माणसे जेव्हा शिकून त्या जागांसाठी पात्र होतील, तेव्हा त्यांना त्या मिळू शकणार नाही. उत्तरपूर्व सीमा एजन्सी हा प्रश्न, अधिकाऱ्यांना वेगवेगळ्या कामांचे प्रशिक्षण देवून; सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. आदिवासी भागात कोणत्याही प्रकारच्या योजना आखताना, भौतिक उद्देशांच्या फायद्याबरोबरच, मानसिक तोटयांचा समतोल राखला पाहिजे.

**कपडयांचा प्रश्न:**

माणसासाठी कपडे म्हणजे शरीर संरक्षणापेक्षा निश्चितच काहीतरी अधिक आहे. कपडे म्हणजे कलेचे एक रुपच आहे. जवळ जवळ आतापर्यंत, सर्व आदिवासींची स्वतंत्र व वेगळी पोशाख करण्याची पद्धत होती, काहींची अजूनही आहे. पण बाहेरच्या जगाच्या परिणामांमुळे ही कला व सौंदर्य नष्ट होत आहे आणि लोकांना जेव्हा माहित होते, की ते कपडे विकत आणू शकतात व हे कपडे घातल्यावर समाजात मानाचे स्थान मिळते, ते कापड विणणे सोडून देवू लागले आहेत आणि त्यामुळे त्यांचा पैसा बाहेर जावू लागला आहे. हे बाहेरचे कपडे आरोग्याच्या दृष्टीनेपण चांगले नाहीत, कारण आदिवासी जो हे कपडे घालतो, नेहमी कपडे बदलत नाही, कदाचित त्याच्याकडे दुसरे कपडे बदलण्यासाठी नसतात. आणि त्यामुळे बरेच त्वचेचे रोग फैलावत आहेत.

म्हणूनच जसजशी लोकांची प्रगती होत आहे, त्यांना आपण अशा प्रकारचा पोशाख तयार करायला लावला पाहिजे, की जो पूर्णपणे आदिवासी प्रकारचा, आकर्षक सुंदर व त्यांची कामे करण्यासाठी योग्य असा असेल.

**मानसिक उद्दिष्टे: -**

आदिवासींसाठी आपण नव्या प्रकारचे जग उपलब्ध करुन देतो उदा. नव्या कल्पना, नवीन स्वातंत्र्य, नवीन अन्न, मनोरंजनासाठी नवीन गोष्टी. पण आपण हे करीत असताना, त्याला स्वत:बद्दल व स्वत:च्या कामाबद्दल खालच्या दर्जाची भावना निर्माण होते आणि यामुळे त्यांचा आनंद नाहीसा होवून ती हळवी व चिडचिडी होवून जातात.

वस्तुसंग्रहालय चालकांनी या गोष्टीची दक्षता घेतली पाहिजे की त्यांच्या प्रदर्शनांमधून आदिवासींना त्यांचा अभिमान वाटला पाहिजे; लाज नव्हे. वस्तुसंग्रहालय चालकांनी, आदिवासींचे कपडे, दागिने, चेहरे याबद्दल अचूकता दाखविली पाहिजे. तसेच त्यांच्या संस्कृतीच्या व जीवनातील चांगल्या गोष्टी दाखविल्या पाहिजेत, नाहीतर वस्तुसंग्रहालयातील, कुरुप, काळे व अव्यवस्थित पोशाख असलेले आदिवासी पाहून त्यांना अधिकच वाईट वाटेल.

आदिवासींच्या मनातील त्यांच्याबद्दलची कमीपणाची भावना घालविण्यासाठी, त्यांनी स्वत:चा कारभार स्वत: पाहिला पाहिजे. त्यांनी स्वत:चे कायदेशास्त्र तयार करून, न्यायव्यवस्था संभाळायला हवी.

आदिवासीभागात सरकारी आधिकाऱ्यांची नेमणूक करताना हे बघितले पाहिजे की, तो नुसताच परीक्षा पास झालेला नसावा. तो उत्साही असावा, त्याचे मन व हृदय आदिवासींचे प्रश्न सोडविण्यासारखे हवे. आणि त्याने स्वत:ला आदिवासींच्या जीवनामध्ये सामावून घ्यायला हवे, परंतु हे वाटते तितके सोपे नाही.

**आदिवासींच्या अपराध व शिक्षेच्या कल्पना: -**

प्रत्येक आदिवासींमध्ये अपराध केल्याबद्दलच्या भावना वेगळ्या आहेत. त्यामुळे आपण आपल्या अपराध व शिक्षेच्या भावना त्यांच्यावर लादता कामा नये. उत्तरपूर्वसीमा एजन्सीमध्ये पूर्वी अपराधानंतर खूप कठीण शिक्षा देत असत. उदाहरणार्थ, कोणी ( मिथून ) बैल

चोरला, किंवा खून केला, तर दुसरी माणसे त्या कुळातील सगळी घरे जाळत, तिथली बायका माणसे पळवून नेत,मिथून पळवून नेत. पण आता व्यवस्थेने घडवून आणलेल्या मानसिक बदलामुळे शिक्षा कमी केलेली आहे.

जर एखादया आदिवासीमाणसाने खूप मोठया प्रकारचा गुन्हा केला असेल, तर त्याला तुरूंगात ठेवणे हे फार चुकीचे आहे: कारण ते स्वच्छंदी जीवन जगत असतात व त्यांच्या संस्कृतीने त्यांना 'तुरुंग' ह्या कल्पनेसाठी अजिबातच तयार केलेले नसते. याशिवाय अनोळखी प्रकारचे जेवण, अनोळखी माणसे व भाषा येत नसल्याने त्याला त्यांच्याशी बोलता पण येत नाही. आणि भोळा भाबडा आदिवासी माणूस इतर क्रूर कैदी व राजकीय कैदी यांच्या सहवासात राहून आधिकच दुष्ट बनतो.

यासाठीच उत्तरपूर्व सीमा एजन्सी वेगळ्या प्रकारचे तुरूंग बनवित आहे. 'सुधार केंद्र'. आणि ह्याचा निश्चितच उपयोग होईल, कारण ह्यामध्ये आदिवासी माणूस इतर आदिवासींच्या सहवासात असेल, तो दऱ्याखोऱ्यात व जंगलातच राहिल, ते सगळे मिळून मनोरंजनाचे कार्यक्रम करू शकतीच, स्वत:चे अन्न स्वत: करतील. त्यामुळे अपराधी परत जाताना त्याला परत एकदा मानसिक व सामाजिक स्वास्थ्य लाभेल व नव्याने जीवन सुरू करेल.

## शिक्षण: -

आदिवासींच्या शिक्षणामध्ये बऱ्याच गोष्टी सामावल्या गेल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांमध्ये भारत देशाबद्दलचे प्रेम जागृत केले गेले पाहिजे, त्यांना स्वच्छता, शेती, वन्यजीवन संरक्षण, न्याय, समता व माणूसकीचे धडे दिले गेले पाहिजेत. शिक्षण दोन प्रकारच्या उद्देशाने दिले गेले पाहिजे. १) आपण त्यांच्यातील निवडक हुशार मुले व मुली शोधून त्यांना शक्य तितके उच्च शिक्षण देवून, त्यांना स्वत:चा कारभार स्वत: करण्यासाठी पात्र केले पाहिजे. पण हे फक्त थोडयाच लोकांसाठी. सर्वसाधारण लोकांना प्राथमिक शिक्षण देणे महत्वाचे आहे. पण ह्या दोन्हीही गोष्टींमध्ये आदिवासी विलीनीकरणाची समस्या फार मोठी आहे.

आदिवासींना शिक्षण त्यांच्या मातृभाषेतच दिले गेले पाहिजे. सध्याच्या शाळेत शिकविला जात असलेला शहरी पाठचक्रम बदलून, त्यांच्या संस्कृतीशी, अर्थव्यवस्थेशी, निसर्गाशी निगडीत असलेला पाठचक्रम सुरू केले पाहिजे. खरे पाहता शिक्षण व्यवस्था आदिवासींनी स्वत:च बघितली पाहिजे. म्हणजे त्यांना ती स्वत:ची संस्था वाटायला लागेल. सरकारने हे त्यांच्यावर लादले आहे ही भावना नाहीशी होईल. शाळा त्यांच्या सध्याच्या संस्थामध्येच उदा. मुला, मुलींची शयनगृहे की जी सियाँग, गोम्पांस ह्या बुध्द आदिवासींमध्ये आहेत, या ठिकाणी भरविल्या गेल्या पाहिजेत.

मुला मुलींना शाळेत येताना कोणत्याही प्रकारची वस्त्रे घालण्यासाठी परवानगी दिली पाहिजे. आणि उलट त्यांना कलात्मक रितीने सांगायला हवे की, त्यांचा पारंपारिक पोशाखच आधिक चांगला आहे.

शाळेतील क्रमिक पाठचपुस्तकात साधारणत: तंबाखू, दारू, विडया ओढणे हे पाप आहे असे लिहिलेले असते व आदिवासी मुले त्यांचे आई-वडिल, समाजातील प्रतिष्ठित माणसे तर रोजच हे घेताने बघत असतात, त्यामुळे त्यांच्या मनात गोंधळ निर्माण होतो. तांदूळापासून केलेली दारू ही तर पूर्ण उत्तरपूर्व सीमा एजन्सीमध्ये धार्मिक कृत्य समजले जाते, त्यामुळे त्यांना शंका येऊन उगाचच अपराधाची भावना निर्माण होते. परंतु शिक्षण हे कोणत्याही परिस्थितीत, दोन पिढ्यांमध्ये गोंधळ निर्माण करणारेच आहे.

आदिवासी विलीनीकरणाचा प्रश्न

सोडल्यास, आदिवासी मुले शिक्षणामुळे बऱ्याच गोष्टी शिकतील. उदा. समता, प्राणीमात्रांवर दया, कोणत्याही प्रकारची गुलामगिरी ती सहन करणार नाहीत. त्यांची संस्कृती जर त्यांच्या प्रगतीच्या मार्गात आड येत असेल तर ती ते बदलतील. त्यासाठी त्यांना त्यांच्या समाजातील मोठ्या लोकांशी भांडावेही लागेल. व जर मोठी माणसे समजावून घेणारी असतील तर जुनी व नवी पिढी आनंदाने जीवन जगू शकतील. आणि ते त्यांची संस्कृती मोडणार नाहीत, तर त्यांच्या जीवनाचा उगम त्यांच्या संस्कृतीतून होईल.

आदिवासींच्या मनातील कमीपणाची भावना जाण्यासाठी एकमेव उपाय म्हणजे, आदिवासींना प्रशिक्षण देवून, जी कामे आपण त्यांच्यासाठी करीत आहोत, ती त्यांना स्वत:ला करावयाला लावायची. व एकदा त्यांना कळले की भविष्य त्यांचे आहे, तर ते हे काम निश्चितच चांगल्या रितीने वर माना करून करू शकतील.

**धार्मिक उद्‌देश: -**

सध्या आदिवासींसाठी बऱ्याच योजना राबविल्या जात आहेत त्यामुळे ते वेगवेगळ्या माणसांच्या उदा. शिक्षण, ख्रिश्चन, पाद्री, सरकारी आधिकारी यांच्या सान्निध्यात येत आहेत, त्यामुळे उद्या ते कोणता धर्म स्वीकारतील हे काहीच सांगता येत नाही.

सर्वसाधारण आदिवासींच्या धर्मामध्ये पाच तत्वे सामाविली आहेत.

१) ते एक सर्वोच्च देव मानतात. व तो परोपकारी दयाळू आहे. उदा. दोयनी पोल्लो, सूर्य चंद्र देव हा ' आदि ' लोकांचा देव आहे.

२) ते मृतात्म्याचा रोजच्या जीवनाशी संबंध लावतात.

३) आदिवासींचे जीवन त्यांच्या दंतकथेवर अवलंबून असते.

४) आदिवासींचा धर्म समाजातील नीतीमूल्यांशी निगडीत आहे, व त्यामुळेच त्यांच्यातील शिस्त अजूनही टिकून राहिली आहे. व त्यांच्या वागण्यात औदार्य आले आहे.

५) आदिवासींचा धर्म त्यांना जीवनातील शाश्वत सत्याशी सामोरे जाण्याचे ध्येय देतो.

धर्मामुळे आदिवासी लोकांना मनाची शांती मिळाली आहे, पण ह्या धर्मावरील अतिविश्वासामुळे काही वाईट चालीरीती सुध्दा इथे जोपासल्या जातात. उदा. नरबली.

जर आपल्याला असे वाटत असेल की, आदिवासींनी त्यांचा धर्म हिंदू किंवा ख्रिश्चन न बदलता, स्वत:चाच धर्म कायम टिकवावा व फक्त त्यातील वाईट चालीरिती सोडून द्याव्यात. त्यासाठी आपण त्यांच्या अवती भोवतीच्या गोष्टी अशा रितीने बदलाव्यात, की त्यामध्ये जुन्या धर्माचे पोषण होईल व त्याच्यामध्ये सुधारणा होतील. व हे जर आपल्याला बघायचे असेल तर प्रत्येक सरकारी अधिकाऱ्याने आणि समाज सुधारकाने खालील गोष्टी ध्यानात ठेवाव्यात.

१) त्यांनी ज्या आदिवासी भागात ते राहतात तेथील धर्माचा अभ्यास करून तो समजावून घ्यावा.

२) त्यांनी आदिवासींच्या धर्माकडे मानाने बघावे. त्यांनी आदिवासींच्या कोणत्याही धार्मिक कृत्याला किंवा श्रध्देला नावे ठेवू नयेत अगर हसू नये.

३) त्यांनी आदिवासींशी बोलताना, ते कोणते शब्द वापरीत आहेत याची काळजी घ्यावी. उदा. अंधश्रध्दा, भूताटकी नाच वगैरे.

४) आपण जेव्हा त्यांच्याकडून काही शपथा प्रार्थना वगैरे म्हणवून घेत असतो, तेंव्हा त्यांच्या देवांचा उल्लेख करावा. म्हणजे त्यांना त्यामध्ये आपलेपणा वाटेल.

**सामाजिक उद्‌देश: -**

आपल्यापासून खूपच वेगळ्या असलेल्या आदिवासींच्या जीवनामध्ये व संस्थांमध्ये ढवळाढवळ करणे हे निश्चितच धोक्याचे आहे; कारण हे करत असताना अजाणतेपणे आपण त्यांच्यासाठी काहीतरी चांगले करण्याऐवजी वाईटच करू.

**कायदा व न्याय:-**

शेकडो वर्षांपासून आदीवासींमध्ये दोन गावात किंवा दोन आदिवासी जमातींमध्ये युद्धे होत आहेत आणि बऱ्याचदा त्यांच्यावर संकटे व काळजीचे प्रसंग आले आहेत. परंतु आता लोकांनी मान्य केलेले आहे की, नरबळी कायद्याच्या विरुद्ध आहे. आणि आता दोन गावांमधील युद्धाचे दिवस संपले आहेत. जरी मैत्री व शांतता हे जरा कंटाळवाणे असले तरी ते मोठे व टिकावू फायदे देतात.

उत्तर पूर्व सीमा एजन्सी, लोकांमधील आर्थिक पिळवणुकीची भीती घालवित आहे. त्याच्या जमिनीला संरक्षण दिले आहे, वस्तूंच्या किंमतीवर नियंत्रण ठेवले आहे. सावकारी, दुकानदारी यांच्यावर पण नियंत्रण ठेवले आहे.

**गुलामगिरी:-**

गुलामगिरी ही पिढ्यां-पिढ्यांपासून चालत आलेली आहे. आणि ती आता पूर्णपणे गेली पाहिजे. परंतु ती जातही आहे. गुलाम ही कोणातरी व्यक्तीच्या पूर्णपणे मालकीची मालमत्ता समजली जाई. लोक बऱ्याच कारणांसाठी गुलाम बनले गेले. उदा. त्यांना युद्धामध्ये पकडले गेले, त्यांना विकत घेतले गेले, काही लोक जन्मत:च गुलाम होते.

पण आता गुलाम पैसे देवून स्वत:ला मुक्त करु लागले आहे आणि भारत सरकारने बरीच मोठी रक्कम गुलामांना सोडविण्यासाठी मंजूर केली आहे.

**अफू:-**

उत्तरपूर्व एजन्सीमधल्या बऱ्याच आदिवासी लोकांमध्ये अफू घेण्याची प्रथा आहे. म्हणून सरकारने निश्चितच या प्रश्नामध्ये भाग घ्यायला हवा. अफूमुळे जवळ जवळ सर्वच गोष्टींचे नुकसान होते. कोणतीच कला फुलू शकत नाही. कोणत्याही प्रकारची शिस्त अवलंबिली जात नाही प्रगतीसाठी केलेल्या कोणत्याच योजना यशस्वी होत नाहीत.

म्हणूनच अफूचे पीक घेणे हळूहळू कमी केले पाहिजे. आणि जिथे अफूची प्रथा प्रचलित नाही, त्या भागात ती सुरु करायला नको. त्याऐवजी नवीन आवडी उत्पन्न करायला हव्यात, म्हणजे लोक कामात व आनंदी राहतील.

**दारू:-**

जवळ जवळ सर्वच आदिवासींमध्ये दारू घेण्याची प्रथा आहे. उत्तर पूर्व सीमा एजन्सीमध्ये तांदळाची दारु तयार करतात आणि या दारुला परंपरेपासून खूपच महत्व देतात उदा. लग्नात वराकडून दिल्या जाणाऱ्या, वधूच्या किमंतीत, भेटवस्तू म्हणून जवळजवळ सगळ्याच धार्मिक कृत्यांमध्ये ही भाताची दारु लग्नाच्या प्रसंगी, काही इतर आनंदाच्या प्रसंगी, दहनाच्या प्रसंगी खूपच प्यायली जाते.

भारत सरकार ही दारुची प्रथा जाण्यासाठी दुसरे काहीतरी अपाय नसलेले पेय लोकांना देत आहे. उत्तर सीमा एजन्सीमध्ये ते लोकांमध्ये चहाची रुची पैदा करीत आहेत, त्यामुळे दारु घेण्याचे प्रमाण कमी होईल.

**मृतदेहाचा विनियोग:**

बऱ्याच आदिवासींमध्ये मृतदेह तसेच उघड्यावर ठेवून त्याचा विनियोग करतात. परंतु सध्या शिक्षणाच्या परिणामांमुळे त्यांनी प्रेतांचे दहन

सुरु केले आहे; परंतु हे त्यांनी त्यांच्या मनापासुन करणे जास्त महत्वाचे आहे.

**काहीही नवीन नियम नकोत :-**

आपण आदिवासींच्या सामाजिक जीवन व रुढी यांच्यामध्ये ढवळाढवळ करायला नको, जोपर्यंत ते काही कायदे तोडत नाहीत किंवा माणुसकीच्या विरुद्ध वागतात तोपर्यंत. परंतु त्याचबरोबर आपण आपल्या समाजातल्या काहीही वाईट प्रथा, कल्पना त्यांच्यामध्ये आणायला नको आहेत.

**सांस्कृतिक उद्देश :-**

आदिवासींची प्रगती झाली पाहिजे, पण त्यांनी त्यांची कला व संस्कृती सोडायला नको. सगळ्या जगामध्ये आधुनिक पाश्चिमात्य संस्कृतीमुळे कलात्मक निर्मितीमध्ये फारच फरक पडला, व त्याच्याऐवजी त्यांना फारच थोडे मिळाले आहे. भारतातील आदिवासांमध्ये बऱ्याच कला टिकून आहेत. परंतु फारच कमी लोक विणकाम करतात. परंतु उत्तरपूर्व सीमा एजन्सीमध्ये हातमागावर कापड विणणे ही सर्वात महत्वाची कला आहे. त्यांच्यामध्ये संगीत, नृत्य, लाकडावरील कोरीवकाम, अलंकार तयार करणे ह्याही कला आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये कलेसाठी रस निर्माण करणे, हा शाळांमधून, कॉलेजांमधून दुर्लक्षित झालेला विषय आहे. वस्तूसंग्रहालयांद्वारे लोकांमध्ये त्यांच्या कलानिर्मितीबद्दल अभिमान निर्माण करणे शक्य आहे. कारण इतर प्रवासी, त्यांनी केलेल्या वस्तूंची स्तुती करताना बघतील. पोष्टाच्या तिकिटावर, जर त्यांची चित्रे असतील, तरीसुद्धा त्यांना आनंद मिळेल.

आदिवासींची कलेची रूची टिकवायची असेल तर, दुकानांवर नियंत्रण ठेवणे फार महत्वाचे आहे. पूर्वी पावडर, लाली, उपयोग नसलेली भांडी यासारख्या बऱ्याच गोष्टी मारवाडी लोकांनी या भागात विकणे सुरू केले होते. आणि ज्यामुळे उगाचच त्यांचा पैसा वाया गेला व त्यांच्या कलेवर परिणाम झाला.

**करमणुकीचे पुनरूज्जीवन :-**

आपण सध्या शहरांमध्ये कलात्मक जीवनापासून बरेच दूर गेलेलो आहोत, पण अजूनही खेडे गावांमध्ये, लोकसंगीत व लोकनृत्ये टिकून आहेत. आदिवासींमध्ये असलेली, स्वत:बद्दलची कमीपणाची भावना व आदिवासी विलिनीकरण टाळण्यासाठी लोकनृत्य, संगीत व खेळ ह्यांचे पुनरूज्जीवन होणे जरूरीचे आहे.

आदिवासी लोक दोन प्रकारची नृत्ये करतात १) धार्मिक किंवा प्रासंगिक नृत्य; कि जी कोणत्याही प्रसंगी करता येत नाहीत, फक्त काही ठराविकच प्रसंगी करता येतात उदा. उत्सव, लग्न, दहन. २) दुसरा नृत्यप्रकार म्हणजे करमणुकीसाठी नृत्य जे कोणत्याही प्रसंगी करता येते.

यासाठी शाळांमधून लोकनृत्य, पोशाख, दागिने, गाणे यांच्या स्पर्धा ठेवाव्यात.

याक्षणी पारंपरिक नृत्याचे पुनरूज्जीवन, ज्याठिकाणी ही कला नाही, किंवा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे; त्याठिकाणी होणे आवश्यक आहे.

आदिवासी लोकांत बरेच खेळ, प्राणी, पक्षी, मुंग्या, मधमाश्या, कोल्हे, कोंबड्या व वाघ यांच्याशी निगडीत आहे. काही खेळ मजेदार आहेत. या खेळांचे शाळांमधून पुनरूज्जीवन होणे जरूरीचे आहे. कारण त्यामुळे शाळांमधून आदिवासी मुले त्यांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणातून त्यांच्या रोजच्या जीवनाशी अधिक जवळ येतील. हे खेळ बऱ्याचदा, तिथे सहज मिळणाऱ्या गोष्टींच्या साहाय्यानेच खेळले जातात. त्याच्यासाठी काहीही महागडी सामुग्री लागत नाही.

**संशोधनाचे महत्त्व :-**

डॉ. वेरियर एल्विन यांच्यामते, जर आपल्याला आदिवासी संस्कृतीचे पुनरूज्जीवन घडवून आणायचे असेल, तर आपण प्रगती शास्त्रीय मार्गावरून घडवून आणली पाहीजे. लोकांच्या भावनांचा विचार घेऊन चालणार नाही, त्यासाठी आदिवासी लोकांना समजावून घ्यायला हवे. त्यांचे मानसशास्त्र, पद्धती, रूढी, विश्वास यांचा अभ्यास करणे जरूरीचे आहे. यासाठीच उत्तरपूर्व सीमा एजन्सी, विविध विषयातील संशोधनाला फार महत्व देत आहे. उदा. वैद्यकीय मानवशास्त्र क्षेत्र निरीक्षणाचा अभ्यास करत आहे. पासिघाट येथे विषाणू प्रयोगशाळेत, त्वचारोग, घटसर्प, क्षय, महारोग यासारख्या प्रश्नांवर अभ्यास चालू आहे. आधुनिक शेतीविषयक संशोधन चालू आहे. झूम प्रकारची शेती करण्याच्या नव्या पद्धती शोधून काढल्या जात आहेत. नवीन प्रकारची बियाणे, रोखीची पिके यावर प्रयोग केले जात आहेत. सांखिकीशास्त्र भारत सरकारला त्यांच्या योजनांसाठी बरीच मदत करीत आहे.

मानवशास्त्राचा उपयोग बऱ्याच प्रत्यक्ष प्रश्नांसाठी उपाय शोधून काढण्यासाठी होईल कारण मानवशास्त्र, लोकांच्या आवडी, भावना, विश्वास, संस्कृती या सर्वांचा अभ्यास करते, त्यामुळे सरकारच्या होणाऱ्या चुका टाळण्यासाठी या अभ्यासाचा उपयोग होईल. संशोधकाने अभ्यास करीत असताना शास्त्रीय दृष्टीने लोकांशी बोलले पाहिजे, स्वत:ला त्यांच्यात सामावून घेतले पाहिजे, मानवशास्त्रज्ञ जो आदिवासीमाणसाकडे कमी दर्जाने जंगली म्हणून पाहतो, त्याला कधीच काहीही माहीती मिळणार नाही. त्यांनी लोकांशी संबंध ठेवताना हे लक्षात ठेवले पाहिजे, की त्यांना शिकविण्यापेक्षा त्याला त्यांच्याकडून शिकायचे आहे. आदिवासी भागातील उत्तम आधिकारी असा असेल की, जो त्यांच्याकडे माणुसकीच्या, मानाच्या व प्रेमाच्या भावनेने बघतो. व हे करीत असताना त्याचा उद्देश फक्त राजकीय योजना साकार करण्याचा नसावा, तर हे त्याच्या मनापासून करतो.

सांस्कृतिक मानवशास्त्र आदिवासींविषयक बऱ्याच विषयांवर अभ्यास करीत आहे. उदा. धर्म. धर्माच्या अभ्यासामुळे तत्वज्ञानाच्या ज्ञानामध्ये बरीच भर पडते, त्यामुळे त्यांच्या बऱ्याच वेगवेगळ्या विषयातील सहकारी आधिकाऱ्यांमध्ये आदिवासींच्या भावना, विश्वास यांच्याबद्दलच्या कल्पनांना सन्मान प्राप्त होतो.

आदिवासींच्या भौतिक संस्कृतीच्या अभ्यासाचा उपयोग त्यांच्या हस्तव्यवसायातील प्रगतीसाठी होईल. त्यांच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास चालू आहे, त्यांच्या भेटवस्तू, संपत्तीबद्दलच्या कल्पना, या फार महत्वाच्या गोष्टी आहेत.

समाजशास्त्रावरील संशोधनाचा उपयोग शिक्षणक्षेत्रात फारच महत्वाचा आहे.

आपण सुरू केलेल्या शिक्षणामुळे आदिवासींच्या जीवनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे जरूरीचे आहे, व त्यावरून शिक्षण पध्दतीत अधिक सुधारणा करता येतील. अभ्याससुध्दा जरूरीचा आहे, कारण त्या पध्दतीवर जर आपण आपल्या शाळा सुरू केल्या, तर शिक्षण हे आदिवासी मुलांच्या नैसर्गिक जीवनातील भाग होईल, ते त्यांच्यावर काहीतरी लादले गेले आहे असे होणार नाही.

# मौखिक संपदा

## श्री.बी.एम.पवार

( आदिवासींच्या पारंपरिक व दैनंदिन जीवनातील विविध वाङमयीन प्रकारांची माहिती विस्मृत होवू नये म्हणून ती छापील स्वरूपात उपलब्ध व्हावी अशा हाकारा ह्या अंकाच्या प्रयत्नास प्रतिसाद म्हणून श्री.पवार बी.एम. ह्यांनी संकलीत केलेली राजूर भागातील काही गीते ह्या अंकात प्रसिध्द करीत आहोत. ह्या गीतांचा मराठी अर्थ श्री.पवार बी.एम. यांनीच लिहिला आहे. )

॥ १ ॥

माणसा खेळ तुझा लटका ॥ धृ ॥
शत वर्षाचे आयुष्य तुला ते भगवंताने दिधले होते
बालपणामध्ये घालविले ते होईल कशी सुटका ॥ १ ॥
कलीयुगाचा दोष नव्हे तो आजोबा वागले म्हणोनी नातू

अंधश्रध्देला कवळून धरतो माठ जणू फुटका ॥ २ ॥
निती धर्माला सोडून पळती, पळता त्यांना मिळे प्रगती
सुखी समाधानी असता काळ देई फटका ॥ ३ ॥
म्हणे सखाराम स्वार्थासाठी शहाणे वेडया पाठ थापटी
कोटी जीवांची हीच उदाहरणे जीवन हा मटका ॥४॥

ह्या गीतातून मानवी जीवनाचे चक्र कसे फिरते आहे. जन्मापासून मृत्युपर्यंत मानवी जीवन हे स्वार्थाने भरलेले आहे. स्वार्थ हा जीवनाचा केंद्रबिंदू असून जीवनाच्या अंतापर्यंत सर्व ठिकाणी स्वार्थच पाहिला जातो. आजही विज्ञान नवनवीन शोध लावत आहे, संशोधन करीत आहे तरीदेखील अंधश्रध्देचे प्रमाण मात्र कमी झालेले नाही. ह्यातून मानवाचे नवीन जगातील आचार-विचारांचे प्रदर्शन देखील घडते. नीती धर्म या विषयी त्याचे विचार आपणांस स्पष्ट दिसतात.

॥ २ ॥

घनश्याम नयनी आला सखे ग काजळ घालू कशाला ॥धृ॥
सौंदर्य हे ईश्वरी देणे। लेण्याचे का लावावे उटणे
नको नको त्या माळा सखे ग ॥१॥
हृदयी अडवी भगवंताते, धर्मा पतिचे सांभाळी नाते
कपाळी कुंकवाळा ॥२॥
खुळी असेल ती कवि कल्पना
निवडील अर्थ असा शहाणा। हरिदास तोही झाला सखे ग ॥ ३ ॥

वरील गीतातून बाह्य सौंदर्यापेक्षा मुळातील सौंदर्य हे जास्त महत्वाचे आहे त्याचप्रमाणे प्रत्येक स्त्रीचा

खरा धर्म म्हणजे आपल्या पतिची सेवा करणे होय. पातिव्रत्य हे खूप मोठे पुण्य आहे. त्याचे जतन केले पाहिजे.

भारताचा प्रकाश कमी झाला ( पोवाडा )
भारताचा प्रकाश कमी झाला। एक देश पुढारी गेला
यमुनेच्या हिंदी घाटाला वैऱ्यांनी
डाव साधीला, गोळी घातली गांधीजींना
एक देश पुढारी कमी झाला ॥ १ ॥
महा वीर, वीर वीर हा
चंदनाचे सरण रचिले
त्यावरती बाबू निजविले
पाणी आले नेहरूजींच्या नेत्रा
एक देश पुढारी गेला। भारताचा प्रकाश कमी झाला

ह्या गीतातून आदिवासी बांधवांच्या आपल्या देशातील राजकीय पुढाऱ्यांबद्दच्या विशिष्ट भावना स्पष्ट होतात. एक पुढारी गेला म्हणजे जितका प्रकाश, त्यांची बुध्दी, विचार ह्यांची उणीव भासणार ही काळजी निर्माण झाली.

॥ ३ ॥
( हरिची गौळण )
आज सखे ए बाई जरा करा घाई दूध ताक दही डेरे भरा भरा ग ॥ धृ ॥
अरूणोदय झाला उठा लवकरी
आज निघाल्या नव्या सुंदरी
हसू येई काठाचे, म्हातारीच्या माठाचे, भूषण बाई
वाटायेईच्या मागे चला ॥ १ ॥
जावा नंदाचा त्रास भारी
दिर धाकटा अविचारी
सोसू किती अत्याचे
वेगळे मन पतिचे, कारण हे भितीचे
मला साह्य करा ग ॥ २ ॥
नंदाच्या हरिच्या करिता चेष्टा
चिडून बाई आडवितो वाटा
आज मुकाट्याने चला ग नव्या फाट्याने
बोलू नका ग शांती जरा धरा ग ॥ ३ ॥
हरिचंद्राच्या प्रसादे कृष्ण गौळणी
सावळे कविला संगे घेवूनी
तृप्त करू भक्तीने कोणत्या रितीने
मोहू चला मोहू चला प्रितीने

ब्रम्हांड भरू किर्तीने नजरा धरि धरा ॥४॥

वरील गौळणीतून पूर्वीच्या काळातील गणगौळणीची ओळख होते. ह्या परिसरात प्रसिध्द असलेले हरिश्चंद्र गडावरील ती शंकराची भव्य मूर्ति जणू काही ह्या परिसरातील लोकांनी नवे स्फूर्तिस्थानच मानले आहे. नित्याच्या जीवनात ती स्त्री पतिप्रमाणेच आपल्या घरातील इतरांची देखील भीती बाळगते तरी तिची परमेश्वर भक्ती कमी झालेली नाही. आजही परमेश्वराची निष्ठा ह्या ग्रामीण भागातून दिसते आहे.

॥४॥

सुंदर ते ध्यान जाई शेतावरी
औत खांदयांवरी घेवोनिया
मकर कुंडले त्याला घातलिया धारा
थंडीचा उबारा धोगडींचा ॥ १ ॥
तुळशीहार गळा नाही कमरेला विळा
माथेवर टिळा चिखलाचा
झोपडीत भूके राही रखुमाई
कष्टणारी आई अन्नाविना ॥ २ ॥

वरील ओवीतून शेतकऱ्यांचे जीवन कसे असते. त्याला देवाकडे बघण्यासाठी अजिबातही वेळ मिळत नाही. तरी तो कष्टातच देवाचे नामस्मरण करतो.

## पुस्तक परिचय

# आदिवासी जीवनाचे वेधक दर्शन

### ग.शां.पंडित.

डॉ. सौ. शैलजा देवगांवकर या एक क्रियाशील संशोधक आहेत. आदिवासींमध्ये मिसळून त्यांच्या जीवनपध्दतींचा व सांस्कृतिक वैशिष्टयांचा त्यांनी अभ्यास केलेला आहे. त्याचेच फलित म्हणजे हे 'वैदर्भीय आदिवासी: जीवन आणि संस्कृती' पुस्तक होय. विदर्भातील विविध आदिवासी जमातींची माहिती संग्रहित करून पुस्तकरूपाने त्यांनी प्रसिध्द केली आहे. या पुस्तकात संग्रहित झालेले लेख हे स्फूट स्वरूपाचे असून विविध नियतकालिके व वृत्तपत्रांतून ते प्रसिध्द झालेले आहे. हे स्फूट लेख व विद्यापीठस्तरीय चर्चासत्रातील शोधनिबंध यांची एकत्रित माहिती या लेखसंग्रहात आलेली आहे. १६६ पृष्ठांचे हे छोटखानी पुस्तक वाचकांना थोडक्यात; परंतु उपयुक्त माहिती देणारे आहे.

**विविध जमाती**

लेखिकेने प्रस्तुत पुस्तकात विदर्भातील आदिवासी जमातींविषयी विशेषत्वाने लिहिले असले तरी मध्यप्रदेशातील पहाडी कोरवा या जमातीचाही यात अंतर्भाव केला आहे. कारण लेखिकेच्या मते वांशिकदृष्टया 'मुंडा' या आदिम समूहांपैकीच कोरकू आणि कोरवा या दोन जमाती असल्यामुळे भाषिक आणि सांस्कृतिकदृष्टया वैदर्भीय कोरकूंच्या नात्यातील मानली जाते. पुस्तकातील पहिली सहा प्रकरणे माडिया गोंड जमातीविषयी माहिती देण्यात खर्च झालेली आहेत आणि याच जमातीविषयी लेखिकेने थोडया अधिकांशाने लिहिले आहे. माडिया गोंड म्हणजे कोण, त्यांचे शिकारी जीवन, त्यांची लोकनृत्यगीते, विवाहगीते, कला व देवदेवता तसेच माडिया स्त्रियांची जीवनपध्दती व वैशिष्टे यांचा अंतर्भाव या सहा प्रकरणांमध्ये करण्यात आला आहे. माडिया स्त्रियांच्या जीवनपध्दतीविषयी वाचताना एक विशेष जाणवतो की, फार प्राचीन काळापासून स्त्रियांचे स्थान दुय्यम मानले गेलेले आहे. सतत अनेक बंधनांच्या दडपणाखाली तिला राहावे लागले आहे; अगदी आजपर्यंत त्यात फारसा फरक पडलेला नाही. परंतु माडिया स्त्रीच्या बाबतीत तिला या समाजात महत्त्वाचे स्थान दिलेले दिसते. विवाहपूर्व काळातले स्वातंत्र्य, आपला साथीदार स्वत:च निवडणे किंवा न पटल्यास घटस्फोट घेणे, हुंडयाऐवजी वरालाच वधूचे मूल्य मोजावे लागणे या गोष्टी आजच्या आधुनिक, प्रगत समाजाचा विचार करता वैशिष्टयपूर्ण ठरतात. आणि विशेष म्हणजे पुरूषप्रधान संस्कृतीतले तिचे हे स्थान आहे.

परधान या जमातीविषयी लिहिताना लेखिकेने 'परधान' नावाची व्युत्पत्ती, त्यांचे प्रकार (उपजमाती), व त्यांच्या जीवनातील श्रध्दा व परंपरांचे महत्त्व याचे विवेचक व थोडक्यात वर्णन केले आहे. परधानांमध्ये म्हटली जाणारी विवाहगीते व सणांची गाणी कशी मजेशीर व त्यांच्या जीवनाची व संस्कृतीची माहिती देणारी आहेत. ही गीते वाङ्मयीनदृष्टयाही श्रेष्ठ दर्जाची मानावी लागतील असे लेखिकेचे म्हणणे आहे. आणि खरोखरच लोकसाहित्याच्या अभ्यासकांना ही गीते मौलिक वाटण्याजोगीच आहेत. कोरकू जमातीविषयी लिहितानाही लेखिकेने कोरकू व त्यांची लोकगीते आणि त्यातून प्रतीत होणारे लोकजीवन याचे शब्दचित्र रेखाटले आहे.

पहिल्या तीन जमाती या विदर्भातील आहेत. यानंतरचे विवेचन आले आहे ते गिरीकंदरात म्हणजेच मध्यप्रदेश, प. बंगाल व बिहार या पहाडी मुलखात राहणाऱ्या 'पहाडी कोरवा' या जमातीविषयी. या दोन प्रकरणांमध्ये लेखिकेने पहाडी कोरवांच्या वास्तव्याविषयी व आहार, राहणीमान, भाषा, विवाहविधी, धार्मिकविधी, त्याचप्रमाणे त्यांची लोकगीते यांची मुद्देसूद परंतु उपयुक्त माहिती दिली आहे.

गोंड गोवारी आणि माना या आदिवासी जमातींबद्दल लेखिकेने शास्त्रीय विवेचनाच्यादृष्टीकोनातून लेख लिहिला आहे. भारतातील आदिवासी लोकांच्या एकंदर शरीररचनेविषयी सांगताना हे लोक ठेंगणे, काळे, नाक नकटे व रूंद, भुवयांची खालची हाडे बरीच वरती आलेली, डोळे खोल गेलेले, अंगकाठी बारीक अशा स्वरूपाचे सर्वसाधारणपणे आढळतात, असे लेखिका म्हणते आणि हे सांगताना गोवारींची मानवशास्त्रदृष्ट्या मापे सुध्दा दिलेली आहेत. गोवारींच्या सांस्कृतिक वाटचाली विषयी लिहिताना लेखिकेने त्यांचा व्यवसाय, उत्सव व सण, जातपंचायत, विवाह, मृत्यू या विधींमधले वैशिष्टच इत्यादीविषयीची माहिती दिली आहे.

हलबा आणि हलबा कोष्टी या शेवटच्या दोन जमातींविषयी लिहिताना त्यांच्या उत्पत्तीकथा, पोटभेट आणि सांस्कृतिक वैशिष्टचे यात विवाह, अत्यसंस्कार, यांची माहिती, त्याचप्रमाणे कोष्टी व हलबा कोष्टी यांच्यातील फरक याविषयीचे विवेचन आले आहे.

**सर्वसाधारण आदिवासी:**

सुरुवातीची १६ प्रकरणे वरील विविध जमातींविषयी माहिती देण्यासाठी लेखिकेने लिहिंलेली असून नंतरची १७ ते ३० ही प्रकरणे सर्वसाधारण आदिवासी जीवनाविषयी व त्यांच्या सांस्कृतिक वैशिष्टचांची माहिती पुरविण्यात खर्चिलेली आहेत. यात प्रामुख्याने आदिवासींच्या मानवनिर्मितीसंबंधीच्या लोककथा, आदिवासींची युवागृहे, आदिवासी स्त्रियांची आभूषणे, त्यांच्यातील विवाहाचे प्रचलित प्रकार, विवाहविधी, नृत्ये व वाद्ये, धार्मिक विधी, अन्त्यसंस्कार, भगत व पूजा प्रकार, जादूविद्या, बंजारा, वेठबिगार, आणि शेवटी आदिवासींचा विकास व त्यांच्यापुढे असणारी नवी आव्हाने इत्यादी विविध विषयांचा अंतर्भाव केला आहे.

लेखिकेने या छोटयाशा पुस्तकात त्यामानाने बऱ्याच विषयांचा उहापोह केलेला आहे. भाषा ओघवती व सोपी असल्यामुळे व विवेचन मुद्देसूद व थोडक्यात केलेले असल्यामुळे पुस्तक वाचण्यासही मनोरंजक झाले आहे. जरी हा लेखसंग्रह असला तरी त्यात विषयानुरूप तोच तो पणा किंवा तुटकता जाणवत नाही. लेखिकेने पुस्तकाला 'वैदर्भीय आदिवासी' हे नाव दिले असले तरी एकंदर सर्वच आदिवासी जमातीबद्दलची माहिती थोडक्यात दिलेली आहे. त्यामुळे प्रा. रा. के. मुटाटकरांनी पुरस्कारात म्हटल्याप्रमाणे विदर्भातील आदिवासी समाज व संस्कृती याबद्दल या पुस्तकाने मोलाची भर पडणार आहे. ब्रिटीश विद्वानांचे लेखन इंग्रजीत असल्याने ते सामान्य जनतेपर्यंत पोहोचू शकत नाही; परंतु या पुस्तकाने ती अडचण दूर केली आहे.

समाजशास्त्र व मानवशास्त्र या विषयांच्याच नव्हे तर आदिवासी जीवनाविषयी आपुलकी व कुतुहल असणाऱ्या व त्यांच्यात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना व अभ्यासकांनाही हे पुस्तक मार्गदर्शक ठरणारे आहे, यात शंकाच नाही.

वैदर्भीय आदिवासी: जीवन आणि संस्कृती
डॉ. सौ. शैलजा देवगावकर.
मंगेश प्रकाशन, २३ नवी रामदास पेठ,
नागपूर- ४४००१०. - आवृत्ती पहिली १९८९
किंमत - रू. ३०. पृष्ठसंख्या १६६.

# ,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाची वैद्यक, आरोग्य व शरीरविज्ञानावरील प्रकाशने

| अ.क्र | प्रकाशनाचे नाव | लेखक/अनुवादक | किंमत रूपये |
|---|---|---|---|
| १) | होमिओपाथिक औषधांचा निघंटु | डॉ.शं.र.फाटक | ४०=०० |
| २) | होमिओपाथिक लक्षणांचा भावनाकोश | डॉ.श.र.फाटक | ४०=०० |
| ३) | शारीरत-त्वदर्शन | वैद्य श्री.फु.हिर्लेकर | ४२=०० |
| ४) | आरोग्य आणि आहारशास्त्र | प्रा.शांता केळकर | ३२=०० |
| ५) | मानीव देह भाग १, खंड-१ | डॉ.म.वि.आपटे | ९=०० |
| ६) | मानीव देह भाग १,खंड-२ | डॉ.म.वि.आपटे | १०=५० |
| ७) | मानीव देह भाग-२ | डॉ.म.वि.आपटे | २४=०० |
| ८) | मानवी शरीर विज्ञान | डॉ.व्यं.र.साने | २४=०० |
| ९) | पाश्चात्य रोग चिकित्सा खंड १ व २ (डॉ.बोमा लिखित मेडिसिन: इसेन्शीअल फॉर प्रॅक्टिशनर्स अँड स्टुडंटस या पुस्तकाचा अनुवाद) | डॉ.मधुकर रानडे | २४=००(प्रत्येक खंडास) |
| १०) | स्त्री रोग चिकित्सा (डॉ.के.एम.मसानी लिखित'' ए टेक्स्ट बुक ऑफ गायनॅकॉलॉजी '' या पुस्तकाचा अनुवाद) | डॉ.मधुकर रानडे | ७५=०० |
| ११) | प्रसूती विद्या (डॉ.के.एम.मसानी लिखित'' ए टेक्स्ट बुक ऑफ ऑब्स्टेरिक्स '' या पुस्तकाचा अनुवाद) | डॉ.मधुकर रानडे | १३२=०० |

साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने
खालील
केंद्रांवर मिळतील.

प्रकाशन व्यवस्थापक,
शासन मुद्रण व लेखन सामग्री विभाग, चर्नी
रोड

मुंबई- ४०० ००४.

व्यवस्थापक,
शासन लेखन सामग्री आणि ग्रंथागार,
शहागंज, गांधी चौक,
औरंगाबाद- ४३१००१

व्यवस्थापक,
शासकीय ग्रंथागार, बडवे बिल्डिंग,
पी.वाय.सी.जिमखाना,
पुणे- ४११००४

व्यवस्थापक,
शासन मुद्रण व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स,
नागपूर-४४०००१

---

संकटातले जहाज कुणाचेही असो
त्याला मदत करायची असते
हा समुद्राचा न्याय आहे
तो धरतीचा न्याय का होऊ नये ?
-बाबा आमटे

क्रांतीला सत्तेचं आकर्षण हवचं
संघर्षाचं सामर्थ्यही हवं
पण माणुसकीची दिशा हवी
ती नसली तर क्रांतीची होते राजकीय वावधूळ
-बाबा आमटे

# संवाद

मा. संपादक

एप्रील/जून १९८८ वर्षे नववे/ अंक: दुसरा पान. नं.३९

**विषय:** खोटे आदिवासी कर्मचारी कसे पकडावे १.
लेख प्रकाशीत केल्याबाबत-मित्रमंडळीकडुन अभिनंदन

स.न.वि.वि.- पत्र देण्याचे कारण,

मी स्वत: पारधीजातीचा एक आदिवासी चतूर्थश्रेणी ( आदिवासी कर्म. आहे. शासकीय आदिवासी विकास ( म.रा. ) नाशिक, संचालीत आदिवासी विकास अधिकारी. अमरावती, तर्फे शा.पो.बे. आ. शाळा टेम्ब्रुसोंडा येथे चौकीदार आहे. आदिवासी खात्यामधील/ अफरातफर/ बेकारी/ अनियमीतपणा/ व्यवस्थापण/ बोगसव्यवहार/ व खोटयाआदिवासीचा प्रवेश व नियुक्त्या ह्या बाबी वरिष्ठांचे निदर्शनास आणून दिल्या आहेत; परंतु विचार न होता ''चोर सोडून संन्याशाला फाशी दिली'' असे आदिवासी अधिकाऱ्यांनी घडवून आणले. सत्य बोलणे गुन्हा आहे. सत्याला शिक्षा! बेजबाबदार अधिकाऱ्यावर कार्यवाही होणार काय ? = चोर सोडून संन्याशाला फाशी दिल्याची हकीकत दिनांक १९/२/९८. रोजी शा. आश्रम शाळा टेम्ब्रुसोंडा ता. चिखलदरा जि. अम. या शाळेवरील एका शिक्षकाने अन्नविषबाधा झाली आहे असा फोन केला होता. फोन करण्याची आवश्यकता नव्हती कारण गांवात प्रा.आ. केंद्र असून मुद्दाम ग्रामीण रूग्णालय अचलपूरला फोन केला. ( शाळेवरील वातावरण भंग करण्याकरिता फक्त ) फोनवरून डॉक्टराचे पथक व पोलीस स्टॉप. शाळेवर हजर झाला. चौकशी सुरू झाली ( दोन मुलं फक्त भर्ती ). फोन करणाऱ्यांनी पत्रकाराला लेखी माहिती दिली होती. तरीही त्या शिक्षकांवर कार्यवाही झालेली नाही. ( अन्नविषबाधा शिक्षकानी म्हटला ) आणि चौकशी जोराने सुरू झाली. ( घटनेला जबाबदार असलेले. इ.चा मुख्याध्यापक/ अधिक्षक/ स्वयंपाकी यांचेवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही. कारण त्यांनी त्यांचे पुढारी/ व त्यांचे मदतीला धावून आलेले अधिकाऱ्यांनी त्यांना वाचवले आणि मी अत्यल्पसमाजाचा चतुर्थश्रेणी कर्मचारी माझे कोणी आमदार, खासदार, ना मंत्री, ना साधा अधिकारी, ना मी पदवीधर मला मदत कोण करील ? मी किरकोळ रजेवर असून १४ पुरावे सादर केल्यावर सुध्दा मला दोषी ठरवले. हुकूमशहा अधिकाऱ्यांनी फक्त काटा काढला, कारण माझे धोरण भ्रष्टाचाऱ्याविरूध्द, मी स्वाभीमानी, निस्वार्थी, निर्व्यसनी, भ्रष्टाचाऱ्यांना पटले नाही म्हणूण निव्वळ खोटा आरोप लावला, ज्या १४ पुराव्यांनी इमानेइतबारे आपले सत्य वचन निभवले ! त्यांना काय वाटत असेल ?अन्नविषबाधा, याला चौकीदार कसा राहील जबाबदार, कारण त्याचे काम वेगळे त्याच्या कामाची वेळ, जबाबदारी वेगळी, एवढे असून सुध्दा अधिक्षक, स्वयंपाकी यांना सोडून दिले, आणि जबाबदार म्हणूण चौकीदारास शिक्षा दिली हे योग्य आहे काय ? आणि त्याला त्याच्या कुटुंबाला त्रास देणे हे योग्य आहे काय ? अन्नविषबाधेला जबाबदार असलेले अधिक्षक, स्वयंपाकी फक्त ! सर्वप्रथम त्यांना शिक्षा द्यावयास पाहिजे होती ( यामधे अधिकाऱ्यांवर दबाव आला ) आणि स्वार्थी अधिकारी एवढेच ! ज्याचा कोणी नाही, त्याला सरकार

मायबाप म्हणता येइल काय ? आपला स्वार्थ साधून इ. चा मुख्याधापकास ( जातीयवादास ) हाताशी धरून माझेवर खोटा आरोप लावला; कारण एवढेच दिले ( हजर असून मदत दिली नाही सह्या केल्या खोडल्या म्हणूण निलंबीत. आपण घेतलेल्या १४ पुराव्यामधे काहीतरी ४-५ भ्रष्टाचारी नसतील त्यांनी इमाने इतबारे सत्य सांगीतले तरी भ्रष्टाचारी हुकूमशहाने मानले नाही. कारण बडच्यानोकरीचे गर्व असलेले, आडमार्गाने संपत्ती जोडणारे त्यांना कुठे नीती आड येणार ! परंतु परमेश्वर माफ करणार नाही. वर्षानुवर्षे होत असलेला अन्याय कोठवरी सहन होणार ! प्रतिकार करावा लागणारच !

कार्यमुक्त १५/३/८९-निलंबीत आदेश १४/३/८९

माझा मुलगा वर्ग १० वा शिकत होता. १४/३ व १५/३/८९ ला त्याचे पेपर होते. दुःखामुळे दोन पेपरला नापास झाला. ( आदिवासी अधिकाऱ्याला कल्याणकारी योजना माहीत नाही काय ? पण त्या आदिवासीचे शत्रू अधिकाऱ्यांना कसे बरे वाटणार, तो तर शोषणकर्ता ! आदिवासी खात्यामधे फक्त आधिकाऱ्याची हुकूमशाही आहे. शा. नियमाचे पालण होत नाही, अन्याय करितात. एका कर्मचाऱ्यास ३ वर्षात बदली तर जो सहमत असेल त्यास १२ वर्षे होऊन चालते असे अनेक उदाहरणे आहेत आणि हेच भ्रष्टाचाला कारणीभूत आहेत.

मुद्दाम आकसामुळे निलंबीत व शिक्षण व आर्थिक नुकसान :

१/२ पगारामुळे मुलांची ऊपासमार, मुलीचे ठरलेले लग्न स्थगीत झाले. लग्नाकरिता बँकेकडुन मिळणारे कर्जे, निलंबीतमुळे अडून पडले, अधूनमधून आजार येवढे असून सुध्दा जातीवादी भ्रष्टाचाऱ्यांनी मानवाला न शोभनारी कृत्य मंडळीनी दया दाखवली नाही-सर्वात प्रथम पैश्याला मोठेस्थान नंतर वशीला व चतुराई ह्याबाबी आमच्याकडे नाहीत म्हणूण आम्ही अधिकाऱ्याच्या सूड कार्यवाहीला बळी पडतो.

दिनांक ७/११/८९ आदिवासी विकास अधिकारी यांचे कार्यालयात चौकशी अधिकारी तथा प्र.अ.धारणी यांनी कुटुंबासमोर अपमान केला. दि. ७/११/८९ रोजी निर्वाहभत्ता वाढवूण मिळावा या मागणीकरिता माझे कुटुंब आ.वि.अधिकारी यांचे कार्यालयात हजर झाले व त्याच दिवशी चौकशी होती. चौकशी अधिकाऱ्यानी कारे, तुरे, धमकी देऊन अपमान केला. मा. मुख्यमंत्री यांना ( दर्यापूरसभेमधे ) निवेदन सादर केले, नंतर रजि.ने स्मरणपत्र दिले, तसेच मा. संचालक आदि ( म.रा. ) नाशिक, नागपूर यांना तक्रारीच्या प्रती सादर केल्या परंतु कार्यवाही झालेली नाही.

आदिवासी विकास अधिकारी अमरावती, व मुख्याध्यापक टेंम्ब्रुसोंडा यांचे विरूध्द फौजदारी खटला ( न्यायालय अचलपूर ) आम्ही पती, पत्नी दोघे व शिक्षक पात्र मुख्याध्याकेसह बदल्या साक्ष का दिली म्हणूण निलंबीत केले.

घटना- दिनांक १/१/८९आदिवासी विकास अधिकारी श्री. तांबे व मुख्याध्यापक श्री. ढेवले या दोघांनी श्री. डोंगरे सशि यांचे घरात घुसून शिक्षकास मारहाण केली. घटनेचा रिपोर्ट पोलीस स्टेशन चिखलदरा चौकशी होऊन नं ३१६/८९ ज्यु.मॅ.कोर्ट अचलपूर भरदवी ४४८,३२३,३४-कलमाखाली गुन्हा नोंदवून केस सुरू आहे त्यामधे आम्ही पुरावे आहो, आमच्यावर दडपण आणले गेले, धमक्या दिल्या व लेखी मागीतले होते. नाकारल्यामुळे, मला निलंबीत केले व इतर शिक्षकांच्या लांब व दुर्गम ठिकाणी बदल्या केल्या आहेत, आदिवासी खात्याने त्यांचे विरूध्द कार्यवाही केलेली नाही. त्वरीत कार्यवाही होऊन शिक्षा व्हावी. ( तरच न्याय मानला जाईल ) मी गुन्हेगार नसताना खोटे प्रकरण तयार करून व तेही सिध्द झाले नाही. तरीही मला शिक्षा दिली. फक्त फसवणूक व हुकूम म्हणूण, वरील गुन्ह्याच्या आरोपाखाली त्यांना निलंबित करण्यात यावे हीच विनंती-

मला निलंबीत करण्याचे कारण ( खोटा आरोप ) -

१)प्रकल्प अधिकारी धारणी हेच चौकशी अधिकारी होते. मी चतूर्थश्रेणी व अधिकारी वर्ग १ अधिकारी यांनी मला त्रास दिला, पुरावे गहाळ केले, व खोटा अहवाल सादर केला.

२)आदिवासी विकास अधि. अमरावती व मुख्याध्यापक टेम्ब्रुसोंडा यांचे फौजदारी प्रकरणात पती, पत्नी दोघांचे साक्ष असल्यामुळे ( लिहुन दिल्यामुळे ) ३)खोटया आदिवासींच्या तक्रारी, बोगस विद्यार्थ्याना प्रवेश व अफरातफर.

४)माझी सत्यता व स्वाभिमान एकनिष्ठा. ( भ्रष्टाचाविरूध्द तक्रारी )

वरील चार कारणांमुळे मला निलंबीत केले. परंतु अन्नविषबाधेला जबाबदार असणारे यांचेवर कार्यवाही झाली नाही. ( कारणे नाजूक, व पैसा आहे )

चौकशी अहवाल सूडबुध्दीने, हेतुपुरस्सरपणे हूकूम दिल्याप्रमाणे कारणांमुळे

१)चौकशी अधिकाऱ्याविरूध्द दि.१०/११/८९ मुख्यमंत्री, संचालकाना तक्रार

२)एक वर्षापूर्वी म्हणूण दाखवल्याप्रमाणे निलंबीत केले व स्वत: चौकशी अधिकारी,

३)२१/२/९० ला इ.चा मुख्याध्यापकांचे घरी मुक्काम व त्यातून स्वार्थ

चौकशीमधे गुन्हा सिध्द झाला नाही. १४ सत्य पूरावे, व ४ सरकारी पुरावे सर्व पुराव्यांनी सत्य बाजूने कौल दिल्यामुळे शेवटी फुसका बार ठरला, म्हणूण स्वत:च्या हुकमशाही अधिकाराने सुडबुध्दीने अहवाल सादर केला तो असा. गडचिरोली सारख्या दुर्गम भागात बदली. ४०० की.मी एक वेतन वाढ कायमस्वरूपाची बंद अशी शिक्षा देण्याचे अहवाल पाठवीला त्याचप्रमाणे उपसंचालक नागपूर यांनी तीच शिक्षा दिली हे योग्य आहे काय ? आदिवासींवर अन्याय होत आहे. माझ्यावर झालेल्या अन्यायाला १)श्री गरकळ प्र.अ.धीरणी २)इ.चा मुख्याध्यापक श्री. पाटील हे दोघे आहेत. जातीयवादी असून त्यांनी अन्याय केला आहे. मा. संचालक, उपसंचालक, जिल्हाधिकारी, मुख्यमंत्री यांना निवेदने दिली आहेत. शेवटी गरिबाला न्याय मिळाला नाही, बेजबाबदार भ्रष्ट अधिकाऱ्यावर कार्यवाही होईल हीच अपेक्षा बाळगून कहाणी सादर करीत आहे.

महोदय, मला मार्गदर्शन मिळावे, मी पारधी जमातीचा अल्पसंख्याक मधील एक चतुर्थश्रेणी कर्मचारी आहे, अन्यायाचा प्रतिकार करणाऱ्यापैकी आहे. माझ्या जातीचा पुढारी, आमदार, खासदार, मंत्री नाही व अधिकारी सुध्दा नाही, त्यामुळे मार्गदर्शन कोण करणार ? भ्रष्टाचारी अधिकारी लेखणीचे शस्त्राचा उपयोग करून आम्हा गरिबाला जखमी करित आहेत, त्यातच त्यांना आनंद आहे. खूष आहेत. निर्मूलनाकरिता निघालेले कपटी विद्रोही, समाजकंटक, हे काय निर्मूलन करणार ?

मी नोकरीमधे येण्याआधी गावचा पोलीस पाटील व जनस्वाथ्यरक्षक होतो. बरेच राष्ट्रकार्य केल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवले आहेत. पण माझी आर्थिक परिस्थिती नाजूक असल्यामुळे व शिक्षणाचे धोरणामुळे वरील पदाचा राजीनामा दिला. भूमीहीन, बेघर झालो, आणि चतुर्थश्रेणी नोकरीवर रूजू झालो. उद्देश एवढाच की एकुलत्या एक मुलाला खूप शिकवावे. मुलींना, अपंगांना, व गरिबनातेवाइकाच्यां मुलांना आश्रमामधून शिक्षण घेण्यास प्रवृत करावे. ''माहीत नव्हते की रस्त्यांवर काटे टाकणारे दडून बसले असतील ! मी निर्व्यसनी, राधास्वामी सत्संगी आहे, मांस खात नाही, पीत नाही. फक्त स्वाभीमानी व प्रतिकार करणारा आहे, भ्रष्टाचाऱ्यांना माझी सच्चाई जड गेली. शेवटी त्यांना खोटेच शोधावे लागले. त्यात चाणक्य सुज्ञान अधिकारी नाकारता येणार नाही; त्यांचे कृपेमुळेच निलंबीत झालो. घोर अंधार असून, प्रकाश टाकणारे का भितात ?

स्वार्थाला सर्वचजण अधिन होत नाही ! होतात ते फक्त कायर. मी आपल्या मार्गदर्शनाची अपेक्षा करीन

कग्रङ्गठ्य:-सह्या करून खोडल्या हजर असून मदत केली नाही या आरोपाखाली निलंबीत केले ( रजेवर असूनसूध्दा आरोप लावला त्याला साथ देणारे अधिकारी यांचेवर शासन कार्यवाही करील काय ?

सहयाचे रजिष्टरला जबाबदार मुख्याध्यापक, त्यानेच खोटया सह्या केल्या व त्यांनीच रिपोर्ट दिला. किती अघोरकृत्य व वरीष्ठ अधिकारी त्याला गृहीत धरूण शिक्षा देतो. ( यातील गुढ कायम दीशाभुलकरणारे )

भ्रष्टाचाऱ्यांनी माझ्या कुटूंबाची दैंनदिन होणारी उपासमार, यावर दया दाखवली नाही.

(द्धक्तरू होईल काय ? ) मी कुटुंबासह उपोषणाला बसण्याचे ठरविले आहे. २५/३/९० संचालक नाशिक यांचे कार्यालयासमोर:-

भ्रष्टाचारी, जातीयवादी, अधिकाऱ्यांनी खोटा कट रचून मला निलंबीत केले व सत्त्याला दोषी ठरवुन शिक्षा दिली. याबाबत माझा संघर्ष सुरू राहील.

आपला नम्र
पी.एस. चव्हाण चौकीदार.
शा.पो.बे.आ. शाळा टेम्ब्रुसोंडा
ता. चीखलदरा जि. अमरावती.घ

# संवाद

मा. श्रीयुत जनार्दन वळवी
अध्यक्ष,
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे.
यांचे सेवेशी

महोदय,

सदर पत्रान्वये आम्ही आपणास कळवू इच्छितो की, आपल्या संस्थेचे आदिवासी जीवनावर विविध साहित्य प्रसिध्द झाले आहे. आपले शिक्षणक्षेत्रातील कार्य अमाप आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना सातपुड्यातून शहरात प्रबोधनासाठी पाठविण्यासांठी घेतलेले कष्ट भरपूर आहेत. आपल्यासारखे निस्वार्थी कार्यकर्ते आदिवासींमध्ये सापडणे दुर्मिळ आहे. तुमच्या या शैक्षणिक कार्यास हातभार लावण्याचे काम पुणे येथील अखिल महाराष्ट्र आदिवासी विदयार्थी संघटनेने उचलले आहे.

आपल्या धुळे जिल्ह्यात सर्व तालुक्यांना व छोट्या शहरांमध्ये शाखा, उपशाखा कार्यरत आहेत. आपल्या धडगांवला सुध्दा विदयार्थी आश्रमशाळेचे, वसतीगृहाचे प्रश्न सोडविणे कार्य करीत आहेत.

धडगांव व अक्कलकुवा तालुक्यातील कुपोषणामुळे रोगास बळी पडणाऱ्या लोकांमध्ये डॉक्टरांबरोबर सहकार्य करून समाजात आरोग्य व स्वच्छता प्रबोधन कार्य केले आहे. सदर संघटनेचे संस्थापक ॲड. के.सी.पाडवी व डॉ. अमृतसिंग वसावे यांचे विषयी आपणास परिचय आहेच.

सदर संघटनेने उचललेल्या कार्यात विद्यार्थी कार्यकर्त्यांचे प्रबोधन होणेसाठी आपल्या संस्थेचे ' हाकारा ' त्रैमासिक पुरवायचे असे मुख्य शाखेने ठरविले आहे. सदर त्रैमासिक धुळे, जळगाव, नाशिक जिल्ह्यात पुरवायचे आहेत. तरी संस्थेचे ' हाकाराचे 'मागील प्रसिध्दी झालेले प्रकाशन संघटनेला सवलतीच्या दरात उपलब्ध करावे. सदर शैक्षणिक प्रबोधन चळवळीत विदयार्थ्यांना साहित्य उपलब्ध केल्यास आपल्या जीवनातील शैक्षणिक चळवळीत भर पडेल. आपण प्रत्यक्ष चर्चेत बोलूच. तरी सदर कार्यालयात आपण पत्र पाठवून अथवा भेटून सदर पत्राची माहीती कळवावी व सहकार्य करावे. पत्राची वाट पाहत आहोत.

आपला नम्र विदयार्थी,
पदमाकर वळवी
अध्यक्ष
अखिल महाराष्ट्र
आदिवासी विद्यार्थी संघटना, पुणे

## कविता

''पयसाची लाल आग व्हयं ।।
कखत्या थंडीत केस धुवून...
चापून चोपून घुडग्यावर धडकं नेसल्यावर
डोस्कच्यातली फणी खोवतं
चपापत गळ्यातली बंदी...गुंजशिंपल्याची माळ
तवा -' एक पोरं वरडली
याये ! मले भातक आणश्याल ?
नायूतं..म्या बजाराले येईन...
तवा नवरा गरजला ऽऽ
ढोलक्याच्या तावासारखा
रांडे ऽऽऽ !
'एका पावाची याद देतो
तुले शिणगार कायल्ये पायजाल ?
आयेतं...' राणानं फुलांव काहच्यांत
परणं वास दावू नये...'
वाटेनं जाते तं...आग लागते नं
समद्या बजारातल्या बाप्यालये
रांडे ऽऽ तुहच्यावर नजर समद्या..सुधारलेल्या डुकराची
म्हणून म्हणतं ' तू 'रातराणी होवू नगं
व्हशील तं पयसाची लाल आग व्हयं'
आयेतं माहातिरकमठा
तूही कुयाड त्यचे बिगर प्वटं नाय्
तरच शिकार व्हइलं
गावात माजलेल्या सांडाची- भडव्यांची- दलाल सावकाराची
जे रोजच हुडकते तूहचामाहच्या आयबायची इज्जत
सर्ग मोलाची अब्रु
म्हणून म्हणतं ' रातराणी होवू नगं'
'पयसाची लालतांबडी फुलं व्हयूं
लाकडाची लाल आगं व्हयूं'
पेटं.. ! पून्हा पेट ! आणू
पेटवून टाक हरामखोर लांडग्यालये
जे रोजच लुटते दरिद्री दलीत आदिवासी आयले
भुकेल्या निस्पाप हरिणी गायीले

बाजारात फिरं फिरं
पण वाटेले आलेल्या बैलाले
हातातील कुयाड दे
माहा तिरकमठा मी रोखून ठेविन..
तू 'हाकारा' दयजो !

कु.उषाकिरण आत्राम (पेंदाम)
नेरी( चिमुर ) जि. चंद्रपुर...

---

आणि अनुदानाचे राजकारण स्वाभिमानी समाज
निर्माण करत नाही
तर आशाळभूत लाचाराचे तांडे ते उभे करीत असते.

-बाबा आमटे

सत्ताधाऱ्यांचा विसर पडतो
ते समाजाचा चेहरा बदलण्याच्या प्रयत्नात असतात
संतांना विसरता येत नाही
ते समाजाचं मन बदलण्याचा प्रयत्न करतात.

-बाबा आमटे

कार्यक्षमतेचं कौतुक होतं
कार्यक्षम माणसं मात्र लोकप्रिय होत नाहीत
कार्याबाबत कठोर होणाऱ्या नजरा मात्र
कार्यकर्त्यांबाबत हळुवार होतात.

-बाबा आमटे

# सूची


| | |
|---|---|
| अंक पहिला : जानेवारी-मार्च | १९८०- जबरन जोत जंगल जमीन |
| अंक दुसरा : एप्रिल-जून | १९८०- आदिवासी व शिक्षण |
| अंक तिसरा : जुलै-सप्टेंबर | १९८०- आदिवासी व वनसंवर्धन |
| अंक चौथा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८०- आदिवासी साहित्य व कला |
| अंक पाचवा : जानेवारी-मार्च | १९८१- दलितांना सवलती व राखीव जागा माहिती |
| अंक सहावा : एप्रिल-जून | १९८१- आदिवासी व आरोग्य |
| अंक सातवा : जुलै-सप्टेंबर | १९८१- वनशेती व संवर्धन |
| अंक आठवा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८१- रोजगार हमी योजना |
| अंक नववा : जानेवारी-मार्च | १९८२- उत्तरा खंड अभ्यास मोहीम |
| अंक दहावा : एप्रिल-जून | १९८२- धरणे व विकास |
| अंक अकरा-बारा : जुलै-डिसेंबर | १९८२- जंगल व्यवस्थापन |
| अंक तेरावा : जानेवारी-मार्च | १९८३- आदिवासी व दारू |
| अंक चौदावा : एप्रिल-जून | १९८३- आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी |
| अंक पंधरावा : जुलै-सप्टेंबर | १९८३- प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य |
| अंक सोळावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८३- आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न |
| अंक सतरा-अठरा : जानेवारी-जून | १९८४- आदिवासीमधील स्वंयसेवी कार्य |
| अंक एकोणिसावा : जुलै-सप्टेंबर | १९८४- आदिवासी स्त्री |
| अंक विसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८४- आदिवासींचे आरोग्य व शिक्षण |
| अंक एकविसावा : जानेवारी-मार्च | १९८५- आदिवासी संघटन |
| अंक बाविसावा : एप्रिल-जून | १९८५- जमीन हस्तांतर |
| अंक तेविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८५- आदिवासी महिला |
| अंक चोविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८५- आदिवासी व सरकार |
| अंक पंचविसावा : जानेवारी-मार्च | १९८६- जंगल व धरण |
| अंक सव्विसावा : एप्रिल-जून | १९८६- आदिवासी कला |
| अंक सत्ताविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८६- आदिवासी व वेठबिगारी |
| अंक अठ्ठाविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८६- आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय |
| अंक एकोणतिसावा : जानेवारी-मार्च | १९८७- भटक्याविमुक्त जमातीचे प्रश्न |
| अंक तिसावा : एप्रिल-जून | १९८७- आदिवासी आणि सांस्कृतिक बदल |
| अंक एकतीस-बत्तीस : जुलै-डिसेंबर | १९८७- राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न |
| अंक तेहतीस : जानेवारी-मार्च | १९८८- सवलती अपहरणाची समस्या |
| अंक चौतीस : एप्रिल-जून | १९८८- आदिवासी साहित्य |
| अंक पस्तीस-छत्तीस : जुलै-डिसेंबर | १९८८- आदिवासी समाज व संस्कृती |

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन

कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवताना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे.

मानव विज्ञानच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाने मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

**मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व**

| | |
|---|---|
| आजीव सभासद | २५० रूपये |
| परिषद वार्षिक सभासद | २५ रूपये |

परिषद सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो.

आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (द महाराष्ट्र असोशिएशन ऑफ अँथ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट किंवा मनीऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर फॉर्म मागे कृपया आपले पूर्ण नाव, पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

रा. के. मुटाटकर सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औन्ध, पुणे ४११००७

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**